साहामाही " ३ " ०८
साल अखेर ७ " १ ०१८
किरकोळ अंकास .......................... ०४

नोटिशी बद्दल.
१० ओळींचे आंत रु. १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ........ ०१

Per annumin advance 5 Postages 1
Per annum in arrears 7 .. 1R.
Six monthly ............ 3 "
Single copy .................................. 4

Advertisements.
Below 10 lines...2
Per line over 10...4a
Repetition perline..

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL. XXII | AKOLA MONDAY 2 APRIL 1888 | NO. 13
वर्ष २२ | अकोला सोमवार तारीख २ माहे एप्रील सन १८८८ इ० | अंक १३

## जाहिरात.

टपाल खर्च ०४ आणे.
किंमत एक बाटलीस १॥ रुपया.
औषधी सांवत कागद व चमचा.

फक्त एकाच औषधी पासून खालीं लिहिलेले सर्व प्रकारचे रोग दूर होतात, व त्या संबंधानें झालेला पत्रव्यवहार व सर्टिफिकिटें स्थलसंकोचास्तव न देतां रोग्यांचीं नांवें मात्र दिलीं आहेत. उपदंशजन्य, गरमीचे अनेक प्रकारचे रोग, धातु, खर, स्त्रियांस धुपणी लागते ते रक्त दूषित झाल्यापासून हातांपायांवर डाग पडणे, सर्व त्वचेचे रोग कच्चा पारा सेवन केल्यानें सूज येणे, कळा लागणे, व सर्व प्रकारचा संधीवायु, गंडमाळा, पिनस, नळवात, कडकी अम्लपित्त, पोट शूळ, पोटफुगी, नळवायु, मस्तकशूळ व मुखरोग जिभेवरील चट्टे, दातांतून पू येणे, रक्त येणे व तोंडाची दुर्गंधीआदिकरून सर्व रोग वरील औषधानें दूर होतात.

पत्ता—मुंबई फणसवाडींत बाळकृष्ण भिवाजी नाखवा यांचे चाळींत
डा. धाकजी भानजी सांवत.
Dr. D. B. Sawant.
30-12-1887

## पत्रव्यवहार

या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मताशी मिळून असतात असें समजू नये.

रा० रा० वऱ्हाडसमाचारपत्रकर्ते यांस
मुक्काम वाशीम ता० २६-३-८८

कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विशेष प्रेमिचनळूं रा. रा. नारायण गंगाधर यांच्या अकालिक मरणानें फार दुःख होऊन आपल्या पत्रद्वारें तिजाऱ्याची हकीकत प्रसिद्ध करण्याकरितां मोठ्या उत्कंठेनें पत्र लिहिलें. परंतु तो बिचारा आपल्या दृष्टीनें हलका वाटून आपण, पत्र दोनचार ओळींत गोवचारा आणून कचऱ्याच्या पेटींत फेंकून दिलेंत ना!! हा जर एखादा पांचशे रुपये पगाराचा असतां तर अशा बद्दल आपण हातभर पत्र काळें करून दुःख गाइलें असतें एकूण आपण मोठ म्हणवितां व आपल्यामध्यें असा उंच नीच भाव कां असावा बरें? असो त्यांच्या अकालिक मरणानें त्यांच्या कुटुंबाची दीनावस्था झाली तो दयानिधी शाळाखात्याचे डायरेक्टर यांचे कानावर घालाल काय? पण आपल्या अंतःकरणास कींव येईल तर ना?

हल्लीं उन्हाळा भासूं लागला आहे. सीत पदार्थांवर इच्छा जाऊं लागली. आकाश नेहमीं साफ असेत. यामुळें फार तलखी होते नेहमीं पावसाची भिती असते. इंग्लंड देशांत स्वच्छ हवा वर्षांतून फारच थोडे दिवस असते. तद्वत सालगानें इकडेहि प्रकार झाला कीं काय असा भास होतो गव्हाची कापणी फार झपाट्यानें झाली असून मळणी झाली नाहीं. सालमजकूर प्रमाणें गहूं कधींही बऱ्याच दिवसांत पिकला नाहीं असें बोलतात परंतु गहूं इकडून परद्वीपांत जात असल्यामुळें महगता आहे ती आहेच येथें दोन बाजार भरतात. एक गुरूवारचा गावांत व दुसरा रविवारी गांवाबाहेर. येथें व्यापार नाहींत व फार व्यापारीही नाहींत व जे कांहीं आहेत ते तुटपुंजे आहेत. ते असें करितात कीं बाजारांच्या दिवशीं ज्या बाहेरून धान्याच्या गाड्या वगैरे येतात त्या आपण स्वस्त दरानें खरेदी करून नंतर मर्जीस येईल त्याप्रमाणें विक्री करितात. यामुळें गरीबांस धान्य न मिळून बिचाऱ्यांना उपाशी मरण्याची पाळी येते. ह्या गांवीं अधिकारी जर या गोष्टीकडे लक्ष पुरवितील तर असा प्रकार बहुधा घडणार नाहीं हल्लीं येथें अकोले मापच्या दीड पायली म्हणजे येथील एक पायलीस साडेसाहा आणे पडतात असा भाव आहे. याचप्रमाणें सर्व पदार्थ आहेत आतां दिवसानुदिवस लोकांना महागाईची सवय होत चालली आहे म्हणून बिचारे जसे दिवस येतील तसे त्यांस पाठ देतात. सरकारी लोक बाहेर फिरावयास गेले म्हणजे जसे भाव त्यांस ठरवून दिले असतात त्याप्रमाणें रयत लोकांस व लहान मोठ्या सरकारच्या इतर कामगारांस त्या भावाचा उपभोग घ याचा परवानगी कां नसावी? लहान मोठ्यामध्यें पदार्थांच्या भावापासून हा फरक कां असावा? याबद्दल स्थानिक अधिकारी विचार करून अर्थशास्त्राचे नियम सर्वांस लागु करील तर बरें होईल

मे. जिल्ह्याधिकाऱ्यांची स्वारी फिरून आपल्या स्वस्थानीं आली बहुत दिवसां स्वारी आली म्हणून लोकांच्या झुंडीच्या झुंडी त्यांस भेटावयास जात असतात. अजून ड. ए. इन्स्पेक्टरची स्वारी आली नाहीं. दोनचार दिवसांत येणार असें म्हणतात. अद्याप त्यांनी सर्व जिल्ह्यांत फिरण्याची एक पाळी पुरती आली नाहीं मग दुसरी केव्हां करणार! यंदा सालीं इतकी सुस्ती कां झाली कोण जाणे. धन्य त्या एज्युकेशनल इनस्पेक्टर साहेबांची. सर्व वऱ्हाड प्रांत फिरून आले नेमिलेलें काम करून रेकॉर्ड वगैरे कुठें पाहून पुनः रिकामें ते रिकामेंच. असे सरकारचे कामगार असले की हल्लीं आहेत ह्यांशीं निकामगार हरएक खात्यांत पुरतील.

येथील कायमचे डेप्युटी क्लार्क मिस्तर खरकर जे रजा घेऊन हैद्राबादकडे नोकरी करीत आहेत. त्यांनीं पेनशन घेण्याची खटपट चालविली आहे असें म्हणतात. असें झाल्यास कायमची जागा कोणास मिळते तें पहावें. मागें बुलढाण्याहून गृहस्थ आले होते ते परत गेले. तेव्हां बाहेरचा मनुष्य येऊन त्यास ती जागा मिळून त्यास येथील हवा मानेल कीं नाहीं हा वानवा. तेव्हां कोणाचें नशीब उदयास येतें तें पहावें. मे. डे कमिशनर साहेब बहादूर हक्काचा व योग्यतेचा विचार करून ती जागा भरतील अशी सर्वांस आशा आहे. व असें झाल्यानें सर्व त्यांच्या हक्कांस दुवा देतील.

ता. २४ रोजीं येथील इं. म. शाळेंत प्रोफेसर कमालुद्दीन यांचा इंद्रभान तमाशा आहे. हा तमाशा गारुड्याच्या तमाशासारखा आहे असें म्हटल्यास हरकत नाहीं मुलांचीच फार गर्दी होती. मोठे मनुष्य फारसे नव्हते. बारा रुपये सुमारें बिचाऱ्यास मिळाले असें म्हणतात. असे प्रकार सरकारी इमारतींत येथें कधींही झाल्याचें पहाण्यांत नाहीं. कोणा मोठ्या गृहस्थास सभा भरवून पानसुपारी देणेंही गोष्ट निराळी व राजमान्य होय. परंतु हलक्या तमाशास मोठी शाळा देणें म्हणजे किती गौण! कोणी म्हणतात येथील मास्तर ती घेत नव्हते परंतु मास्तरांचे वरिष्ट यांनीं प्रोफेसर कमालुद्दीन यांस हुकूम दिल्यावरून असें झाल्याचें म्हणतात. हे खरें असेल तर शाळा खात्याचे अधिकारी फार दयाळू यांत संदेह नाहीं. व याचप्रमाणें ते सर्व कामांत दया करतील अगर दयेनें कामें करून वर्ततील तर वऱ्हाड शाळाखातें इंद्रभुवन नाहीं असें कोण म्हणेल?

येथील पोस्टांत पार्सल खात्याचें मागें आपल्या पत्रांत प्रसिद्ध झालें होतेंच. आतां असें समजतें कीं पोस्टाचे सुपरिंटेंडेंट साहेब यांनीं खात्याच्या संबंधीं चौकशी करून नागापा कुपुस्वामी यांवर वहीम दिसतो त्यावरून मिस्तर दांडेकर यांचे कोर्टांत प्रकरण दाखल केलें. सदर्हू आरोपीस वारंट नागपुराकडे गेलें असें म्हणतात. खटल्याचा निकाल होण्यापूर्वींच पोस्ट मास्तर यास सदर्हू पार्सलाचे पैसे भरा असा हुकूम दिल्याचें कळतें पोस्ट मास्तर जर गुन्हेगार नाहींत तर नुसतें पैसे भरा म्हणणें हे न्यायी साहेबांस शोभतें काय निकाल झाल्यावर सर्व हकीकत कळविण्यांत येईल. पत्रकर्ते राव कृपा करून छापावें कमी ज्यास्ती वाटेल तितकें करितें जावें.

आपला प्रेमळ
"......"

वऱ्हाडसमाचार.

मिती अधिक चैत्र वद्य ६ शके १८१०

आमच्या हतभाग्य देशाच्या संबंधाची चर्चा पार्लमेंट सभेंत होण्याचा प्रसंग फार थोडे वेळां येतो. व अशा प्रसंगाच्या वेळीं सभेंतून निवून जाण्याचा मेंबर लोकांनीं जणूं काय निश्चयच केलेला असतो. मि. साम्युएल स्मिथ सारख्या परोपकारी गृहस्थाकडून तरी आमच्या स्थितीविषयीं बरेच प्रश्न उत्पन्न होतात. परवां त्यांनीं ज्या कांहीं सूचना केल्या त्या फारच महत्वाच्या व योग्य आहेत. त्यांनीं सांगितलें कीं, दिवसेंदिवस हिंदुस्थानास कर्ज फार होत आहे ह्याबद्दल सभेस फार वाईट वाटत आहे मिठावरील कर वाढवावा लागला हें चांगलें झालें नाहीं. इ० आमचे सरकार हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेची चौकशी करण्याकारितां 'रॉयल कमिशन नेमणार होते त्यास आज दोन वर्षें झालीं परंतु अजून ते नेमण्यास सुमुहुर्तच सांपडत नाहीं. मि. स्मिथ साहेब ह्मणतात. "दहावर्षांत (दुष्काळासाठीं वेगळा काढलेला फंड जरी तुटेंत मिळविला तरी )एकंदर ९ कोट रुपयांची तूट येते." ह्या तुटीचीं मुख्य कारणें तीन आहेत "सैन्याचा खर्च, ब्रह्मदेशांतील लढाई, व सरहद्द मजबूत करण्याचा प्रयत्न.' ब्रह्मदेशाची लढाई उपस्थित करण्यास सांगितले होते कोणी व त्याबद्दल. '३० लक्ष रुपये पुरणार होते तेथें २ कोटी रुपये लागले' कां? कोणीकडे ३० लक्ष व कोणीकडे २ कोटी खर्चाच्या अंदाजाचा व खर्चाचा मेळ तर खूप बसतो आहे. हलवायाच्या घरावर तुळशीपत्र आपले तरी काय जातें आहे. परंतु अशा व्यवस्थेनें परिणाम काय होईल ह्याचा विचार कोणी तरी करीत आहे काय? 'शिवाय हुंडावळीमुळें हिंदुस्थान सरकारास फुकटफाकट भरावा लागणारा ५॥ कोटीचा भुर्दंड,' आणि त्यांत '३।४ कोटींचे निवळ नुकसान' वर इतक्या मोठ्या रकमेची तूट भरून काढण्यास दोन उपायांची योजना तर खूप नामी झाली आहे 'एक दुष्काळासाठीं तर्तूद करण्याकरितां वेगळा काढून ठेवीत असलेल्या फंड वेगळा ठेवावयाचा क्रम सोडला. दुसरे मिठावरील जकात सपाट्यानें वाढविली.' ह्याच्या योगानें ह्मणण्यासारखे तोटे थोडेच होणार आहेत. मिठावांचून फार तर लोकांची ताकद कमी होईल. दुष्काळाकरितां फंड जर राखून ठेवला नाहीं तर गरीब लोक पटापट प्राण सोडतील एवढेंच ना! पूर्वीच्याप्रमाणें लोकांना मरूं देण्याचा क्रम सरकारास आह्मीं ठेवूं देणार नाहीं.' हे आमच्या दयाळू स्मिथ साहेबांचें ह्मणणें सरकारास ऐकूं जावो ह्मणजे झालें. ते साहेब आणखी ह्मणतात कीं 'आपल्या ख्रिस्ती धर्माला व आपल्या मानवी दयेला हे अत्यंत हीनत्व आणणारें आहे' परंतु आपमतलबीपणा पुढें आमच्या सरकारास मानापमानाची, धर्माची व दयेचा चाड कोठें आहे.

आमचें सरासरी दरमाणसी दरसाल २१ रु. उत्पन्न आहे व इंग्लंडांत ४०० रुपये पुरापांत अगदीं भिकार असा रशिया देशच आहे तरी त्याचें उत्पन्न १०० रु. आहे. तरी हा आमच्यावरतीं कर लादण्याचे कमी

होतच नाहीं. इंग्लंडास शेकडा ६ रु. कर द्यावा लागतो पण आह्मांस १० रु. ' सर डब्ल्यु हंटर यांचें असें ह्मणणें आहे कीं, तेथें हिंदुस्थानांत ' ४ कोटी लोकांना एका जवणावरच दिवस कंठावा लागतो. ' ज्या देशांतील एकशष्टमांश लोक अर्धे पोटी असतात त्या देशाची उन्नती होण्याची आशा मुळींच नको. ' हिंदुस्थानाला इंग्लंडचें दिवसेंदिवस अधिकाधिक देणें द्यावें लागत आहे, व हिंदुस्थानाला जर पुढें मागें स्वातंत्र्य मिळालें तर तेथील लोक हे पैसे आह्मी देणार नाहीं असें साफ सांगतील. ' असें विचार त्या लोकांचेच मनांत येऊं लागले आहेत ह्मणून बरें आहे. ज्याचा बोट त्याच्याच डोळ्यांत गेली पाहिजेत तरच कांहीं झालें तर होईल. पगारपैकीं चार पंचमांश भाग नुसत्या युरोपियन लोकांकडे जातो व आमचे राणी सरकार आपल्या जाहिर नाम्यांत काळ्यांस व गोऱ्यास सारख्या रीतीनें वागविलें जाईल ह्मणून वचन देतात ह्या दोन्ही गोष्टींचा अशा रितीनें संबंध कसा जुळावा? ' नेटिव लोकांस हल्लींहून अधिक मानानें शिकरींत घेतलें असतां काटकसर होऊन त्या देशास ही गोष्ट फायद्याची होईल. राज्यकारभारांत हात असावा अशी त्यांची इच्छा आहे. हिंदुस्थानचे लोक आतां लहान मुलें नाहींत. इंग्रजी अमल ते झुगारून देतील अशीही भीति नको. त्यांनीं आजपर्यंत जीं तिनवेळेले लोक आहेत अशी राष्ट्रीय सभा तीनदां भरविली. यावरून त्यांच्या योग्यतेचें खरें दिग्दर्शन होतें. हा आमच्या स्मिथ साहेबांचा उपदेश वाजवी आहे खरा परंतु त्याचा उपयोग होईल तेव्हां खरें.

---

मुंबईच्या प्रेसिडेन्सी असोशिएशननें मिठावरील वाढलेल्या करा विरुद्ध एक मुद्देसूद अर्ज पाठऊन दिला. पुण्याच्या सार्वजनीक सभेनें अर्ज पाठविण्याची खटपट चालविली आहे. परंतु आमची सार्वजनीक सभा काय करणार? आमच्या वऱ्हाडांतील लोकांस हा कर मान्य आहे काय? आमची सार्वजनिक सभा वेळेवरतीच कांहीं तरी खटपट करील तर बरें होणार नाहीं काय?

---

लिहून आलेला मजकूर.

## विद्या

आतां या सदराखालीं जो लेख येणार त्यावरून विद्या ह्मणजे कांहीं पोकळ गोष्ट आहे, अथवा तींत कांहाच हांशील नाहीं, असें कदाचित लोकांस वाटेल; परंतु आमचें तसें बिलकूल मत नाहीं. विद्या ही सर्वांत श्रेष्ठ, मनुष्यास केवळ भूषण, सुवर्णाचें केवळ मूळ आणि सर्व वेड्या समजुती नाहींशी करणारी तर खरीच; परंतु सध्यां जी विद्या सरकार आह्मांस देत आहे. तीस हीं वरील विशेषणें योग्य आहेत काय? व हीस सरकार जें अमृत म्हणतें तें खरोखर अमृतच होय अगर अमृत विष होय अथवा निवळ विष आहे हें दाखविण्याचा आमचा उद्देश आहे.

"आपल्या जिवाचें रक्षण करितां येऊन आपली प्रकृती निरोगी राखितां यावी, आपल्या जीवितास पुरें इतकें अन्नवस्त्र मिळवितां यावें, आईबापास जीं कामें अवश्यक करावीं लागतात, तीं करितां यावीं, राष्ट्राची पूर्वीची स्थिती होती कशी व सांप्रत आहे कशी हें जाणून राष्ट्रास हितकारक होईल अशी वर्तणूक ठेवावी. त्याप्रमाणेंच बुद्धिकौशल्य, नीतिवर्तन, व धर्माचरण यांची वृद्धि व्हावी असें मन स्वाधीन ठेवितां यावें. अशा प्रकारची जी विद्या ती सर्वांत श्रेष्ठ होय."

आमची सखी आणि सावत्र आई.

अहाहा! काय विद्येचा महिमा! कोणी एक कवी म्हणतोः—

माते परी सतत जो सुख देई विद्या॥
योजि हितीं जनक जेवि सदा न वद्या॥
कांते परी रमवि चित्त हरून खेद॥
श्री, कीर्ति, मान जगिं देई करोनि मोद॥१॥

इतकी विद्येची थोरवी असून तुम्ही आज तिच्या विरुद्ध आमचें मन " कुराण घे कीं तरवार घे" ह्या न्यायानें वळविणार काय? असें नाहीं. तर, आम्हीं जे लिहिणार ते तुह्मी स्वीकाराच असा आमचा बिलकुल आग्रह नाहीं मात्र त्या विषयीं इंग्रजी विचार न करितां योग्य विचार करा. आणि जर तुमची विचार दृष्टी अनुमोदन देईल तर तुम्ही आपल्या हृदयपटलीं याला जागा द्या. नाहीं तर एखाद्या अस्पर्श वस्तूप्रमाणें त्याचा विटाळ देखील होऊं देऊं नका.

" मातेपरी सतत जी सुख देई विद्या—

विद्या ही आपल्याला माते प्रमाणें सुख देते. परंतु हा हल्लींची विद्या तशी आहे कीं, काय? या विषयीं विचार करूं. मातेच्या उदरांत ९ महिने राहून मूल जेव्हां बाहेर येतें तेव्हां तें किती तेजःपुंज व गोंडस असतें हे वाचकांना सांगितलें पाहिजेच असें नाहीं. नंतर त्याची आई बाळपणानुषंगिक जे वातन रोग त्यांच्या दाढेतून मूल ओढून घेते, व तिनें त्याची प्रकृति निरोगी राखिल्या मुळें अनुक्रमें त्या मुलाची शक्ति वाढत जाते. ह्या प्रमाणें मूल ७ सात वर्षांचें होतें आतां हें बाळ जर विद्या मातेनें आपल्या पदरांत घेतें तर जों पर्यंत तें तिच्या मांडीवरच खेळत आहे तोंच ती त्याचे मुके घेऊन त्याला कुरवाळून त्याचा अगदीं चोळामोळा करून टाकिते. नंतर त रांगूं-लागतें व पुढें हळूहळू आपल्या बाळपणच्या शत्रूस केवळ नशीबाच्या जोरावर टक्कर मारून आपला इहलोक मार्गी क्रमीत असतें. याप्रमाणें तें सात वर्षांचें होतें. आतां जे मूल पोरकें वाढलेलें आहे अथवा ज्याला आईबाप असूनही त्यांनीं त्याजबद्दल काळजी घेतली नाहीं तें बाळकाडो पैलवान अगर ताडी पैलवान होणार? याप्रमाणें मूल सात वर्षांचें झालें म्हणजे आपले समवयस्क सोबती विद्या मातेच्या घरीं रममाण झालेले पाहून तेथें आपणही जावें असें त्याच्या मनांत येऊं लागतें. व बाप फक्त विद्या मातेच्या उंबऱ्यावरच खेळण्यास सांगत असताही "गूळ खोबरें विकुनि भलत्याही जनांस बाळकवळावा" ह्या न्यायानें तिनें दाखविलेल्या आशांस मोहीत होऊन पित्याच्या म्हणण्यास झुगारून देऊन सावत्र आईच्या घरीं पूर्ण रममाण होते. ह्या प्रमाणें हे बाळ कांहीं वेळ आपल्या सख्या आईच्या ताब्यांत व कांहींवेळ आपल्या सावत्र आईच्या ताब्यांत आपला काळ कंठीत असतां इतकें तिच्या स्वाधीन होतें कीं शेवटीं तें आपली जन्ममाता देखील विसरून जातें.

ह्या बाळाची पहिली आई त्याला संसार कृत्यात तरबेज करून पुढें भवसागरांत त्याची लहानशी नाव टाकून पैलतीरावर सुखरूप जाऊन पोचण्यास वल्ही वगैरे उत्तम सामान करून देऊन त्याला उत्तम नावाडी बनविते. परंतु ही विद्यामाता जी त्याची शरीर नौका देखील दुरुस्त न ठेवितां त्याची मोडतोड करिते ती त्या कोमल बाळाला मार्गांतील खांचखळगे सांगून पुष्कळ उमेद देऊन उत्तम नावाडी कधीं तरी बनवील काय? या दोन्हा आयांचे कधींच सूत नसतें. जन्ममाता विद्या सवतीचें वाईट व्हावें असें मुळींच इच्छित नसते, उलटें ती आपल्या पोटचा गोळा तिच्या स्वाधीन करिते. परंतु ही कृत्याविद्या आपल्या सवतीला नेहमीं पाण्यांत पाहत असते व त्या मुलाकडून तिचा पुरता सूड उगविते. ही बिचारी जन्ममाता अगोदरच आपल्या सवतीला भिऊन असते. परंतु अडल्या वेळेस आपल्या मुलास भाजी आणावयास सांगते. पण लागलींच ही विद्यामाता त्या मुलास असें सांगत असते कीं " बाळा अगोदर अभ्यास व मग इतर गोष्टी भाजी आणणें किती हलकट काम, ते तुझ्या सारख्या विद्यापुत्रानें कधीं तरी करावें काय! खरोखर कधीं ही करूं नये मग जा तर कसा आणि सांग आपल्या आईला कीं मी साफ भाजि आणणार नाहीं. " व दुसरी कडे असें शिकविते कीं " मातापिता धनीगुरू यांची आज्ञा सदैव मानावी!! " जर एखाद्या वेळेस मुलगा गंध उगाळावयास बसला तर त्याची आई त्याला असें सांगते कीं "बाळा जमिनीवर गंधाचे थिपके पाडूं नयेत. पाडले तर आंगावर फोड फुटत. परंतु इतक्यांत ही भारुड्या सवतीला ह्मणून पाडणारी कृत्या दृष्ट ह्मणून त्या बाळापुढें उभीच असते. ती सांगते कीं "बाळा असें कधीं तरी होईल? तुझ्या ह्या वेड्या समजुती कधीं जाणार? जमिनीचा आणि तुझ्या आंगाचा अर्धाअर्धी कांहीं संबंध तरी आहे काय? ह्याच्या योगानें कांहीं होत नाहीं." परंत ह्या शहाण्या पण अजाडी विद्या मातेला असें सांगण्यास कसें कांहीं वाटत नाहीं! एखाद्या मूर्खास अथवा ज्याला विचार शक्ति ह्मणजे काय हें मुळींच ठाऊक नाहीं त्याला मोठ्या विचाराच्या गोष्टी सांगितल्या, तर त्याच्या मनावर त्याचा परिणाम काय होईल बरें? अशा प्रसंगीं त्या अशिक्षित आईस जें ज्ञान असतें ते या जग विध्वंसी शहाण्या ह्मणविणाऱ्या राक्षसीला नाहीं असें दिसतें. असें सांगण्यांत त्या अशिक्षित आईचा असा हेत दिसतो कीं "बाळा चंदन ही बहुमोल वस्तु असून तिचा असा कार उपयोग करावा? शिवाय स्वच्छ जमिनीवर पाण्या शिडकाव वाईट नाहीं कार दिसतो?" ह्याप्रमाणें एखाद्या वाक्यांत ती आपल्या अज्ञान स्वच्छता बहलील वस्तूंची काळजी घेण्यास शिकविते. व ही विद्या माता मोठ चऱ्हाट वळून ह्या वाक्यांचें कसें तरी खंडण करून त्या मुलाचें मन गलिच्छपणा व उधळेपणाकडे वळविते. त्याचप्रमाणें जन्म माता तिन्हीं सांजचे वेळेस आपला मुलगा झाडास शिवला तर असें सांगते कीं "बाळा तिन्हीं सांजा झाडाला हात लावूं नये; त्यांत ब्रह्मराक्षस असतो इतक्यांत ही कृत्या विद्यामाता मुलाच्या कानांत, एकीकडे झाडापासून कार्बोन निघत असतो व देहास तो फार अपायकारक आहे असें शिकवीत असते ही ह्या वेळेस असें सांगते कीं " कशाचा ब्रह्मराक्षस नि कशाचे काय? ब्रह्मराक्षस ह्मणावा तर तो कोठेंतरी दिसताना काय? नाहीं मुळींच दिसत नाहीं. ही केवळ वेडी समजूत आहे; जा, खुशाल शिव कांहीं देखील होणार नाहीं. " ह्या प्रमाणें जन्ममाता आपल्या मुलाला या प्राण घातक वायुपासून दूर राहण्यास सांगत असतां ही हीं पुत्र घातकी अवदसा विस्तवांत पाय घातला असता पोळतो व वारंवार घातला तर तो भाजून जाऊन त्याचा तुकडा पडतो. हें माहीत असतां ही तुह्मी तसें करूं नका, असें कधीही सांगत नाहीं. या प्रमाणें पावलोंपावलीं जी आई आपल्या मुलाचें हीतच इच्छित असते, बरें कोणते व वाईट कोणते हे सांगते, दुर्मार्गापासून त्याची निवृत्ती करून त्याची सन्मार्गाकडे प्रवृत्ती करिते त्या आईची या घातकी दुर्मार्गाकडे वळविणाऱ्या, शक्तिहरणकरणाऱ्या राक्षसी विद्येस उपमा साजेल काय? ही बया एवढेंच करून राहत नाहीं. आपल्या एकल्या बाळाला हा संसार शकट ओढवला जाणार नाहीं ह्मणून आई त्यास एक जन्म मित्र करून देते. परंतु तें या अवदसेला खपत नाहीं. हा मित्र न मिळावा अशी ती पुष्कळ खटपट करिते परंतु त्या बाळाच्या सुदैवानें ह्मणा अगर कोणत्याही उपायानें ह्मणा, सर्व फसते. तरी ही त्याचा सूड कधींनाकधीं तरी उगवितेच. मुलगा जसजसा मोठा होतो तसतसें त्याची माता ह्मणजे कांहींच नाहीं असें शिकवून बायको हें आपलें दैवत आहे असें शिकविते. आणि अधीच हे बहकून गेलेले विद्यापुत्र इतके पत्नीरक्त बनतात कीं मी तिला कोठें ठेवूं असें त्याला होतें. तो आपलें सर्वस्व तिला अर्पण करितो. आमची यजमानीन तीच, आमचा पिता तीच आमचा मित्र तीच; एवढेंच नव्हे तर आमचा देवही पण तीच असें त्याला वाटूं लागतें. व अर्थातच ह्या नुतन आई बाबा शिवाय तो सर्व कांहीं विसरतो. मग त्याच्या जन्ममातापित्याची काय स्थिति होत असेल याची वाचकांनी तुम्हीच कल्पना करा. तो आपलें तन मन धन या नवीन माता पित्यास अर्पण करून आपल्या जुन्या आईबापाचे सेवेस "मुखड तपाद" अर्पण करितो. अशी स्थिती असतांही त्या जन्मदात्या आईच्या मनांत "नको मेला कारटा! त्याचें निसंतान कां होत नाहीं!! हा मरत कां नाहीं!!!" असें कधीं तरी येत काय? अहो किती झालें तरी तो पोटचा गोळाना! अशा दुःखांतच परंतु आपल्या पुत्राच्या भरभराटींत समाधान मानून ती माता एखाद्या वेळेस आपला देह त्याग करून पुत्राचें कल्याण चिंतित परलोकीं निघून जाते. ह्याप्रमाणें ही दुष्ट विद्या "न मातुः पर दैवतं" ह्या ठिकाणीं "न पत्न्याः पर दैवतं" असें शिकविते. त्याचप्रमाणें त्या बाळाच्या घरांतील वडील माणसें अगर प्रत्यक्ष त्याची आईच ह्मणा बाप हा मग तो जुन्या काळचो शिकलेला असला तरी देवाप्रमाणें तुह्मास पूज्य आहे असें शिकविते. परंतु आमची विद्या माता जो आह्मांला जुन्या काळचे लोक ह्मणजे कुच कामाचे, त्यांना कांहीं अक्कल नाहीं, ज्ञान नाहीं, सारासार विचार नाहीं. तात्पर्य, तें ह्मणजे केवळ कौडीमोल, व हजार,

साहामाही " १ "
साल अखे ५ "
[illegible] अंदाज......................



पाश्चिमात्य ... म्हणते यांना

विद्या नसे ज्या पुरुषास कांहीं ॥
विचार नीति तिळमात्र नाहीं ॥
तया नरा काय अहो ह्मणावें॥
पशूं मधें सत्य तया गणावें॥१॥

Brahmans, repeating Vedas are like tod croaking in the rains( हल्लीच्या पाठशाळेंतून M.A and B.A. प्रसार होणाऱ्या मंडळीच्या पूर्वजांना जर Tod ही संज्ञा दिली तर त्यांच्या या धिरंजिवानां काय संज्ञा द्यावी याची कल्पना वाचकहो तुह्मीच करा. पूर्वी घोकपट्टी जरी होती तरी त्यांना कांहीं अर्थ समजत नव्हता किंवा हल्ली जे कांहीं जुने लोक आहेत त्यांनां अर्थ समजत नाहीं असें कशावरून? बरें, तसें जरी घेतलें तरी हल्लीं जे बी ए, एम् ए, होतात यांची ही स्थिति अशीच नव्हे काय? माझें तर मत असें आहे कीं, बापसे बेटा सवाई "ह्या न्यायानें त्यांची त्यांच्या पूर्वजांवरही कडी आहे. एवढेंच कीं आमचे पूर्वज एकाच विषयांत पिच्छा करून त्यांतच प्रवीण होत असत व हल्लींचे विद्वान् पूर्वींची रीत सोडून अठरा धान्याचें कडबोळें करून तें चाऊन पचविण्यास पहातात आणि त्यामुळें हेंही जातें. तर मग वाचकहो! आपल्या पुर्वजांना Tod ह्मणविणाऱ्याना हेंच विशेषण द्यावें किंवा दुसरें एखादें शोधून काढावें काय? ( तुह्माला जर तुमच्या पूर्वजांचा अभिमान असला तर व हें जें वर कांहीं सांगितलें या विषयीं तुमची खात्री असली तर एखादें विशेषण त्यांना द्या. तुमच्यावर त्याची एखादी मर्जी खपा होईल. )

( पुढें चालूं. )

# The Berar Samachar

MONDAY APRIL 2, 1888

## THE REPORT OF THE PUBLIC SERVICE COMMISSION.

The report of the Public Service Commission is out. The report and the recommendations take up two volumes. The whole number of witnesses examined is 469. The recommendations made by the commission are valuable and worthy of the statesmanship of Sir Charles Turner and his colleagues. The following are the chief recommendations. That the competative system as now established for the civil service be continued. That the minimum and maximum age for native candidates at the open examination in England be 19 and 23 years respectively. That the chief vernacular languages of India and Persia should be eliminated from the subjects of the examination and be included among the special studies of successful candidates. That the practice of allowing candidates to remain an addional year in England to take a University Degree be abolished and the covenanted civil service be reduced to a corps d'elite of a strength sufficient to fill the chief administrative posts and certain number of lower appointments so as to ensure sufficient training for the junior members. This will involve the transfer of a number of posts to a local service to be recruited provincially. The title of covenanted civil service will be changed to 'Imperial civil service of India,' the members of which will be bound to serve any where in the country. The present title of uncovenanted will be replaced by that of Provincial civil service, there being below this again a subordinate civil Service.

That some 108 reserved appointments be removed from the present schedule and that the secretary of state be given power to revise schedule from time to time after the proposed revisions have been 90 days before the Parliament. That in filling up the higher appointments which it is now proposed to exclude from the schdule regard be had to the claims of Civil Servants officers of the Staff corps, and members of the uncovenanted service, who have been borne on the list since 1869. That the provincial service be filled partly by promotion from the subordinate service and partly by recruitment. Statutory civilians will be absorbed into the Provincial service. That in the High Courts of Bombay and Calcutta the number of judges selected from the judicial branch of the Provincial service or from advocates and pleaders be increased. That a board of examiners be appointed in each Presidency to secure uniformity in examinations for the Provincial and subordinate service non official Europeans and natives being represented on such boards.

## FROM THE GAZETTE OF INDIA MARCH 24, 1888.

No. 1143- 1.—Whereas His Highness the Nizam of Hyderabad has granted to the British Government full jurisdiction within the lands in his territory which are occupied, or may be hereafter occupied, by His Highness the Nizam's Guarranted State Railways Company, by the Great Indian Peninsula Railway, by the Madras Railway, and by the Southern Maratha Railway, respectively (including the lands occupied as stations, out-buildings and for other railway purposes): In exercise of this jurisdiction and of the powers conferred by sections 4 and 5 of the Foreign Jurisdiction and Extradition Act, 1879, and of all other powers enabling him in this behalf, the Governor General in Council is pleased to issue the following orders:—

Part 1.

(1) The provisions, so far as they may be applicable, and as amended for the time being by subsequent enactments, of the Acts mentioned below, are hereby extended to the aforesaid lands, namely:—

Act XLV of 1860 (the Indian Penal Code);

Act V of 1861 [for the regulation of Police];

Act V1 of 1864 (the Whipping Act);

Act 1 of 1871 [the Cattle Trespass Act];

Act X of 1882(the Code of Criminal Procedure);

(2) The Code of Criminal Procedure shall be subject in its application to the aforesaid lands to the following modifications, namely—

(*a*) that trials before the Court of Session may in the discretion of the Judge, be without jury or aid of assessors; and

(*b*) that notwithstanding anything in the Code of Criminal Procedure (Act X of 1882) or the Police Act(V of 1861) or in any other enactment for the time being in force, the Governor-General in Council may confer on any police officer all or any of the powers conferred or conferable by or under the Code on any Magistrate, in regard to particular cases or to a particular class or particular classes of cases or to cases generally.

Part11.

For the purposes of the exercise of criminal jurisdiction within the aforesaid lands, the Governor General in Council is pleased to make the following arrangements:—

(1)There shall be a Railway Magistrate, who shall be the Second Assistant to the Resident at Hyderabad.

[2] The Railway Magistrate shall have the powers of a District Magistrate, as described in the Code of Criminal Procedure.

(3) There shall be a Superintendent of Railway Police, who shall be such person as the Governor General in Council may from time to time appoint in that behalf.

(4) The Superintendent of Railway Police shall have the powers of a District Superintendent of Police as described in Act V of 1861, and the ordinary powers of a Magistrate of the second class as described in the Code of Criminal Procedure.

(5) The Inspector General of Police in the Hyderabad Assigned Districts and the Resident at Hyderabad shall have, respectively, the powers of an Inspector General of Police and of a Local Government, as described in Act V of 1861.

(6) The First Assistant to the Resident at Hyderabad shall have the powers of a Court of Session, as described in the Code of Criminal Procedure, in respect of offences over which magistrial jurisdiction is exercised by the Raiway Magistrate or the Superintendent of Railway Police.

(7) The Resident at Hyderabad shall have the powers of a High Court, as described in the Code of Criminal Procedure, in respect of all offences over which the jurisdiction of a Court of Session is exercised by the First Assistant to the Resident, and for all purposes whatsoever connected with the administration of Criminal justice.

(8) This part of this Notification applies to all proceedings except—

(*a*) proceedings against European British subjects, or persons jointly charged with European British subjects; and

(*b*)proceedings pending at the date of this Notifiation, which should be carried on as if this Notification had not been issued.

No.1144—Whereas His Highness the Nizam of Hyderabad has granted to the British Government full jurisdiction within the lands in his territory which are occupied, or may be hereafter occupied, by the Nizam's Guaranteed State Railways Company, by the Great Indian Peninsula Railway, by the Madras Railway and by the Southern Maratha Railway, respectively (including the lands occupied as stations, outbuildings and for other railway purposes): In exercise of this jurisdiction and of the powers conferred by sections 4 and 5 of the Foreign Jurisdiction and Extradition Act, 1879, and of all other powers enabling him in this behalf, the Governor General in Council is pleased to issue the following orders:—

Part 1.

The provisions, so far as they may be applicable, and as amended for the time being by subsequent enactments, of the Acts mentioned below are hereby extended to the aforesaid lands, namely:

Act XXV11 of 1860. (*For facilitating the collection of debt on successions and for the security of parties paying debts to the representatives of deceased persons.*)

Act X of 1865 [the Indian Succession Act, 1865];

Act X1V of 1866 (the Indian Post office Act, 1866);

Act V11 of 1870 (the Court Fees Act);

Act 1 of 1872 [the Indian Evidence Act, 1872];

Act 1I1 of 1877 (the Indian Registration Act);

Act XV of 1877 (the Indian Limitation Act);

Act 1 of 1879( the Indian stamp Act);

Act V of 1881 (the Probate and Administration Act, 1881);

Act X1V of 1882 (the Code of Civil Procedure):

Act XI1I of 1885 (the Indian Telegraph Act, 1885);

Act 1X of 1887 (the Provincial Small Cause Courts Act, 1887).

## वऱ्हाड

मे० कर्नल ग्रांट साहेब डे. क. व मे० कंबरलीज साहेब पो० सु० हे लवकरच रजेवर जाणार म्हणून येथें वऱ्हाडांतील माजी अ. क. दस्तुर बहिरामजी जामासजी सी. आय. ई. यांनीं एक मोठी मेजवानी दिली. गांवांतील बडी बडी संभावीत मंडळी ही मेजवानीस होती.

आकोलें येथील नायब तहसिलदारीचे जागेवर रा. रा. माधवराव रामचंद्र सब रजिस्ट्रार मुर्तिजापुर यांची नेमणूक झाली, ह्या जागे करितां येथील डे. क. आफिसांतील कित्येक क्लार्कांनीं अर्ज केले होते पण ते मराठी आफिसांतील नाहींत म्हणून ते नामंजुर झाले. डे. क. च्या आफिसांतील लोकांपेक्षा रजिस्ट्रेशन खात्यांतील लोकांस नायब तहतहसिलदारीचे काम जास्त चांगले ठाऊक असतें.

गेले आठवड्यांत मलकापूर व बिसवा या दोन स्टेशनांच्या मध्यें एका माल गाडीस अपघात झाला. हा अपघात उतारुंचे गाडीसच व्हावयाचा पण सुदैवानें त्या गाडीस उशीर झाल्यानें तो टळाला.

गेल्याचे मागील रविवारीं उमरावतीस हमाल पुऱ्यांत आग लागून पुष्कळ झोंपडीं जळालीं व एक मनुष्य भाजून मेला.

क्यापटन् वारन् हेस्टिंग्ज पूर्वी वऱ्हाडचे स्पे० अ० क० हे रजेवर गेले व त्यांचें काम तूर्त मि. इलियट अ. क. हे पहात आहेत.

मे. कमिशनर साहेब नवीन रेसिडेंट साहेबांची भेट घेऊन गेले आठवड्यांत उमरावतीस परत आले. समक्ष कित्येक महत्वांच्या गोष्टींचा निकाल झाला ह्मणून म्हणतात. कायतें लवकरच समजेल.

कर्नल लेन साहेब ज्यु. क. यांनीं आणखी तीन महिन्याची रजा घेतली.

कर्नल ग्रांट साहेब येथील डे. क. रजेवर गेल्यावर त्यांचे मागें येथें इलीयट सा. अ. क. हे डे. क. चें काम पहावयास येणार असें ठरल्याचें समजतें.

उमरावतीचे लोकलफंड इंजिनियर मि. मेर यांनीं ता. १ एप्रील पासून पेनशन घेतलें असें म्हणतात.

## वर्तमानसार

 Per [annum in arrears 7

नर्मनीदेश जो व्यापाराचा माल तयार करण्याच्या कामांत इतका प्रख्यांत झाला व त्याची बरोबरी कोणत्याही देशाच्यानें करवत नाहीं याचें कारण उत्तम मानसिक शिक्षणाव र कलाकौशल्यांच्या शिक्षणाचें कोंदण बसविलें आहे हें होय असें प्राफेसर फारेस्ट हे आपल्या व्याख्यानांत बोलले. याजवरून येथें मानसिक व कलाकौशल्य या दोनही शिक्षणाचें मिश्रण पाहिजे असें सिद्ध होतें.

निजाम सरकार व इतर राजेरजवाडे यांणीं सरहद्दीच्या संरक्षणाच्या मदतीस देणग्या देण्यांचें कबूल केलें. त्या देणग्याच्या संबधानें अद्यापि निर्णय झाला नाहीं असें सर जान गास्ट यांणी पार्लमेंटास विचारल्यावरून, कळविलें.

स्थानिकस्वराज्यव्यवस्थेविषयीं कायद्याचा मसुदा पार्लमेंटसभेपुढें सादर झाला असें लं० च्या ता० २० च्या तारेवरून समजतें.

इराणचे शाहा सन १८८९ सालीं पारीस येथें जें प्रदर्शन होणार तें पाहण्याकरितां रशिया व जर्मनीकडून फिरत जाणार असें ह्मणतात.

गतवर्षी मद्रास इलाख्यांत विजगापट्टमच्या पोलिस स्टेशनाच्या जवळ माणसें मारणारा वाघ सोकावला होता. त्याणें अठरा माणसें मारलीं होतीं. शेवटीं त्यास मारण्याकरितां २०० रु० बक्षीस देण्याचें सरकारानें कबूल केलें होतें. यंदा त्याच तालुक्यांत दोन असेच वाघ आहेत त्यांणी २३ माणसें मारलीं. सबब कलेक्टरांनीं बक्षिसें लावण्याविषयीं सरकारांस सुचविलें आहे. काय हा रयतेस निःशस्त्र करण्याचा भयंकर परिणाम!!!

मद्रास येथील एक श्रीमान युरेजियन गृहस्थानें कांहीं एतद्देशीय श्रीमान गृहस्थाची मदत घेऊन शेतकरी लोकांकरितां आग्रिकलचरल ब्यांक काढण्याचा उद्योग चालविला आहे असें समजतें.

हिंदुस्थानामध्यें हल्लीं २१,४८,२२८ ख्रिस्ती धर्मानुयायी लोक आहेत असें समजतें.

निजामसरकारानें साठ लक्षाची देणगी देण्याचें कबूल केलें त्याजबद्दलच्या खटपटीचे प्रकार हळहळु बाहेर यावयास लागले आहेत. या मसलतींत कर्नल मार्शल यांचें विशेष अंग होतें असें दिसतें. याची नमणूक व्हाईसराय लार्ड डफरिन यांच्या वेरणान झाली होती असें वाटतें.

न्यु साउथ वेल्समध्यें अद्यापपर्यंत घुशींचा अतिशय उपद्रव आहे व त्यांच्या नाशाचा उत्तम उपाय दाखवून देणारास अडीच लक्षाचें बक्षीस मिळेल असें ता० २० मिनहुच्या आडवाकेट आफ इंडियामध्यें लिहिलें आहे.

येत्या कांग्रेसकरितां उद्योग— आम्हांस लिहिण्यास आनंद वाटतो कीं यंदा अलाहाबाद येथें कांग्रेस भरावयाची याजकरितां एक कमिटी नेमिली जाऊन जाग्याच्या वगैरे उद्योगास ती कमिटी लागली. कामिशनर याजकडे मंडळी जाऊन भेटून खसरू बागेची जागा मिळण्याची तजवीज झाली. तेथें तंबू देण्याचा विचार आहे.

आम्हांस लिहिण्यास दुःख वाटतें कीं, दक्षिणप्रांतांतील प्रसिद्ध हरिभक्तिपरायण गोविंदबाबा नाशिककर, हल्लींचे श्रीमत् तारकाश्रम स्वामी, हे श्रीक्षेत्र काशी येथें आदिक चैत्र शुद्ध २ बुधवार रोजीं समाविस्त झाले. हें वर्तमान ऐकून महाराष्ट्र प्रांतांत व उत्तर हिंदुस्थानांत पुष्कळ लोकांस वाईट वाटेल. मरण समयीं यांचे वय सुमारें ७६ वर्षांचें होतें. पूर्वाश्रमी कीर्तनाविषयीं यांची मोठी प्रसिद्धी होती.

व्हाइसराय साहेबांस मानपत्र— गेल्या गुरूवारी कलकत्ता एथील टौनहाल मध्यें जाहीरसभा भरून लार्ड डफरिन यांस मानपत्र देण्याचें व त्यांचा पुतळा करण्याचें ठरलें. हल्लींचा काल मोठा चमत्कारीक आहे. काय होईल व काय न होईल याचा नेम नाहीं. लार्ड डफरिन सुखी होवोत ह्मणजे झालें. सु० प०

काश्मीरचें राज्य लवकरच खालसात करण्यांत येणार आहे अशी काश्मीर शहरांत गप्प उठली आहे, ही गप्प खोटी ठरते असें आह्मी मनापासून इच्छितों.

गेल्या रविवारी संध्याकाळीं शत्रुचा आमचा सिक्किमजवळ सामना झाला.

आपल्याविरुद्ध लेख लिहिल्यामळें बरमिंगहाम येथील एका डिटेक्टिव पोलिसानें एका पत्राच्या लेखकाचा त्याच्या खोलींत खून केला. वर्तमानपत्राच्या लेखकांचें जीवित्व किती धोक्याचें आहे. तें पहा.

अझमघर येथें एक ताम्रपट सापडला आहे, स्थानेश्वरचा हर्षवर्धन नांवाच्या राजानें कित्येक ब्राह्मणांस एक खेडें इनाम दिलें आहे असें त्या पटावर लिहिलें आहे, शिवाय ह्या पटावर हर्षवधन राजाचा वंशवृक्ष दिला आहे, काश्मीर व नेपाळ यांसह या राजानें सर्व उत्तर हिंदुस्थानावर इ. स. ६१८ पासून ६४२ पर्यंत राज्य केलें होतें, याचें दरबार भरण्याचें ठिकाण कनोज होतें व या राजाची इ. स. ६३७ त एका चीन यात्रेकरूची व या राजाची भेट झाला होती. हा तांम्रपट वायव्य सरकारेंने विकत घेऊन लखनौचा प्रदर्शनांत ठेविला आहे.

आमच्या इकडे हिंदुलोक गंगेची व तुळशीची शपथ घेतात पण असामच्या सरहद्दीवर बंदुकीची व वाघाच्या दाताची शपथ घेण्यांत येते. निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या चाली असतात. त्यावद्दल इंग्रजी पत्रांनीं नाकें मुरडण्याचें कांहीं एक कारण नाहीं. वायबलाचा मुका घेण्याची रीत दुसऱ्या लोकांस विलक्षणच वाटते.

गुलामांचा व्यापार वाढूं नये ह्मणून आह्मी सोकीम स्वाधीन करून घेतलें आहे व तो व्यापार तसाच चालावा ह्मणून उसमानडिगमा हा सोकीमवर स्वारी करीत आहे. तरी पण आमचा राज्यकारभार इजिप्तांतील लोकांस आवडत नाहीं. असें विचारल्या प्रश्नाचें उत्तर देतांना लार्ड सालिसबरी यांनीं बोलून दाखविलें.

आमचे जाणगे व्हायसराय साहेब कलकत्याहून सिमल्यास जाण्याकरितां ता. २९ मिनहु रोजीं निघतील ते वाटेंत रेवा, लखनौ, मुरी, श्रीनगर अंबाला आणि नेनजोर या ठिकाणीं उतरून नंतर ता: ९ मे रोजीं सिमल्यास जातील.

खर्चवेंच जाऊन बाकी पैसा राहील तो मी सरहद्दीचें संरक्षण होण्याकरितां तुमच्या स्वाधीन केला आहे असें होळकरांनीं इंग्रज सरकारास कळविलें आहे. इतकेंही करून होळकर न,वडताच ना!

अफगाण सरहद्दीमुळें हिंदुस्थानचा खर्च फार वाढत आहे त्यामुळें करावर कर बसविण्यांत येत आहेत आणि दारूच्या विक्रीपासून लोकांचें फार नुकसान होत आहे. असें गेल्या १४ व्या तारखेस मि. ल्यांग यांनीं पार्लमेंट सभेंत बोलून दाखविलें परंतु हिंदुस्थानच्या कमनशिबामुळें हें ह्मणणें फक्त ७२ असामींनींच कबूल केलें व १२२ असामींनीं नाककबूल केलें. हलवायाच्या घरावर जर ब्रह्मार्पण होत आहे तर न्यायाकडे हे इंग्रज लक्ष देतील काय? दारूच्या व्यापारांचो वृद्धी होत आहे. आणि ह्मणून धोका येण्याचा संभव आहे ही गोष्ट हिंदुस्थानचे सेक्रेटरी कबूल करीत नाहींत. आज दारूबद्दल जिकडे तिकडे किती ओरड चालली आहे. पण आमचे स्टेट सेक्रेटरी तिकडे लक्ष देणार नाहींत तर त्यांस डोळे उघडे असून झोंप आहे कीं काय? स्वहित असलें ह्मणजे झोंप यावयाचीच. ठा० अ०

पोर्टी व ब्रिटिश यांजमध्यें तहनामा होऊन इंग्रजांनीं इजिप्त देश एप्रिल १८८९ चे आत सोडून देण्याविषयीं कबूल केलें आहे.

लंदन शहरीं १४००० लोकांचा व्यवहार वर्तमानपत्रें, पुस्तकें, मासिक पुस्तकें वगैरे लिहिण्याचा आहे व त्यावर ते चांगल श्रीमंत स्थितींत आहेत.

आजपर्यंत हैद्राबाद दरबारांत वर्तमानपत्राची बातमी टिपून घेण्याची वहिवाट नव्हती; आतां त्याकरितां मुद्दाम इकडल्याप्रमाणें एक रिपोर्टर नेमिल्याचें समजतें.

आयुबखान आपल्या मित्र मंडळी समवेत गेल्या सोमवारीं कराची येथें दाखल झाले. आतां बंगलोरच्या किल्ल्यांत येऊन पडणां! न्या० सि०

वाडी हालफाच्याजवळ इंग्रज लोकांची एक छावणी होती तिजवर इजिप्तच्या लोकांनीं हल्ला करून एक लेफटनंट व दोन शिपाई यांस धरून नेलें असें कालच्या ता. २६च्या तारेवरून समजतें.

शूर ब्राह्मणी—कलकत्ता येथील एका पत्रांत पुढील हकीकत लिहिली आहे— बराकपूरच्या शेजारी रंगपूर नामक गांवा एका ब्राह्मण जमीनदाराच्या घराव गेल्या ७ व्या तारखेस रात्रीं ५० दरवडेखोरांची एक टोळी आली. घरांतील सर्व पुरुष लग्नास बाहेर ठिकाणीं गेले होते. घरांत एक पहारेकरी व बायका मात्र होत्या दरवडेखोरांनीं पहारेकऱ्याचे हात पाय बांधून त्याचा गोळा करून ठेविला आणि घरांत घुसले. तव्हां आनंदादेवी ह्मणून ४० वर्षांची स्त्री घरांत होती तिनें हा अनर्थ पाहिला; परंत ती न डगमगतां घरांत बकऱ्या वगैरे बळी देतांना त्याची मान उडविण्याचें एक जाज्वल्य व भव्य शस्त्र होतें. तें हातीं घेतलें, आणि दरवडेखोरांचा समाचार घेण्यास सुरुवात करून चोरांस टोले देऊन गोंगाट करण्याविषयीं दुसऱ्या बायकांस वगैरे तिनें उत्तेजन दिलें. तो गोंगाट शेजारीं लग्न होतें तेथील वऱ्हाड्यांच्या कानीं गेला. तेथून मंडळी येणार त्याच्या पूर्वींच चोरांनीं ताटा कापली! अशा रीतानें पराक्रम केल्यामुळें केवढा तरी विलक्षण प्रसंग टळला. अशा धैर्यादात्त स्त्रिया फारच दुर्मिळ.

स्त्रियांस फटके मारल्याबद्दल बतर्फी. दोन ब्रह्मी बायांजवळ छपविलेलीं हत्यारें सापडलीं. त्याबद्दल एका पोलीस इन्स्पेक्टरानें त्यांस फटके मारले. हें प्रकर्ण ब्रह्मदेशाच्या चीफ कमिशनरापुढें गेलें तेव्हां बायांस फटके मारणारा पोलीस कामगार बेवकूफ होय. असें लिहून त्यांनीं त्यास बडतर्फी दिली. तं. मि.

२३ लक्षांचा खार— सुमारें २० वर्षां पूर्वीं "इस्टइंडिया इरिगेशन आणि कनाल कंपनी" पासून ८॥ पावणे नव कोटीस हिंदुस्थान सरकारानें कित्येक कालवे विकत घेतले. हे खालच्या बंगाल्यांत आहेत. हें घेतले तेव्हां अगदीं कसोशीनें दरसाल १६ टक्के व्याज पडेल अशी आकारणी केली होती. खर्च झालेल्या रकमेवर दरसाल २३ लक्ष रुपये व्याज उत्पन्न झालेंच पाहिजे सन १८८६।८७ सालची या कालव्याच्या जमेचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे त्यावरून १३ लक्ष रुपये जमा झाले असें दिसतें. यांतून नेहमींचा खर्च वजा जातां अर्धा लाख शिलक राहते; पण या कालव्याच्या संबधानें रोव्हेन्यु खात्यांत जो खर्च पडतो तो इकडे घातला तर लाख सवालाख तोटाच येईल. ही या कालचा स्थिति आहे असें समजूं नका यापैकीं कित्येक कालव्यांपासून आज कित्येक सालें व्याजा पुरता जमीन झाल्यामुळें कांहीं कालव्यांवर ५० लक्ष, कांहींवर ७५ लक्ष, कांहींवर १०० लक्ष अशा वाढलेल्या व्याजांच्या रकमा त्यांच्या नांवें मांडून ठेविल्या आहेत सरकार दिवाळखोर नारायण मग कालव्यांनी का होऊं नये? या ८॥ कोटींचें व्याज २३ लक्ष रुपये नेहमींच्या वसुलांतून भरावे लागत आहेत. हा रयतेवर केवढा बुर्द!!! दरसाल दरशेंकडा १६ टक्के व्याज पडेल अशी आकारणी करणारांनीं कशी केली आणि वरिष्टांनी कशी कबूल केली? दोघांच्या हा तोंडांत कोणी गुळ खोबरें घातलें नव्हतें मग असें कशानें झालें हें कोण सांगू शकेल!

एका शहराचा नाश— इलिनॉइस (अमेरिका) प्रांतातील माउंट व्हर्नन शहर प्रचंड वावटळीनें साफ नाश पावलें. ही वावटळ ५०० यार्ड रुंद आणि कित्येक मैल लांब होती. हींत सांपडून ३३ मनुष्यें ठार झालीं, १९ मरण्याच्या पंथांत आहेत, आणि १०० अतिशय दुखावले आहेत ५०० लहान मोठ्या इमारती जमीनदोस्त होऊन सुमारें ५००,००० डालरचें नुकसान झालें.

भयंकर मनुष्य संहार— चिनांतील युनान व झाओचेन या प्रांतांत मोठा भूकंप होऊन पुष्कळ शहरांचा नाश झाला. सुमारें २० हजार माणसें मेलीं.

महामारी— या बयाची फेरी आली ह्मणजे लोक फार घाबरतात हैद्राबाद रेसिडेन्सि सर्जन डाक्टर लावरी यांनीं पुष्कळ दिवस अनुभव घेऊन असें सिद्ध केलें आहे कीं माहामारीचा रोग सुरू असतां प्रत्येक मनुष्यानें जेवणापुर्वीं १॥ दीड गुंज कोयनेल पोटांत घ्यावें ह्मणजे त्यांस पटकीचा आजार कधींही व्हावयाचा नाहीं. गु० सू०

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साहामाही ॥ १ ॥ ०८
साल अखे ५ ॥ १ ०१८
किरकोळ अंकास ........................०४

नोटिशी बद्दल.
१० ओळीच आंत रु. १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस...... ०१

Per annum in arrears 7 .. 1R. 8 as
Six monthly ........... 3 " 8 a
Single copy .......................... 4 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

Advertisements.
Below 10 lines...
Per line over 10... 4a.;
Repetition per line...3

VOL. XXII AKOLA MONDAY 9 APRIL 1888 NO. 14

वर्ष २२ अकोला सोमवार तारिख ९ माहे एप्रील सन १८८८ इ० अंक १४


## जाहिरात.

टपाल खर्च ०४ आणे.
किंमत एक बाटलीस १॥ रुपया.
औषधी सोबत कागद व चमचा.

फक्त एकाच औषधी पासून खालीं लिहिलेले सर्व प्रकारचे रोग दूर होतात, व त्या संबंधानें झालेला पत्रव्यवहार व सर्टिफिकिटें स्थलसंकेतवास्तव न देतां रोगांचीं नांवें मात्र दिलीं आहेत. उपदंशजन्य, गरमीचे अनेक प्रकारचे रोग, धातु, खर, स्त्रियांस धुपणी लागते ते रक्त दूषित झाल्यापासून हातांपायांवर डाग पडणें, सर्व त्वचेचे रोग कच्चा पारा सेवन केल्यानें सूज येणें, कळा लागणें, व सर्व प्रकारचा संधीवायु, गंडमाळा, पिनस, जळवात, कडकी आम्लपित्त, पोट शूळ, पांढफुगी, नळवायु, मस्तकशूळ व मुखरोग जिभेवरील चट्टे, दातांतुन पू येणें, रक्त येणें व तोंडाची दुर्गंधीआदिकरून सर्व रोग वरील औषधानें दूर होतात.

पत्ता—मुंबई फणसवाडींत बाळकृष्ण भिवाजी नाखवा यांचे चाळींत
डा. धाकजी भानजी सांवत.
Dr. D. B. Sawant.
30-12 1887


## नोटीस

नारायण वल्दद महादाजी काकड रहाणार शेल परगणे मूर्तिजापूर तालुके अकोले. यास नोटिस किसन वल्दद परणाजी बेलदार रहाणार शेल. नोटिशीनें असें कळवितों कीं, तं आमचेपासून दाणे मण अकरा सवाईच्या बोलीनें बारा महिन्यांच्या करारानें घेतलेस त्यास बारा महिने झाले दाणे मागितले तर देत नाहींस याज करितां नोटिशानें असे कळविलें जातें कीं, नोटिस पावल्यापासून एक महिन्याचे आंत अकरा मण घेतलेले दाणे व त्याची सवाई पावणे चार मण मिळून पावणे चवदा मण दाणे. व ह्या नोटिशीचा खर्च आणून द्यावा, असें न केल्यास रीतीप्रमाणें कोर्टांत दावा करून निकाल होईपर्यंत जें नुकसान वगैरे होईल तें सर्व भरून घेतलें जाईल ह्मणून दिली नोटिस. कळावे.

तारीख ४ माहे एप्रील सन १८८८ इ०
( सही )
( सही ) किसन वल्दद परणाजी
बेलदार रहाणार शेल

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळून असतील असें समजूं नये.

मुक्काम वऱ्हाड ता० ३१।३।८८

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांसः—

कृतानेक साष्टांग नमस्कार वि० वि० पत्रकर्ते राव रक्तपिती ह्या रोगाची गणना मोठ्या असाध्य रोगांमध्यें केली आहे. पूर्वार्जित जसा ठेवा असेल त्याप्रमाणें ह्याची प्राप्ती असेल. ह्या रोगाचा इतका भयंकर प्रभाव आहे कीं दुर्दैवानें ज्याजवर ह्याची धाड पडते त्याच्या जन्माचें मातेरें होतें. पूर्वीं अशी चाल असे कीं अशा रोगानें मनुष्यग्रस्त झालें कीं त्याला अगदीं गांवाबाहेर ठेवीत असत. त्याचें वारें अगदीं कोणास लागावयाचें नाहीं. कारण हा रोग स्पर्शजन्य आहे अशी याची ख्याती आहे. ह्मणून [illegible] स्पर्श न व्हावा व रोगाचा फैलाव न [illegible] ून त्याच्या वरचीं मनुष्यें, सरकारचे अधिकारी व इतर लोक जपत असत. अजूनही सरकार या विषयीं फार जपतें. लेपर लोकांकरितां निराळीं घरें बांधून त्यांची व्यवस्था ठेवितें असें पुष्कळ ठिकाणीं आढळेल. जेव्हां दैवयोगानें ह्या रोगाचा छाया मनुष्यावर पडते तेव्हां ग्रहून ग्रासिल्यावर जशी चंद्राची स्थिती होते त्याप्रमाणे त्याची स्थिती होते. बिचाऱ्याला सर्व जग व त्यांतील सर्व मृत्यु प्रमाणें भासूं लागतें. आप्त, मित्र त्याचा त्रास करूं लागतात व घरचीं माणसेंही त्याचा त्रास करूं लागतात. अशा प्रसंगीं मरण येईल तर फार बरें असें बिचाऱ्यास वाटूं लागतें. मनोवृत्ती सर्व उदास होतात. सर्व ज्ञान निष्फळ होऊन घडोघडी मृत्यूचीच वाट पहात बिचारा रहात असतां त्याच्या शरीराची अत्यंत नीचस्थिती होऊन बिचाऱ्याचें सर्व जिणें व्यर्थ होतें. याप्रमाणें ह्या रोगाचें सर्व स्वरूप असतें. ह्या रोगावर आजपर्यंत कोणी औषध शोधून काढिलें नाहीं व त्यापासून गुण आला असेंही झाल्याचें ऐकिवांत नाहीं. मागें कैलासवासी प्रसिद्ध भाऊ दाजी डाक्टर मुंबापुरस्थ यांनीं हजारों रुपये खर्च करून एक औषध शोधून काढिलें होतें परंतु त्याजपासून कांहीं फायदा झाल्याचें ऐकिवांत नाहीं व त्याच्या पश्चात त्या औषधाचा पुनः शोध कोणी केल्याचें कळत नाहीं. तात्पर्य कीं ह्या रोगावर औषध ह्मणून नाहींच ईश्वरी अवकृपेनें हा उत्पन्न होतो व त्याच्या कृपेशिवाय जावयाचा नाहीं हा सिद्धांत पत्रकर्ते राव ह्या रोगाचें स्वरूप आपल्या लक्ष्यांत आलेंच असेल. आतां ज्याजवर ह्याची गदा बसली असेल त्याने किती जपलें पाहिजे हें सांगावयास नकोच असें असतां एक मोठा मनुष्य ह्या वऱ्हाड शाळाखात्यांत आहे. त्याजला परीक्षा वगैरे घ्याव्या लागतात. तो मुलांमाणसांत मिसळतो. त्याजवर ह्या रोगाची छाया पडून बरेंच दिवस झाले व दिवसानुदिवस त्या रोगाची वृद्धि होत चालली आहे. आतां अशा मोठ्या मनुष्यावर अशा प्रकारच्या रोगाची गदा बसणें व ती भर उमेदीच्या दिवसांत व तेणेंकरून बिचाऱ्याच्या अलौकिक संपादन केलेल्या विद्येचें मातेरें होणें व लोकांत मानहानी होणें याजबद्दल फारच फार वाईट वाटतें. तरी हा स्पर्शजन्य रोग आल्यामुळें व ह्या गृहस्थाचा रोकडा हितकरू मुलांशीं व मास्तराशीं संबंध पडत असल्यामुळें कदाचित न जाणों स्पर्शाच्या योगानें याचा प्रादुर्भाव होण्याचा संभव असतो. हे गृहस्थ शाळेंत गेल्यावर खुर्चीवर बसतात. शाई, लेखणी, दौत बुकें वगैरे सर्व शाळेंतील सामान यास त्यास हात लावावा लागतो. मास्तरांचें सर्व दाणापाणी त्यांच्या हातांत असल्यामुळें ह्या गोष्टी मनांत येतात. व कंटाळा येतो तरी बिचारे पोटांत कांच्या घालण्या करितां मुकाट्यानें टेबलाजवळ स्पर्शाची भीति मनांत न आणतां उभे रहातात. ही वर हकीकत लिहिली आहे यांची पेनशनची वर्षें भरलीं असल्यास हे गृहस्थ पेनशन घेऊन जाऊन स्पर्शजन्य रोग भीतीपासून मास्तरांना व मुलांना मुक्त करतील तर फार बरें होईल. दयाळु शाळाखात्याचे डायरेक्टर मायबाप ह्या गोष्टीकडे लक्ष्य पुरवतील काय. कृपा करून छापावा.

आपला मित्र
"क्ष"

मुक्काम रिसोड ता० १।४।८८

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांस

कृतानेक साष्टांग नमस्कार वि० वि० बिचारे साधु [illegible] तर काशिनाथपंत यांनीं पेनशन घेऊन अखेर त्रासांतून मुक्त झाले. हे नाशिकाचे रहाणारे. हे मेहेकरास २५ पंचवीस वर्षें होते. पुढें तितक्याच पगारावर देऊळघाट येथें यांचा बदली झाली तेथें असतां यांनीं एक वर्षभर नुसतें दूध पिऊन उपास केले. काशी यात्रा वगैरे केली. पुढें त्यांची बदली तऱ्हाळास झाली तेथें बारा वर्षें होते. तेथून त्यांची बदली दीड वर्षांपूर्वीं येथें झाली. येथें आल्यापासून त्यांस अ. मास्तर लोकांनीं इतका त्रास दिला कीं त्याबद्दल आपल्या पत्रांत हकीकत मागें छापली आहेच. बिचारा शांत वृत्तीचा असूनही त्याची पादल उडाली. जर का एकादा गडबड्या व तामसी स्वभावाचा असतां तर अशा त्रासाच्या समई संन्यास घेतां यांत संशय नाहीं. श्रीराम कृपेनें मरो तापांत झाला होता तरी रिसोडास राहून आपलं बऱ्याच बरें होणार नाहीं तेव्हां पेनशन घ्यावें हें बरें असें वाटून बारामास जाऊन सिव्हिलसर्जन साहेब बहादूरचें नोकरी विमुक्त होण्याचें सर्टिफिकिट आणून देऊन कामांतून व त्या बरोबर त्रासांतून मुक्त झाले हें फार बरें झालें असें आमचे ग्रामस्थ लोक बोलतात. पुढें कदाचित असल्या साधु पापभीरू मास्तरांचा सुपरिणाम झाला नसता. ह्यानीं काम सोडून बरेच दिवस झाले अजून दुसरा कोणी हेड मास्तर नेमून आला नाहीं तेव्हां पुढें शाळेची गत कशी होणार हें कळत नाहीं पूर्वी १५४ मुलें होतीं. आतां सरासरी नवीन फीचे दर अमलांत आल्यामुळें पन्नास मुलें निघालीं आतां जरी मोठा कारस्थानी सात हातांचा मास्तर आला तरी ती शाळा पुनः जमेल असें वाटत नाहीं. नवीन फीचे दर गेल्या डिसेंबर पासून अमलांत आले परंतु आमच्या येथें डिसेंबर महिन्यांत त्याची वार्ताही नव्हती. व कित्येकांचा समज असा होता कीं आमची शाळा वाढलेल्या फीच्या तडाक्यांतुन बचावली. परंतु ज्यानें वरील महिन्यांत एकदम दोन महिन्यांची फी सबब कोणत्याही प्रकारची न सांगतां वसूल करून भरावी असा हुकूम झाल्याचें एकदम बाहेर आले. तेव्हां डिसेंबर महिन्याची फी वाढलेल्या दराप्रमाणें बाकी राहिलेली मास्तर लोक मागूं लागले तेव्हां ती वसूल झाली की कोण जाणे परंतु मुलांची संख्या एकदम शंभरावर येऊन ठेपिली. आतां दोन महिन्यांच्या फीची मागणी झाली ती मुलांच्यानें एकदम कबूल करविली नसेल हे उघड आहे. तेव्हां डिसेंबरच्या फीची व्यवस्था कशी झाली कोण जाणे. व आलिशान रेसिडेंट साहेबांची नवीन दरा प्रमाणें फी वसूल करण्याचा हुकूम डिसेंबर पासून असून त्या महिन्यांत फी वसूल करण्याची अमलबजावणी कां झाली नाहीं हे कोण जाणे. तात्पर्य. आमची रिसोडची शाळा चांगली असून अशा प्रकारें बिघडली त्या बद्दल जबाबदारी कोणावर याचा कोणी खुलासा करील काय? वेळच्यावेळीं सरक्युलर अमलांत न आणणारावर कीं दोन महिन्यांची फी वसूल करून नंबर कायम न राखिल्या बद्दल मास्तरांवर वाटेल तर दावा करावा. हे विनंती

आपला रिसोडस्थ.
"क्ष"

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांस

सा० नमस्कार वि० वि० आपणाकडे खालील गुरुशिष्यांचा काल्पित संवाद पाठविला आहे तरी त्यास आपल्या जगमान्यपत्रीं एखादें कोपऱ्यांत जागा द्याल अशी आशा आहे.

स्थळ— मटारपूर हायस्कुलांतील एक खोली.

पात्रें.

आनंदराव तात्यासाहेब—फर्स्ट अ० मास्तर
कुजटराव फडके — सेकंड अ० मास्तर
प्रभाकर— सुभेदाराचा मुलगा } विद्यार्थी
दगडापूरकर— }

( प्रभाकर मोठ्या सकाळीं एकटा वर्गांत बसून तोंडानें कांहीं गुणगुणत व हातानें डेस्कवर वाजवित बसला असतां दगडापूरकर पुस्तकें हातांत घेऊन येतो. )

प्रभा० ( त्याजकडे पाहून ) कमॉन मि० दगडापूरकर कसें काय? आजतर स्टडीज अगदीं सोळा आणे असतील अं? दग० वः तें काय विचारितां; सव्वा सोळा आणे. दोन वर्षें + + घसडून आतां ही अभ्यास चांगले राहणार नाहींत? तुमची आहे बुवा चैन. कारण तुम्ही पडली फर्स्ट इअर स्टुडंट. आमची काय रोज उडतोच आहे. "रोज मरे त्याला कोण रडे" अशी तर आमची स्थिती.

प्रभा० खरेंच बुवा. एखाद्याचा स्वभावच

चमत्कारिक. काल कुजटराव हे हांसतहांसत जे दोनचार टॉटिंग वर्ड्स तुम्हाला बोलले तें कां त्यांना योग्य होते?

दग० त्यांत हो काय? त्यांना कोणाची उडवावयाची असली कीं लागलाच आपला मर्मभेद वस्तारा आंतील गांठ शिळे वर पाजळून. कुजटपणाचे चटपटण्यावरून एक दोनदां चटपट चटपट केली कीं झालीच गुळगुळीत. स्वारीचा या कामांत हात कसा अगदीं खडा! छे बुवा आजपर्यंत पुष्कळ हा यस्कुलें धुंडली पण असा दिव्य हिरा नाहीं कोठें आढळला!

प्रभा० हो आहे खरें असें. बिचारा एकदां बोलायला लागला कीं नाकांतील केस खाक होतात. असो तो आपल्या कामांत आहे झाले साधारण बरा. मुलांस वागविण्याचे कामांत हेडमास्तर साहेब!

दग० ते काय सांगतां. मि० फडके व त्यांची तुलना करूं गेलों असतां "कोठें इंद्राचा एरावत व कोठें शामभटाची तट्टाणी" ह्या ह्मणीला मात्र येथें महत्व द्यावें लागतें. काय ते हेडमास्तर साहेबांचें थोर मन! केवढा दयाळू स्वभाव! काय ती टीचिंगची ढब! मनांत भरवून देण्याच्या व वागविण्याच्या संबंधानें तर त्यांची खरोखर शागिर्दीच केली पाहिजे. आमचे मि० फडके यांनीं शिक्षक राहिलेल्या हाडांचीं काडें करून दुःसाध्य कष्ट केलें तरी वरील कोणत्याही गोष्टींत हे० मास्तर साहेबांच्या नखांची सुद्धां यांना सर येणार नाहीं. कांहीं अंशी तात्यासाहेब मात्र त्यांचे धर्तीवर आहेत.

प्रभा० आहे खरें. वर्गांत इतकी दांडगाई चाललेली असते परंतु कधीं उठलेत कीं कोणाला थापड मारली, छे! कधीं नाहीं! नांवाप्रमाणें करणी. खरा आनंदी स्वभाव! नाहींतर हे आमचे मि० फडके असें कांहीं झालें कीं उठलेनी लगावलीच श्रीमुखांत!! आमच्या तात्या साहेबांची टीचिंगची सिस्टम मात्र जरी गडबडीची कां नसती तर यो पांचपन्नास केसांत असा नेटिव टीचर निपजणें कठीणच.

दुग० जाऊं द्या बुवा ही कपाळ कटकट उगीच कोणी ऐकिलें बिकलें कीं "हेक ह्मणतां ब्रह्महत्या" घडण्याची पाळी यायाची मी या कमांला फार भितो. अरे हें बघ एकानएक यायला लागले.

( इतक्यांत घांट वाजून वर्ग सुरू होतात, व एक दोन तास संपून पुढें म्याथेम्याटिक्सच्या आवरामध्यें पांच पंचवीस उदाहरणें झाल्यानंतर मि० फडके यांचे विषयाला आरंभ होतो, आणि प्रभाकर व दगडापूरकर यांचे नंबर एकमेकांजवळ आल्यामुळें ते आपसांत बोलतात.)

प्रभा •— ( हळूच ) कांरे बुवा विचार काय चालला आहे? हें चाललें पुराण तुला समजत नाहींसें दिसतें. जरा डोकें त्यांत शिरीव.

दगडा •—काय गड्या डोकें काय घालायला सांगतोस! मधांशीं त्या एक्झरसाईजच्या संबंधानें दिसलेल्या "दुकानाच्या शोभेकडे मन लागलें आहे. दुसरें काय असायाचें आहे.

प्रभा •—बरें तें असो. कांहीं तुझी परीक्षेकरितां "पार्शिअन घेणार" आहां असें ऐकिलें आहे हें खरें कां?

दगडा •—होय आहे विचार. थोडथोडा अभ्यासही चालू आहे. परंतु तो विषय फार दिवस सोडल्यामुळें थोडासा जाचेल. उद्यांपासून त्या विषयाला येण्याचा विचार आहे.

प्रभा •—( मि० फडके यांस उद्देशून उद्यांपासून दगडापूरकरांचा "पार्शिअन" वेण्याचा बिचार आहे. बरें झालें बुवा आपल्याला एक मुलगा जास्त झाला.

फडके—( रागावून )हें येईना का. आधींच श्रोते मंडळीची "कमतरता" आहे. मात्र बेतांना थोडासा कापूस आणावा ह्मणजे येथें "पुराणीक बावांचें पुराण चाललेंच असतें, व दुसरें हें कीं बातीही पुष्कळ केल्या जातील.सारांश "कामांत काम भज राम राम."

पत्रकर्ते राव कांहीं वेळानें सुटी झाल्यानंतर आमच्या दगडापूरकराची मंडळींनीं जी काय पच्चिफिकेशन उडविली तिचें खरें सौख्य त्या बिचाऱ्यालाच ठाऊक. असेंच मि० फडक्यासारखें इतर शिक्षक लोक क्षुल्लक गोष्टींकरतां बर्मी लागणारे शद्ब बोलतील तर त्यांच्या संबंधानें शिष्यांच्या मनात पूज्य बुद्धि राहील काय? येतां आतां नमस्कार. अशीच केव्हां केव्हां भेट घेत जाईन.

"एक समदुःखी."

## शिक्षकांस महत्वाची जाहिरात

सर्व विद्या वृद्धीछु सभ्यांस विनय पूर्वक कळविण्यांत येतें कीं आह्मी येत्या जून महिन्यापासून मराठींत "शिक्षकमित्र" नांवाचें मासिक पुस्तक काढणार आहों. या पुस्तकांत शिक्षकांस अति उपयोगीं अशा विषयांवर निबंध; कार्लाइल, लॉक स्पेनसर, इत्यादि पंडीतांचे शिक्षणा वरील विचार; जगांतील विख्यात शिक्षकांचीं बोधपर व मनोरंजक चरित्रें; सुधारलेल्या देशांतील निरनिराळ्या शिक्षणपद्धतींची माहिती; इंग्रजी व संस्कृत ग्रंथांतील उत्कृष्ट स्थलांचे भाषांतर रूपानें गद्य पद्यात्मक उतारे इत्यादि विषय येतील.

पुस्तकाचा साचा डेमिच्या षोडश पत्रीं साच्याचीं २४ पृष्ठें ह्मणजे शेतकरी मासिक पुस्तकाचे एवढाच आहे.

वर्गणीचे दर—वर्षाचे अगाऊ टपाल खर्चासह २ रु तथापि जे वर्गणीदार आपली वर्गणी येत्या मे अखेर पर्यंत पाठवून देतील त्यांना पहिल्या वर्षाचे १२ अंक अवघ्या दीड रुपयांत मिळतील. लोकाश्रय चांगला मिळाल्यास पुढेंही हाच दर कायम केला जाईल. वर्गणीदार होऊं इच्छिणाऱ्यांनीं त्वरा करावी.

पुस्तका संबंधानें पत्रव्यवहार करणें व वर्गणी पाठविणें ती खालील पत्त्यावर पाठवावी.

पुस्तककर्ता

बाळकृष्ण गोविंद सुळे

फर्स्ट असिस्टंट मास्तर

आंग्लो व्ह० स्कूल

नळगांव

( वऱ्हाड. )

वऱ्हाडसमाचार.

मिती अधिक चैत्र वद्य १३ शके १८१०.

## हिंदुस्थान सरकारच्या १८८८-८९ सालाच्या वार्षिक जमा खर्चाचे अंदाज पत्रक.

हें पत्रक सध्यांचे फॅनॅन्स मिनिस्टर मि० वेस्टलंड यांनीं नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. अलीकडे हिंदुस्थान सरकारच्या जमाखर्चाची फारच शोचनीय अवस्था झाली आहे हें सन १८८३-८४ साला नंतर जीं अंदाज पत्रकें प्रतिवर्षीं प्रसिद्ध झालीं आहेत यावरून दिसून येत आहे. १८८६-८७ सालीं मात्र शपथ घेण्याला काय ती शिल्लक राहिली होती. तें वर्ष शिवाय करून तूट आली नाहीं असें एक ही वर्ष गेलें नाहीं. गेल्या सालापासून तर या तुटीची कमालच होत चालली आहे. गुदस्तां जी भयंकर तूट पडली होती तिला सरहद्दीच्या संरक्षणाकरितां मुद्दाम खर्च या सदराखालीं ५६९००० रुपयांचा आणखी भर पडली. यंदा हा तीच अवस्था होणार आहे. व या तुटीची रक्कम निदान ५०-६० लक्ष तरी वाढेल अशी धास्ती पडली आहे. यंदाचे जमाखर्चाचे आकडे खालीं लिहिल्या प्रमाणें आहेत.

उत्पन्न पौंड ( प्रत्येक १० रुपयाच्या अंदाजानें)

| | |
|---|---|
| | ८००१०५०० |
| खर्च | ८०७०१९०० |
| तूट | ६२८००० |

गेल्या जानेवारी महिन्यांत मिठावरील कर वाढविण्याचा कायदा पुढें आणतांना मि० वेस्टलंड यांनीं जें भाषण केलें त्यांत हिंदुस्थान सरकारच्या जमाखर्चाची सध्यां जी तारंबळ झाली आहे तिचें चांगलें वर्णन केलें होतें. खर्चाची रक्कम वाढण्याचीं जीं कारणें मि० वेस्टलंड यांनीं दाखविलीं आहेत त्यांत ब्राह्मण देशांतील गडबड व तिकडे शांतता करण्याचा उद्योग, सरहद्दीच्या संरक्षणाकरितां मुद्दाम केलेला खर्च व चांदीचा उतरलेला भाव हीं मुख्य आहेत. या शिवाय चीन सरकारनें अफू संबंधानें जे कायदे केले आहेत त्यांच्या योगानें व इतर राष्ट्रें चीनला अफू पुरविण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्याच्या योगानें अफूच्या करांचें उत्पन्न पुष्कळ कमी होणार आहे. रेलवे कडील उत्पन्न हीं मागल्या साला पेक्षां पुष्कळ कमी झालें आहे. या सर्व कारणांमुळें हिंदुस्थान सरकारचें उत्पन्न कमी होऊन खर्च फार वाढत चालला आहे. असें मि. वेस्टलंड ह्मणतात. यंदाच्या सालीं मिठावर अधिक कर बसला आहे. त्याच्या योगानें सरकारला सुमारें २० लक्ष रुपये उत्पन्न होतील असा अजमास आहे; तथापि खर्चाचीं जीं मोठमोठीं प्रकरणें पुढें उभीं आहेत त्याच्या योगानें हें उत्पन्न कोणीकडच्या कोणीकडे फस्त होऊन जाईल याचा नेम नाहीं.

आलिकडे जमाखर्चांत तूट हें आपल्या वार्षिक खर्चाचें लक्षणच झालें आहे. सन १८६९—७० सालापासून जमाखर्चाचें सर्व कागद जर कोणी वाचून पाहील तर त्याला तेव्हांच दिसून येईल कीं, सरकारचें उत्पन्न प्रतिवर्षीं वाढत आहे. प्रतिवर्षीं उत्पन्नाची कांहीं तरी एक नवीन बाब निघत आहे व तिच्या योगानें सरकारच्या पिशवींत भर पडत आहे. असे असून ही शेवटीं तूट पडावी हें मोठें आश्चर्य वाटण्या सारखें आहे खरें तरी आमच्या सरकारचा खर्च करण्याचा सध्यांचा जो क्रम आहे त्यांकडे लक्ष दिलें असतां हें आश्चर्य वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. कोणी हा शहाणा मनुष्य कबूल करील कीं, आपल्या उत्पन्नाच्या प्रमाणें आपल्या खर्चाचा आव ठेवणें हेंच शहाणपणाचें काम आहे. आमच्या सरकारचा क्रम याच्या अगदीं उलट आहे. आमचें सरकार आपल्या खर्चाच्या मानानें आपलें उत्पन्न ठेवीत असतें. १८६९— ७० सालापासूनचा सर्व जमाखर्चाचीं पत्रें पहा त्यांत ही गोष्ट स्पष्ट दिसून येईल. हा क्रम बरा आहे किंवा वाईट आहे हें येथें सांगत बसण्याचें कांहीं कारण नाहीं असा क्रम शेवट पर्यंत कधीं चालावयाचा नाहीं. हे उघडच आहे कारण सरकारच्या उत्पन्नाच्या जेवढ्या ह्मणून बाबी आहेत त्यांच्या वर द्यावयाचा तोटा अगोदरच देऊन टाकिला आहे. असें असून ही आमचें सरकार खर्चाच्या कामीं आपला हात आटपणार नाहीं तर त्याचा परिणाम काय होईल याचा कांहींच नेम नाहीं. आतां राज्यव्यवस्थेंत सुधारणा होत चालल्या कारणानें सरकारला त्यामानानें खर्च हा अधिक करावा लागतो ही गोष्ट खरी आहे. तथापि आमच्या सरकारनें आपल्या खर्चाच्या सदराकडे चांगलें लक्ष देऊन पाहिलें असतां काटकसर करण्याजोग्या पुष्कळ गोष्टी त्याला दिसून येणार आहेत. आमच्या सरकारच्या लक्ष्यांत ही गोष्ट वागून त्याप्रमाणें तें वागूं लागलें तोंच आमच्या सरकारचा सुदीन समजला पाहिजे.

## The Berar Samachar

MONDAY APRIL 9, 1888

### THE SPEECH OF THE VICEROY AT THE TOWN HALL CALCUTTA.

The reply which the Viceroy gave to the address presented to him at the Town Hall Calcutta reflects much credit upon himself and explains his administrative policy, which has been the subject of bitter criticism recently in all Bengal papers. The noble lesson which the Viceroy teaches with regard to the Landling of questions, which concern politics and which are incomprehensible to the superficial and light minds untrained to concentration and a deep and unbiassed study of social and political problems, must be specially remarked by his opponents, who have so long indulged in criticising his policy with partialiaty and have poured forth a mass of rapid and foolish invections on him. There was reason to justify the hostile attitude which the Bengal papers assumed with reference to the movement set on foot for

making a demonstration to the retiring Viceroy. It was unfair no doubt on the part of some of the leading Anglo-Indians to make attempts to present an address to the Viceroy in the teeth of strong opposition from the native community, and to pass it off as an address, in which natives as well as Europeans have cordially united to express their feelings of loyalty and a sense of deep regret at the separation of the Viceroy. The movement would have been right had it been merely private; but when it presumes to make a public demonstration it ought to have been enthusiastically supported by both communities, which as a matter of fact we know is not. However this mischievous movement alone should not have exasperated the Bengalees so much as to lose moderation and temper. The Viceroy may be considered to have conferred a great boon on them by teaching them a timely lesson of possessing moderation in carrying on political disputes and making a good use of the liberty, given to us by the British Government. The speech is full of noble advice, fit to be treasured in our hearts, and prominently shows the various qualities of a good states man, such as, eloquence, kindness a liberal heart, courtsey, and a sympathy for the subjects, which the Viceroy possesses. Besides it explains the true principles of his administrative policy, which will no doubt silence the prejudiced criticisers. After having expressed his satisfaction at the assurance of the good will and the confidence of his fellow-countrymen and fellow-subjects, the Viceroy dwelt at length on the true principle which ought to guide an officer like himself in managing the responsible duties of Government, and raise him above the ambition of acquiring popular fame. Then he passed to the glorious issue of his deplomatic skill, the demarcation of the northern frontiers of India and said that he has been able to avert a war with Russia, and establish the most peaceful relatrons with the Ameer, on account of his personal knowledge about his character wishes and mode o thought. Furtheron the Viceroy says "The Afgan people have generally assumed a totally different attitude towards us during the last three years; from that which previously prevailed, as was exemplified not only when Sir West Ridgeway and his companions returned through Cabul to India, but in a still more remarkable degree by the cordial reception given to our boundary escorts at those places near which a little while ago they darod not even pass by reason of the hostility of the inhabitants.

The Viceroy then touched the important subject of the conquest of Burmah. The Viceroy declares that it was the state of anarchy, oppression, plunder, shameless debauchery, injustice and all the horrible crimes, which characterise ill-conducted Government, prevailing in Burmah, which forced him to undertake its conquest. Truly the Viceroy exibited a noble and philanthrophic heart in freeing a people groaning under despotism, and establishing peace among them. This is a noble and praiseworthy action as far as the people of Burmah are concerned. But he has done this at the sacrifice of the peace of other people. The people of India are compelled to pay exorbitantly for the sake of others. The Viceroy has spread more among them the miseries of poverty and has limited their resources which enabled them any how to get bare maintenance. Can this be maintained to be an act of perfect justice? Whatever views the Viceroy may entertain on this point, whatever flattering terms he may use in his speech to justify his policy in this direction, and whatever support he may obtain from his fellow-countrymen, the fact remains unchanged that this act of his is not favourably looked upon by the people of this country. The Viceroy may try to raise great hopes in the minds of people that Burmah will shortly be a source of good revenue to the Government, but the people will never forget their present misery in which they are thrown by this conquest.

The tone of the speech that follows betrays his fear of unpopularity on account of the imposition of additional duties on salt and petroleum. He admits that he was compelled to become a creature of circumstances and to find out remedies to cover up the financial deficit. Then he highly praised the noble spirit which has been recently displayed by the feudatory princes and chieftains of India, in these flattering terms:— "The Nizam, the Gaekwar, the Holkar, the Maharaja of Cashmere, the martial chiefs of Rajpootana and of the Panjab, one and all, with an enthusiasm and spontaneity without parallel have not merely made offers of large sums of money but have placed their persons, their swords and all the resources of their states at the disposal of her most Gracious Majesty. Let those, who have so long indulged in putting the most unworthy interpretation on the acts of the Viceroy, and have poured forth a mass of invectives and charges against him, and have imputed to him the charge of fomenting party spirit and jealousy among his subjects, turn their eyes to the concluding portion of the speech of the Viceroy, which runs thus:— What can I say to you Europeans and natives alike, but this?. Whatever you do live in unity and concord and good fellowship with each other...... I confess I would rather see the Europeans, Hindoos and Mahamedans united in criticising the Government than that the Hindoos and the Mahamedans, the Europeans and the natives, should become estranged from each other by unworthy prejudices or animosities of race and religion. God forbid that the British Government should ever seek to maintain its rule in India by fomenting racehatreds amongst the people.'

(continued from our last issue).

Part11.

For the purposes of the exercise of civil jurisdiction within the aforesaid lands the Governor General in Council is pleased to make the following arrangements:

1 There shall be a Court of Small Causes with jurisdiction in all suits cognizable under Act 1X of 1887, when the amount or value of the subject matter does not exceed five hundred rupees.

2 The Second Assistant to the Resident at Hyderabad shall be the Judge of the Court of Small Causes.

3 There shall be a District Court having the powers of a District Court as defined in section 2 of the Code of Civil Procedure, and with jurisdiction in all original suits, whatever be the amount or value of the subject matter and in all other cases in which jurisdiction is conferred on the District Court by the law for the time being in force to the aforesaid lands.

4 The Second Assistant to the Resident at Hyderabad shall be the Judge of the District Court.

5 Appeals shall lie, subject to the provisions of the enactments for the time being in force in the aforesaid lands, against the decrees and orders of the District Court to the First Assistant to the Resident at Hyderabad, who shall exercise the powers of an Appellate Court as defined in the Code of Civil Procedure.

No.1145—Whereas His Highness the Nizam of Hyderabad has granted to the British Government full jurisdiction over the lands in his territory which are occupied, or may be hereafter occupied, by the railways comprised in the undertaking of the Nizam's Guaranteed State Railways Company, by the Great Indian Peninsula Railway, by the Madras Railway and by the Southern Maratha Railway, respectively, (including the lands occupied as stations, outbuildings and for other railway purposes): In exercise of this jurisdiction and of the powers conferred by sections 4 and 5 of the Foreign Jurisdiction and Extradition Act, 1879, and of all other powers enabling him in this behalf, the Governor General in Council is pleased to issue the following orders:—

(1) The provisions, so far as they may be applicable, and as amended for the time being by subsequent enactments, of the Indian Railway Act (IV of 1879) are hereby extended to the aforesaid lands.

(2) In exercise of the power conferred by section 4 of the said Indian Railway Act, the Governor General in Council is pleased to sanction the use of locomotive engines or other motive power, and carriages and waggons to be drawn or propelled thereby, on the aforesaid lands.

(3) In exercise of the power conferred by section 53 of the said Indian Rail way Act the Governor General in Council is pleased to declare that the Resident at Hyderabad shall be deemed to be, for the purposes of the said Act, the Local Government in respect of the aforesaid lands.

No. 1146 With reference to the Notification of the Government of India in the Foreign Department, No. 1143, dated the 22nd March, 1888, the Governor General in Council is pleased to appoint Mr. F. C. Crawford, an Assistant Superintendent of Police in the Hydrrabad Assigned Districts, to be Superintendent of Railway Police for the purposes of the said Notification.

No.1147 In exercise of the powers conferred by section 6 of Act XX1 of 1879 (the Foreign Jurisdiction and Extradition Act, 1879), the Governor General in Council is pleased to appoint the Second Assistant to the Resident at Hyderabad, being a European British subject, to be a Justice of the Peace in the Hyderabad State

No. 1150 In exercise of the powers conferred by Section 6 of Act XX1 of 1879 (the Foreign Jurisdiction and Extradition Act, 1879), the Governor General in Council is pleased to appoint Major General A. H. E. Campbell to be a Justice of the Peace in the Hyderabad State.

## वऱ्हाड

आज आह्मी दुसरीकडे "शिक्षक मित्र" मासीक पुस्तकाचा संबंधानें जाहीरात प्रसिद्ध केली आहे- तिकडे सर्व शिक्षकांनीं व शिक्षणाच्या कामीं मदत करणाऱ्या सर्व सभ्यांनीं अगत्य लक्ष्य द्यावें. अशी आमची त्यांस विनंती आहे. रा. रा. सुळे हे इंग्रजी, मराठी, संस्कृत या भाषांत चांगलें प्रवीण असून उत्तम शिक्षकही आहेत तेव्हां त्यांनीं हातीं घेतलेलें काम ते चांगल्याच रीतीनें बजावतील यांत संशय नाहीं.

रा० रा० गणेश गोपाळ दहीगांवकर यांस वाशीम येथें आक्टिंग क्लार्क आफ कोर्ट नेमले व त्यांचे जागीं बुलढाणें येथें रा० रा० विष्णु रंगनाथ यांस ड० क्लार्क नेमलें.

मे. केनरलीज सा० दि० सु० पोलीस हे रजेवर जाणार त्यांचे जागीं मे. रोईट सा० हे येणार व त्यांचे जागीं एलिचपुरास येथील अ० सु० पोलीस मि० फ्रेजर हे जाणार

मे० कमिशनर साहेबाची स्वारी गेले बुधवारीं चिखलदऱ्यास गेली.

उमरावतीचे दि० सु० पोलीस मे. कर्नल गनथार्प साहेब हे सहा महिन्याच्या रजेवर जाणार व त्यांचे जागीं मे० व्हिकाजी साहेब अ० सु० पोलीस यांची नेमणूक होणार असें ह्मणतात.

एलिचपूरचे स्पे० माजिस्ट्रेट व मु० कमेटीचे चेअर मन रा० ब० भगवंत नरहर देशपांडे यांस उदराच्या योगानें देवाज्ञा झाली. हे कळविण्यास आह्मास फार वाईट वाटतें. हे फार जुने व वजनदार जमीदार होते मरणकाळीं यांचें वय ६१ वर्षांचें होतें.

एका मुसलमानानें आपल्या बायकोच्या व्यभिचाराच्या खटल्याचा न्याय होत नाहीं ह्मणून डे. क. उमरावती यांचे पाठीवर काठी मारली त्यास सहा महिन्यांची शिक्षा, झाली.

## वर्तमानसार

दाढी युक्त स्त्री—फ्रान्समध्यें एका स्त्रीस दाढी होती. त्या दाढीवरच तिनें आपला चरितार्थ मोठ्या झोकानोकानें चालविला होता. ही बाई नुकतीच मरण पावली. दाढी दाखवून पैसे उपटीत असे कीं काय?

राजसभा--मुंबईचे गुजराथी पत्रकर्ते सुचवितात कीं, सर्व राजे व संस्थानिक यांनीं आपल्या हितार्थ एक सभा करून तिच्यांत तिच्यांत सर्वांनीं बसून आपल्या हिताचा विचार करावा. पण ही गोष्ट व्हावी कशी? आणि यद्यापि होईल ह्मटलें तरी इंग्रज सरकारेला असें होणें इष्ट वाटेल काय? व ते अशी राजसभा चालू देऊन राजांस व संस्थानिकांस वारंवार एकत्र जमूं व भेटूं देईल काय? किः रामाय तस्मैनमः

सातारा--तारीख ४ एप्रील पासून महाबळेश्वर येथें नामदार गव्हरनर व कमांडर इंचीफ यांच्या राजकीय कचेऱ्या सुरू होणार.

चेसापीकबेमध्यें कौलांचा उपयोग पैशाच ऐवजीं करितात, व तेथील वर्तमानपत्रकर्ते देखील आपल्या वर्गणी बद्दल नाणीं न घेता कौलेंच घेतात.

सव्वा रुपयाचा नवस बडोदे संस्थानांतील भामभुरा गांवांतील काळा भोजा या नांवाच्या मनुष्यानें आपलें कार्य सिद्धी करितां श्रीमंत सयाजीराय महाराजांस सव्वा रुपयाचा नवस केला होता. पुढें त्याचें कार्य शेवटांस गेल्यावर त्यानें तो सव्वा रुपया मनीआर्डर करून महाराजांस पाठविला. व महाराजांनीं स्वीकार केला. कोण ही राजनिष्टा!

आज पर्यंत स्टांप निरुपयागी झाल्या ते परत घेऊन त्याजबद्दल रुपये परत देत असत; पण आतां असा ठराव झाला आहे कीं रुपयास एक आण्याप्रमाणें कमिशन कापून घेऊन मग पैसा परत करावा.

शाई कागद वगैरे सरकारी कचेऱ्यांतून लागणारें सामान या देशांत तयार झालेलें घेतलें आहे कीं नाहीं याची अधिकाऱ्यांनीं चौकशी ठेवावी असा हैदराबाद संस्थानांत हकूम सुटला आहे.

ब०

गुळवेलीचें सत्व काढून आपण जसें घेतों त्याच प्रमाणें हें. ह कांहीं पदार्थांचें सत्वच आहे आपले पूर्वींचे पोत नव्हते काय! आपणास प्रिय्यास काय झालें."

होय! बरोबर आहे, वाचकहो या बाळाच्या तोंडून जे शब्द पडताहेत ती खरोंच मुकमफळें. एवढे हे विचार याना कोणी शिकविले बरें! तर ही कृत्या विद्या दुसरे कोण. या बाळाचे बोलणें ह्मणजे आमानीं हजामत करवली तर आई तूंही कां करवीत नाहींस या प्रमाणें दिसतें.

वाचकहो या बयानें कोणकोणते अनर्थ घडून आणले आहेत हें ह्मणजे मी सांगितलें पाहिजे असें नाहीं. ही या अधुनिक विद्येची सवतच आहे हेंही आमच्याच मुखावर आहे. हिच्या पायीं हजारों थोर घराणीं धुळीस मिळालीं आहेत, ही बया फक्त द्रव्यहानिच करून राहत नाहीं तर ही आमची सर्व गात्रें विकल्पित करते. ईश्वरानें या सृष्टींतील सौंदर्य गंधादि उपभोगण्यास आह्माला जीं गात्रें दिलीं आहेत त्यांची शक्ति कमी होऊन ती आपणास असून नाहींतशीं होतात. व एखाद्या वेळेस सर्व जगतापेक्षां प्यार जो आपला जीव त्यासही आपण मुकवों व मरणानंतर आपणास नरककुंडात नेण्यास कारण होतें. तर वाचकहो तुमचें कुळमूळ उपटून टाकणारी ही बया इचा विटाळ देखील होऊं देऊं नका, हीच्या पासून अगदीं दूर रहा, हीनें एकदां जर कां पछाडलें तर तुमचे कांहीं एक चालणार नाहीं.

( पुढें चालेल. )

---

## वऱ्हाडसमाचार.

मिती चैत्र शुद्ध ९ शके १८१०.

---

राणी सरकारचे प्रतिनिधि लार्ड डफरीन साहेब चालूं वर्षी अखेर परत विलायतेस जाणार ह्मणून लाट साहेबांची कारकीर्द हिंदुस्थानास कितपत लाभली या संबंधाची चर्चा सर्वतोमुखीं आतां पासूनच ऐकूं येऊं लागली आहे तर अशा वेळीं लोक काय बोलतात याचा थोडक्यांत गोषवारा देणें विशेष महत्वाचें आहे. बंगाल्यांतील एका प्रसिद्ध इंग्रजी पत्रांत लार्ड डफरीन विषयीं एतद्देशीय लोकांचे जे ग्रह झाले आहेत त्यांची यादी दिली आहे ती मोठ्या मौजेची असून वस्तुदृष्ट्या लोकमान्य होण्यासारखी आहे. ती कलमवार येणें प्रमाणें:—

( १ ) स्वतः लार्ड डफरीन विषयीं म्हटलें तर त्यांचें बोलणें चालणें यांत असा कांहीं विलक्षण गोडपणा व सभ्यपणा आहे कीं त्यांच्या योगानें त्यां सभोंवतीं तारीफ करणाऱ्या लोकांची गर्दी झाल्या वांचून राहावयाचीच नाहीं. कसाही मनुष्य असेना त्यांचें मन वळावयाचेंच.

( २ ) साहेब बहादुर हिंदुस्थानांत आले त्या आधीं त्यांनीं ज्या ज्या जागीं मोठमोठालीं हुद्यांचीं कामें केलीं होतीं त्यांच्या योगानें त्यांची कीर्ती पुष्कळ झाली होती. परंतु हिंदुस्थानांतील लोकांशीं त्यांनीं जें वर्तन ठेविलें त्याच्या योगानें त्या सर्व कीर्तीला विरजण पडलें आहे.

( ३ ) हिंदुस्थानांतील त्यांच्या कारकिर्दींत लोक हिताच्या गोष्टी मुळींच झाल्या नाहींत असें ह्मटलें तरी चालेल.

( ४ ) हिंदुस्थानांतील लोकांविषयीं आपल्या आंगीं मोठी कळकळ आहे असें त्यांनीं वारंवार ह्मणून दाखविलें आहे तरी त्या म्हणण्यामध्यें व त्यांच्या खरोखर वर्तनामध्यें फार तफावत दिसून येते.

वर लिहिलेल्या गोष्टींच्या पुष्टीकरणार्थ त्याच पत्रानें लार्ड डफरीन साहेबांच्या कारकिर्दींतील खालीं दिलेल्या गोष्टी दिल्या आहेतः—

( १ ) देशांत आल्या बरोबर त्यांना लार्ड रीपन यांची राजपद्धत सुरूं ठेवण्याचें वचन दिलें परंतु पुढें तिच्या अगदीं उलट म्हणजे दुसरे देश खालसा करणें व लूट करणें हीच पद्धत सुरूं केली.

( २ ) एक पब्लिकसर्व्हिस कमिशन शिवाय करून लोकहिताची त्यांनीं कोणतीच गोष्ट केली नाहीं. या गोष्टीचें तरी उत्पादक निराळेच होते. यांनीं फक्त तिला चांगली मदत केली एवढेंच.

( ३ ) त्यांचा प्राप्तीवरचा कर ( इनकमटाक्स ) मिठावरचा वाढलेला कर, व व्यर्थ रक्तश्राव करून शेजारचे पाजारचे देश घेण्या करितां केलेला खर्च या गोष्टी त्यांच्या कारकिर्दीवर नेहमीं कलंक रूपानें राहतील.

( ४ ) कांहीं मतलबी व आपलपोटे इंग्रज व्यापारी यांच्या हुलकावण्यास भुलून त्यांनीं ब्रह्मी लोकांचें स्वातंत्र्य कांहीं अविकार नसतां भ्रष्ट केलें ही गोष्ट त्यांच्या कारकिर्दीला लज्जास्पद होईल. व ज्या लोकांच्या स्वातंत्र्यावर त्यांनीं या रीतीनें विरजण घातलें ते यांना नेहमीं शाप देतील.

( ५ ) इंपीरियल वार म्हणजे इंग्लिश राष्ट्रानें परदेशाशीं केलेली लढाई हिचा व हिंदुस्थानचा कांहीं संबंध नसतां त्यांनीं तिच्या खर्चाचा बोजा हिंदुस्थानच्या उत्पन्नावरच लादला व आफगान सरहद्दी करितां अतोनात पैसा खर्च केला.

६ लोकमताचीं तोंडें बंद करण्याचा कायदा करण्याचा बेत सफल होत नाहीं असें पाहून आपण परभाराच्या परभारा दूरच राहून त्यांनीं पोलीस सरक्युलर करविलें.

७ एतद्देशीय संस्थानिकांनीं पैशाच्या मोठमोठाल्या रकमा देण्यास लिहिलें व त्यांत आपला कांहींच हात नाहीं असें लोकांत दाखविलें त्याचा मोबदला लोकांस कांहींच दिला नाहीं. एतद्देशीय लोकांस शस्त्रें बाळगण्याचा व त्याचा उपयोग करून व्हालंटीयरकोर स्थापन करण्याचा अधिकार दिला नाहीं.

८ क्रिकिन गिनन या सारखे इंग्रज अधिकारी एतद्देशीय लोकांशीं राक्षसी कृत्यें करीत असतां व त्याबद्दल जिकडे तिकडे ओरड चालली असतां तिकडे यांनीं मुळींच लक्ष्य दिलें नाहीं.

९ हिंदुस्थानांतील निरनिराळ्या जातींच्या लोकांत सख्य व ऐक्य करावयाचें बोलून दाखवून त्यांनीं कांहीं विशेष जाती विषयीं पक्षपात दाखविला व त्यायोगानें जातीभेदाचें बंड उपस्थित केलें.

असे व अशा तऱ्हेचे अनेक विचार लोक प्रगट करीत आहेत तरी हे ह्मणजे सर्वथैव खरें आहेत असें ह्मणण्याचा आमचा यत्किंचितही आशय नाहीं. ठिकठिकाणीं व्हाइसरा य साहेबांच्या सन्मानार्थ अलीकडे सभा भरूं लागल्या आहेत व मानपत्रांचीही एकामागून एक अशी गर्दी चालली आहे त्यावरून वरील विचार एक तर्फी कांहीं अंशीं असल्याचें स्पष्टपणें दिसून येतें. कांहीं मानपत्रांस प्रत्युत्तर देते वेळीं लार्ड डफरीन साहेब यांनींही आपल्या कारकीर्दीचें स्वरूप लोकांस सकारण व्यक्त करून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे व तो त्यांच्या नेहमींच्या हातोटी प्रमाणें सशास्त्र यश न्याय्य आहे असें ह्मटलें असतां चालेल.

---

जिल्हे माजिस्ट्रेट नाशिक यांज कडून सर्व लोकांस जाहीर करण्यासाठीं लिहून आलें आहे कीं नाशिक शहरांत वाईट प्रकारचा महामारीचा अजार सुरूं आहे या करितां येत्या रामनवमीचे यात्रे करितां यात्रे करूं लोकांनीं येऊं नये तर इकडे यात्रेकरूं लोकांनीं अवश्य लक्ष्य पुरवावें अशी त्यांस आमची सविनय प्रार्थना आहे

---

## The Berar Samachar

MONDAY APRIL 16, 1888.

### PROFESSOR FORREST ON EDUCATION IN GERMANY.

The lecture delivered by Professor G. W. Forrest last week at the Sasson Mechanics' Institute on the subject of education in Germany was very interesting, suggestive and instructive. His service in the educational department and the sympathy which he feels for Natives have afforded him opportunities to study those problems which deeply concern their welfare and material progress. It is this that his opinions carry a weight with them and deserve to be carefully studied in as much as they point out the real defects underlying the educational system in India and sound the note of the true wants of the people. He drew a rough sketch of the whole educational system in Germany and while doing so he from time to time attempted to institute a comparison between the different methods adopted in Germany and India, to impart education, primary and high, to their sons, and to point out how the method in Germany has advantageously contributed to the gradual development of the minds of her youths. The first and most important fact which he brought to the notice in his lecture, and which must be carefully remembered is that it is not by technical education alone but by technical education grafted on primary education, carefully adapted to the wants of the people, that Germany has gone far ahead of other nations, and has become a formidable rival to all the nations in industry manufacture and trade. Germany has had for centuries before her eyes, a great problem of providing for the education of her sons such institutions and means, and giving such opportunities as would give them a thorough and entire education in all arts and manufactures and would make them formidable rivals to other nations, without creating shallow and superficial minds. The educational system is so organized in Germany as to form one homogeneous whole. But here in India Government has adhered to a policy which has resulted in evils, which are daily deplored everywhere.

Mr. Forrest greatly regretted the fatal bifurcation that prematurely separates the two main instruments of intellectual culture—"language and science," in the educational system in India, and pointed out that they go hand in hand in Germany more than they do here. The regret felt by the worthy Professor is just, and we must take a timely warning from the lecture of Mr. Forrest, about the fatal consequences that await us if this bifurcation be allowed to continue. These considerations were pressed on the Natives of India more than once before Mr. Forrest, but we regret to say that they have been lost sight of by the people as well as the Government. The great evil that has resulted from the educational policy followed by the English Government in India is that it has given rise to mischievous and wrong notions in the minds of our youths, who consider that their sole aim must be after intellectual and literary pursuits. They think that it is beneath their dignity to undertake manual labour and to work in wood or in iron. A life of business and activity is looked down upon by them, and they rather like to devour volumes of Thackery or Reynold, and to lead a secluded life in the enjoyment of intellectual pleasure. Intellectual pleasure is a thing one should aspire to, and we do not wish to speak lightly of it. If this pleasure is sought after in solitary instances, we have no objection whatever But when the majority of people hanker after it exclusively to it it is a thing which ought to be severely condemned. The regeneration and civilization of a country cannot be effected by persons of this nature. The natives of India cannot expect to make any progress, until these preposterious and mischievous notions are not got rid of. Perhaps superficial readers would scoff at our views, and charge us with exaggeration; but to such we would repeat the advice of Professor Forrest not to proclaim crude ideas on any subject and to criticise but to weigh facts.

A glance at the real state of things would convince them that we have not in the least exaggerated them. The next point touched upon by the lecturer was that in Germany a youth is instructed in his own native tongue. It has been an admitted fact that our students are required to incur a great loss of time and energy in learning a foreign tongue, through the medium of which the knowledge of science is obtainable. If attempts be made to impart this knowledge through the medium of our own vernacular a considerable time and energy would be saved and our youths would be able to master a profession during the same time in which at present they hardly get any opportunity to learn the rudiments of it.

We do not wish to follow the lecturer through all the details, which he gave, of educational course in Germany. Suffice it to say that the course prescribed by the India Municipality is with a slight alteration just the same in Germany. Giving a description of the Real. school and the Gymnasium in Germany, the lecturer then conveyed the students to the small town of Futwargen, situated in the Black Forest, one of the

most beautiful regions in Europe. " The chief branch of industry in Black Forest has been for centuries clock and watchmaking.

Futwargen is the centre of trade and for this reason the state of Baden has established there an art school and a technical school. The former is meant to make the cases and ornamental decoration of watches and clocks artistic and not vulgar and common-place as they are in England. The technical school is to teach the workmen of the Black Forest to make the works according to the latest scientific inventions." Then the lecturer described the school of Architecture at Karlsruhi, the object of which is to perfect a system of teaching the following:—I Master mason, stone mason and carpenter Building tradesman, joiner, glazier, locksmiths, certified workmasters, foremen and draltsmen. II English builders and other workers in metal. III Teachers of trade and professions. This is exactly the thing India wants. Finally the lecturer pointed out that it would be a disgrace to the people if they would not make attempts to revive that ancient architectural art, which had gone to unrivalled perfection during the rule of Mahamedans, and which is now shamefully neglected. Professor Forrest showed that education in Germany is greatly supported by the State. But here we daily hear that Government is in a financial embarrassment and consequently cannot spare its resources to be devoted to the foundation of technical schools, although it never falls short of means to carry on an expensive war, and to spend vast sums on frontier defences. This is the evil of an unsympathetic and selfish Government.

News of a matrimonial alliance between the princess Victoria, the second daughter of the Emperor of Germany and Prince Alexander of Battenberg, is abroad and has unsettled the whole of Germany. The proposed alliance has a political significance & threatens to disturb the peace of Europe. It is affirmed that the Imperial Chancellor has tendered his resignation to the crown Prince, for he dislikes the match, as it would affect the relations of Germany with the Czar, who hates Prince Alexander. The public opinion in Germany sides with the Imperial Chancellor. An opinion prevails that the Prince is not a worthy match of the daughter of the Crown Prince of Germany; for he does not lay claim to a high descent and rank. The Crown Prince is in a fix at this time. On the one hand he cannot insist on the alliance for fear of losing an able and energetic chancellor and on the other he cannot break it off for serious personal considerations. It is believed [illegible] the Queen of England would favour the match for her partiality and personal inclinations towards the House of which Prince Alexander is the representative.

The debate in the House of Commons on the financial problems which vitally concern the interests of India, clearly shows the apathetic and indifferent nature of English politicians with regard to Indian matters. It is very strange that members presuming on the scanty experience they had of India, boldly come forward on the authority of blue books, to explain the most important and difficult financial problems. Misrepresentation is the only way by which they can pretend to offer solutions. Mr. Slagg vehemently attacked the present frontier policy of India on the ground that it has created financial difficulties in the country leading not only to increased taxation but to the extension of the sale of intoxicating liquors for revenue purposes with serious results to the moral and intellectual welfare of the country. This motion brought forth many opponents like Mr. Ghorst and Sir Richard Temple. Although Mr. Slagg failed in carrying out his motion still he succeeded in convincing members like Lord Randolph Churchill that taxation in India has reached its utmost point and that notwithstanding all available resources for increasing taxation are availed of there does not occur a deficit in the financial budget of every year, and that in future the Indian Government must resort to a policy of economy and reduction in expenditure whatever arguments may be brought forward by Sir Richard Temple and his colleagues, for defending the frontier policy the fact remains unaltered that the Indian Government have spent more than fifty millions in Afganistan, in constructing railways, roads and other means of communication, and spent them not so much for the interests of India as for those of England. Who knows that many more millions will not be spent if the same policy of aggression be pushed on in future? Sir Richard Temple assured the members that he disbelieved in any intention of going to Candahar and as Russia, Afganistan and the English had agreed upon a frontier line he doubted the necessity of keeping up so large an army as had been maintained in the past. But who knows that the amicable relations now existing with the Ameer, would be so in future after his death? As to the financial question he denied that the Indian people were poor in an economic sense or that the capacity for taxation was exhausted. The view taken by Sir Richard Temple as regards the poverty of India would have been excused had it been expressed by any other member, who had no opportunity of visiting India, and whose knowledge was merely based on official reports.

But he, though acquainted with the helpless condition of the masses of India, boldly comes forward and denies that the people are reduced to the lowest pitch of misery and poverty. A man without a conscience alone would presume to make such injurious misrepresentations. We would ask him to read the speech of S. Smith on the poverty of India, and the returns of income tax, which would surely convince him. It is a great misfortune of the people of India that they have such members, the incarnation of misrepresentations, to represent their interests in Parliament.

(FROM HYDERABAD RESIDENCY ORDERS, APRIL, 5, 1888.)

Under Section 12, Act X of 1882, the Resident is pleased to appoint Mr. Hashmat Ali, Attache to the Resident at Hyderabad, in the Basim District, to be a Magistrate of the 3rd Class in that District.

Under Notification of the Government of India, Foreign Department, No. 156, dated the 30th September 1870, the Resident is pleased to declare that the Court presided over by Mr. Hashmat Ali, Attache to the Resident, in the Basim District, shall be of the 3rd Grade having jurisdiction up to Rs. 500.

Mr. G. F. Taylor, Assistant Conservator and District Forest Officer, Amraoti and Akola, is appointed District Forest Officer, Basim, but will continue in charge of the duties of the District Forest Officer, Akola, until further orders.

Ranger B. Bhukan of the Berar Forest Department was placed in charge of the the Basim Forest District, with effect from the 8th July 1887, consequent on the transfer of Mr. G. F. Prevost, Deputy Conservator, to the Ellichpur District.

The Resident is pleased to make the following promotions among Tahsildars, with effect from the 14th December 1887, consequent on the appointment of Mr. Ambadass Santu, Tahsildar of the 1st grade, as an Extra Assistant Commissioner of the 5th Class:—

Mr. Narayen Pandurang Joshi, Tahsildar of the 2nd grade, to be Tahsildar, 1st grade.

Mr. Ganesh Bapuji, Tahsildar of the 3rd grade, to be Tahsildar, 2nd grade.

In continuation of *Residency Orders* Notification No. 15, dated 27th January last, the Resident is pleased to delegate to the Inspector-General of Stamps, Hyderabad Assigned Districts, the power to make the refund when application is made after six months but within a year.

Lieutenant-Colonel E. J. Gunthorpe, M. S. C., District Superintendent of Police, Amraoti, has been granted special leave for six months with effect from the 1st April 1888 or from such subsequent date as he may avail himself of it.

## वऱ्हाड.

हवामानः— हवा फार उष्ण आहे. रोग राई म्हणण्या सारखी नाहीं.

आह्मास लिहिण्यास संतोष वाटतो कीं रा० रा० लक्ष्मण गोपाळ देशपांडे अडगांव यांस पुसद येथें सेकंड क्लास नायब तहशिलदार नेमिलें. हे गृहस्थ मुंबई युनिव्हर्सिटीची मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पसार झाले आहेत. वऱ्हाडांतील प्रसिद्ध जुन्या नव्या घराण्यांतील नवीन होतकरू गृहस्थांची या जागीं निवड झाली आहे ही गोष्ट विशेष अभिनंदनीय होय.

जळगांव येथील कायमचे नायब तहशीलदार रा० रा० काशीराव शंकर राव हे दोन वर्षांचे फर्लोवरून परत येऊन त्यानीं आपले जळगांवचे ना० तहशिलदारीचे जागेचा चार्ज घेतला व त्यांचे जागीं तैथें काम करीत असलेले मि० सयद महमद यांस केळापूर येथें नायब तहशिलदार नेमिले.

कमिशनर साहेब यांचे आफिसांत काम फार वाढल्यामुळें १ जागा नवीन सांक्शन होऊन आल्या आहेत त्यांपैकीं १२५ रुपयांचे जागेवर हैद्राबादेहून कोणी गृहस्थ येणार आहेत.

मे. कर्नल ग्रांट साहेब डे. क. आकोला गेलें आठवड्यांत रजेवर गेले.

मि. ए. इलियट अ. क. यांना येथें मे. ग्रांट साहेब रजेवर आहेत तों पर्यंत, आफि. डे. क. नेमल्या प्रमाणें ते मागील आठवड्यांत येथे येऊन आपले कामीं रुजूं झाले

मे. एफ्. राईट डि० सु० पोलीस एलिचपूर यांनीं येथे येऊन डि० सु० पोलिसचें कामाचा चार्ज घेतला.

येथें नवीन नेमलेले नायब तहसिलदार रा. रा. माधवराव रामचंद्र यांनीं गेलें आठवड्यात येथें येऊन आपल्या कामाचा चार्ज घेतला.

नवीन आलेले डे. क. मि. इलियट साहेब हे वऱ्हाडांत पुष्कळ दिवसां पासून आहेत पण आकोल्यास हे पूर्वी कधीं नव्हते. गाव पहाण्या करितां हे काल व परवां म्युनिसिपालिटीचे व्हाईस प्रेसिडेंट व मेंबर यां सह गांवांत आले होते. कमिटीची स्वच्छता वगैरे संबंधाची व्यवस्था पाहून साहेब खुश झाले म्हणून ऐकतो. शहरास चांगल्या पाण्याचा पुरवठा असावा तसा नाहीं व नदीचे सांठलेल पाणी अपकारक आहे हें साहेबांचे नजरेस आलें काय?

मि. हशमत अली रेसिडेंटचे अट्याची जिल्हा वाशिम यांस त्या जिल्ह्यांत तिसरे वर्गे माजिस्ट्रेट नेमिलें आहे, आणि त्या प्रमाणें त्यांच्या कोर्टास ५०० रुपये पर्यंत दावे चालविण्याचा अधिकार आहे.

रा. रा. नारायण पांडुरंग जोशी यांची तहशीलदार वर्ग दोन वरून पहिल्या वर्गावर, आणि रा. रा. गणेश बापूजी यांची तहशीलदार वर्ग तीन वरून दुसऱ्या वर्गावर चढती झाली आहे.

लेफटेनंट कर्नल इ. जे. गनथार्प एम् एस् सी पोलिस सुपरीनटेंडेंट उमरावती यांस चालू महिन्याच पहिले तारखे पासून अथवा ते घेतील त्या दिवसा पासून सहा महिन्यांची स्पेशिअल रजा मिळाली आहे.

(मागाहून आलेली नोटीस.)

नोटिशीचें उत्तर.

रा. रा. खुशाल वल्द नगदेव पाटील रहाणार खेट्री ता० बाळापूर यांसः—

खालीं सही करणार यांजकडून.

नोटीस देण्यांत येते कीं, तुमची नोटीस तारीख २१ माहे मार्च सन १८८८ इसवीची तारीख २६ माहे मार्च सन १८८८ इसवीचें वऱ्हाडसमाचार पत्रांत दिलेली टपाल मार्फत आम्हांस तारीख ४ माहे एप्रील सन १८८८ इसवी रोजीं पोहोंचली. तिचें उत्तर असें कीं, तुमचे नोटिशींतील मजकूर निराधार असून बिलकूल खोटा आहे. तुमचे नोटिशींत लिहिलेल्या प्रमाणें मजकूर जर खरा असतां तर प्रथमारंभी त्या ठरावा प्रमाणें हकूमनामा झाला असतां. आम्हास तुमचे पासून आज पावेतों कांहीच वसूल पावला नाहीं. तुमचे असें खोटे नोटीशीनें आमचे मुळींच नुकसान होणार नाहीं कळावें.

तारीख १३ माहे एप्रील सन १८८८ इसवी.

(सही)

गुलाबचंद जोगराज दस्तुर खुद.

## वर्तमानसार.

सर्व जगापेक्षां हिंदुस्थानांत रशियन ग्यासलेट फार खपतें. बाटूम शहरांतून १८८७ सालांत एकंदर २०,००,००० पेट्या गेल्या! इतकेंच नसून गेल्या फक्त जानेवारींत ४,००००० पेट्या आल्या!! पेट्रोलियमवर कर बसविला पण आह्मास हें रशियन तेल स्वस्त मिळूं लागल्यामुळें आमचा फारसा तोटा झाला नाहीं. पण हा कोणी करून दिला? रशियानें.

आमच्या सरकारास पैसा मिळविण्याची फार फार इच्छा आहे. १८९७ तील गडबड बंद झाल्यावर राणी सरकारच्या सही शिक्यानें एक जाहीरनामा प्रसिद्ध करण्यांत आला त्यांत तुमची देवस्थानें जशीच्या तशी राखूं. तिकडील नेमणुका बंद करणार नाहीं वगैरे गुळचट थापा देण्यांत आल्या होत्या. पण लिहिण्यास फार दुःख वाटतें कीं आमचे सरकार त्या आपल्या वचनास हरताळ लावू पहात आहे असें खालील हकीकतीवरून कळेल. 'काशी येथील गणेश, शिव व अन्नपूर्णा या तीन देवस्थानांच्या संबंधानें पेशव्यांचे घराण्यापैकीं अमृतराव यांनीं ठेवलेल्या पैशांशी सरकारनें फार अफरातफर केली या देवस्थानाचे ट्रस्टी रामचंद्रराव अप्पा पेंडसे यांचेकडून व त्यांचे अटर्नी क्याप्टन हरसे यांचेकडून सरकारास नवीन एक अर्ज झाला आहे, देवस्थानाकरितां व अन्नछत्राकरितां श्री अमृतराव व विनायकराव यांनीं ठेवलेल्या पैशाचाच फक्त अपहार इंग्रजांनीं केला असें नाहीं, तर देवस्थानां संबंधी बागा, घरें व छत्रांतील स्वयंपाकाचीं भांडींकुंडीं, देवाच्या अंगावरचे जडावाचे दागिने वगैरे सर्व गोष्टी सरकारानीं आपल्या वशांत टाकल्या असें या अर्जासोबत जोडलेल्या सामानाच्या यादीवरून उघड दिसत आहे. गणपतीच्या देवळांतील सोन्याचीं भांडीं किंमत रु० ४०,७६१ गणपतीच्या आंगावरचे दागिने किंमत रुपये १८,०४७ शिवाय देवळांतील सोन्याचीं भांडीं किंमत रुपये २६.९८० शिवाच्या देवळांतील रुप्याचीं भांडीं किंमत रुपये १०९७ ह्मणजे एकंदर १,०८,४८९ रुपयांचा हा माल झाला. या शिवाय अकरा घरें, दोन बागा, छत्राला दिलेल्या देणग्या, देवाच्या खजिन्यांतील पैसा व इतर सामान मिळून एक लाख रुपयांची रक्कम सरकारनें घेतली आहे.' हर हर पैशाच्या अपहारार्थ देवाच्या घरांत चोरीना! आमच्या देवाच्या आंगांतही आतां कांहीं त्राण उरला नाहीं काय? आह्मी मोठे न्यायी, सत्पक्षाभिमानी व अन्यायी लोकांस शिक्षा करणारे असे आमचे सरकार ह्मणत असतें पण हा जो वर अन्याय झाला त्यावरून वरील सर्व ह्मणणें खोटें असून निव्वळ आह्मांस थापा आहेत असा लोकांचा समज कां न व्हावा? ही गोष्ट आमच्या इंग्रजी हद्दींतील झाली. आतां आमच्या नेटिव संस्थानांतून परभारे आमचे सरकार आपलें घर कसें भरीतें तें पहा 'हैद्राबाद संस्थानास अर्ध्या पाऊण शतका पूर्वीचें एका युरोपियन कंपनीनें कर्ज दिलें होतें. त्या वेळच्या भागीदारापैकीं एक गृहस्थ १८२७ सालींच त्या कंपनींतून निघाले होते. या निघालेल्या भागीदारांचा वंशज कोणी रसेल्ड या नांवाचा साहेब आपला हक्क सांगण्यास व पैसे मागण्यास हैद्राबादेस आला होता. प्रिन्स ऑफ वेल्स व लार्ड लिटन अशा मोठमोठ्या धेंडांचीं वशिल्याचीं पत्रें यानें आपल्या बरोबर आणिलीं होतीं. याचें देणें किती निघतें त्याची चौकशी करण्या करितां निजाम सरकारांतून एक कमिशन नेमण्यांत आलें. परंतु कमिशन मध्यें मतभेद पडून कांहींच ठरल्यासारखें झालें नाहीं; तेव्हां अमुक एक लाख रुपये देणें निघतें असें ठरवून दरसाल हप्तेबंदी लावून हे वस्ताद सावकार हैद्राबादेहून उठले! याच्या देण्यास हिंदुस्थान सरकारांतूनही कांहीं हरकत आली होती, परंतु विलायतेहून एकापेक्षां एक जड अशा मोठमोठ्या धेंडाच्या वशिल्यानें तो विजयी झाला. रसेल्डनें तीन लाखांवर हात मारला असें पाहून आणखी कांहीं विलायतेंतल्या हैद्राबाद संस्थानचे सावकार ह्मणविणाऱ्यांच्या तोंडाला पाणी सुटलें आहे, व बारा लाख रुपयांचा दावा सांगण्यास येण्याकरितां एका गृहस्थानें प्रस्थान ठेवलें आहे. हल्लींचे हिंदुस्थानचे अंडर सेक्रेटरी मि० गॉर्स्ट हे हैद्राबादेहून थोडे दिवसांपूर्वी पाऊण लाख रुपये असेच घेऊन गेले.' अशाच गोष्टी जर विलायतेस होऊं लागल्या तर ते लोक आकाश पाताळ एक करून टाकतील पण बहुतकरून अशा गोष्टी विलायतेस व्हावयाच्या नाहींत. परराज्य असलें ह्मणजे अशा गोष्टी व्हावयाच्याच. आमचा देश निर्धन झाला आहे ही गोष्ट तक्याशीं टेकून किंवा खुर्चीवर बसून सभा करणाऱ्या लोकांशिवाय सर्वांस कबूल आहे. आतां हा जो जो निर्धन झाला त्याचें कारण पाहुं गेलें तर आमच्या प्रभूंची अन्यायमूलक पैसे मिळविण्याबद्दल उत्कटइच्छा हेंच आहे. दवाखाना, आगगाड्या, लोकलबोर्डें, म्युनिसिपालिट्या, तारायंत्रें वगैरे कितीही गोष्टी आमच्या सुखाकरितां केल्या तरी जोंपर्यंत आमच्या सरकारचें पावडें सुरूं आहे तोंपर्यंत आह्मांस या सर्व गोष्टी तुच्छ वाटतात. उघड आहे, कारण जर आह्माला पोटभर खावयास मिळत नाहीं तर ह्या बाह्य सुखोपभोगाच्या गोष्टी आह्मास काय होय? जोंपर्यंत आमच्या सरकारचें हें द्रव्य परिहरण सुरू आहे तोंपर्यंत हल्लीं चालू असलेल्या सुधारणांची जरी आमच्यावर कालोली वाहिली तरी त्यामुळें आमची ऊर्जित दशा यावयाची नाहीं वरितां आमच्या सरकारच्या मनांत जर खरोखर हिंदुस्थानचें हित करावयाचें असेल तर प्रथम त्यांनीं हें आपलें पावडें खोरें एकीकडे ठेवावें.

सर लिपिल ग्रिफिन साहेब फर्लो रजेवर गेल्यावर पुन्हा परत येणार नाहींत असें ह्मणतात. यांच्याबद्दल विलायतेंतलि ज्या निरनिराळ्या वर्तमानपत्रांनीं आपलें मत प्रसिद्ध केलें आहे, तें वाचून पाहिलें ह्मणजे हकडील नेटिव पत्रें कांहीं लिहित नाहींत असें दिसून येईल, त्यांतील एक दोन येथें देतोः—

हलन्युज ह्मणतें:—

सर लिपिल ग्रिफिन प्रमाणेंच आमचे इतर कामगार असतील तर १८९७--९८ सालांतील झालेली गडबड पुन्हा सुरू होईल, आणि यामुळें आह्मांस हिंदुस्थानांतून हाकलून न दिलें तर आह्मी मोठेंच भाग्यशाली असें समजूं. सर लिपिल ग्रिफिन हे इकडे येणार असून ते पुन्हा परत जाणारे नसल्यामुळें हिंदुस्थान मोठें नशीबवान आहे.

पालमाल ग्याझेट ह्मणतें:—

कांहीं दिवसांपूर्वीं बंगाली पत्रकर्त्यांनीं सर लिपिल ग्रिफिनवर शस्त्र उपसलें होतें, परंतु हें आतां बरें झालें कीं, हे गृहस्थ परत हिंदुस्थानांत जाणार नाहींत.

बंगाली रिती रिवाजाप्रमाणें कुचबिहारच्या महाराणीनें लेडी डफ्रिन बाईस, मेजवानी दिली, या वेळीं लेडी डफ्रिन बाईनें गळ्यांत सरी व आंगावर नेटिव दागिने घातले होते, आमच्या बायकांस हे नकोसे झाले आहेत व युरोपियनांस ते आवडूं लागले आहेत हा काळाचा महिमा नव्हे तर काय.

बाडीहाफ असौआना यामधील लोकांनीं लढायाची कडेकोट तयारी चालविली आहे.

मुंबई इलाख्यांतून सिंध प्रांत काढून टाकण्यांत येणार आहे. व त्याऐवजी नागपूर प्रांत सामील करण्यांत येणार आहे. असें झालें असतां मुंबई इलाख्याचा पाय कोणत्याही प्रकारें मोडण्याचा संभव नाहीं.

काश्मीरच्या सरहद्दीवर हन्झा आणि नागर जातीच्या लोकांनां फार धुमाकुळ मांडला आहे. यांच्यांत काश्मीर फौजेंत नुकतीच एक लढाई झाली.

फ्रांसांतील सेनाधिपती जनरल बौलंजर यांनीं एक जाहिरनामा प्रसिद्ध केला आहे त्यांत ते ह्मणतात कीं लढाईची तयारी करणें अत्यवश्य आहे, हल्लींचे पार्लमेंट देशाच्या हितास कारणीभूत नसल्यामुळें तें निरुपयोगी आहे आणि ह्मणून हें पार्लमेंट बंद करावें.

मुंबईचा जुगाराचा कायदा वारामतीस लागू केला आहे.

टर्कीनें बलगेरियाच्या सरहद्दीवर दोन दोन हातावर आपलें सैन्य ठेवलें आहे. असें करण्याचें कारण काय असें बलगेरियानें टर्कीस विचारलें आहे.

लिंटगूपासून १४ मैलांवर ४०० तिबेटी सैन्य येऊन धडकलें आहे. आणि या लोकांस मिळण्याकरतां आणखी १००० सैन्य तिबेटाहून निघालें आहे. आतां इंग्रजांस आणखी सैन्य तिकडे न्यावें लागेल. ठा० अ०

पुण्याचे प्रसिद्ध वकील रा. सा. श्रीधर विठ्ठल दाते हे चिकोडी तालुक्यापैकीं इनामगांव बेडकीहाळ संबंधीं आपणास रुपये १९००० सरकारांतून मिळण्याबद्दल सरकारावर दावा आणणार असल्याचें समजतें.

चहाचे संबंधानें 'पाप्युलर सायन्स न्यूज' पत्रांत असें सांगितलें आहे कीं, तरुण लोकांनीं सहसा चहा कधींही पिऊं नये, त्यापासून पुढें मोठे अपघात होण्याचा संभव आहे.

दिवाणी कोर्टाचे अंमल बजावणीचें काम वगैरे सबरजिस्टर लोकांकडे सोंपविल्यास चालेल किंवा कसें याबद्दल जिल्हा निहाय विचारल्याचें कळतें.

ठराव—नेटीव माजिस्त्रेटची परीक्षा यंदाच कायती व्हावयाची पुढील सालापासून नाहीं असा ठराव सरकारी ग्याझेटांत आहे.

शु० सू०

गेले फेब्रुवारी माहिन्यांत ब्रह्मदेशांतून ३९८६ हंडरवेट कापूस ८९१८९ रुपये किंमतीचा विलायतेस रवाना झाला.

खोट्या नोटा मुंबई-येथील फणसवाडींतील एका वेश्येच्या घरीं दोन इसम गेले व तिला एक १० रुपयांची नोट देऊन आपले बाकीचे पैसे मागितले. तिजजवळ रुपये नव्हते. तिनें त्यांसच नोट मोडून आणण्यास सांगितलें. त्यांतलि एक इसम नोट मोडून रुपये आणण्यास एका गुत्तेवाल्याकडे गेला त्यानें ती खोटी आहे असें ओळखून त्यास पोलिसाच्या ताब्यांत दिलें. त्या दुसऱ्या इसमास ही पकडलें. त्याच्या खिशांत खोट्या नोटांचे एक बंडलच सांपडलें. खटला चालावयाचा आहे. ग्या.सि.

— मि. हेनवे, जयपुरचे रेसिडेंट हे सर लेपेल ग्रिफिन विलायतेस गेल्यावर त्यांच्या जागीं गव्हरनर जनरलचे एजंट होतील असें ह्मणतात.

— बडोद्याचे गायकवाड यांस निळगिरी येथें वाटावें तितकें बरें वाटलें नाहीं सबब ते पुनः युरोपास जाणार अशी वदंता उठली आहे.

— सरकारी साऱ्याचा पैसा मनीआर्डर रूपानें वसूल करण्याचा प्रकार सन १८८६ सालीं बंगाल इलाख्यांपैकीं कांहीं जिल्ह्यांत सुरू केला होता तो आतां ता० १ एप्रील पासून सर्व इलाख्याभर व सर्व सरकारी देण्यास लागूं केला असें समजतें. आतां यांत सरकारानें आपला वसूल करण्याचा खर्च वाचविला व मनी आर्डरीचें उत्पन्न वाढविलें. एका गोष्टींत दोन कामें करून घेतलीं. तिजोरी भरण्याचा उत्तम मार्ग!!!

सु० प०

— फ्रान्स देशांतील प्रधान मंडळीनें राजीनामा दिल्याचे समजतें.

— काश्मीरचें राज्य ब्रिटिश सरकारास मिळविण्याचे घाटत आहे.

— वायव्य प्रांताच्या सरहद्दीवरील बांधकामास तीन वर्षांत सुमारें ८५ लक्ष रुपये लागेल.

— सुरतेस पटकीचे आगमन झाल्याचें समजतें. ता० २० पासून ता० ३० पर्यंत तिनें ३२ माणसांचे बळी घेतले.

— अफगाणीस्थानांत चांगली मजबुती करण्यासाठीं आज मितीपर्यंत आमच्या सरकारास पांच कोटी पौंड लागले.

वे० सि०

मुंबई—असें ऐकण्यांत येत कीं, येथील हायकोर्टानें असा ठराव केला आहे कीं, दिवाळी, होळी, वगैरे सणा निमित्त या कोर्टांतील शिपाई वगैरे पक्षकार लोकांकडून पोस्तें मागतात ते त्यांना मागू नये. व जो कोणी तें घेतांना आढळेल त्यावर खटला करावा.

स्वदेशाभिमान येवलें येथील खत्री साळी व कोष्टी या लोकांत दारू न पिण्याचा निश्चय झाला होता. त्याप्रमाणें त्यांचे तें व्रत अव्याहत चालू आहे. सदरहु लोकांचे हल्लीं असें वाटत आहे कीं, मांजरपाठ वगैरे सुती कापड विकत न घेतां स्वतः मागावर विणून तयार करावयाचे व स्वतः वापरावयाचें व खपल्यास खपवावयाचें. उत्तम आहे.

फ०

हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सन अखेर " १॥८ "
फरकोळ अंकास ........ ०४

नोटिशी बद्दल.
१० ओळीचे आंत रु. १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ......... ०।

Six monthly ............ 5 "
Single copy ............................ 4 as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements.
Below 10 lines... .2R s
Per line over 10...4as
Repetition perline..:3

THE BERAR SAMACHAR.

VOLXXII | AKOLA MONDAY 23 APRIL 1888 | NO. 16

वर्ष२२ | अकोला सोमवार तारीख २३ माहे एप्रील सन १८८८ इ० | अंक १६

## नोटिस

खालीं सही करणार यांज कडून कळविण्यांत येतें कीं, आमचे आफिसांत एक रुपये १० ची इंग्रजी रायटरची जागा भरावयाची आहे, तर ज्या कोणाची आमचे आफिसांत काम करण्याची इच्छा असेल त्यानें आपला अर्ज इंग्रजींत, अभ्यास कोठ पर्यंत झाला याबद्दल व पूर्वीं किंवा हल्लीं नौकरी केली किंवा करीत आहे याबद्दल दाखल्यासह पाठवावा उशीर लावूनये. आजपासून १५ दिवसांचे आंत जागा भरली जाईल. उमेदवार खालीं लिहिल्या प्रमाणें असावे.

वय— १८ वर्षां पासून तों ९२ वर्षांचे आंत असावें. (सरकारी नोकरीवर असलेले लोकांस ही शर्त लागूं नाहीं.)

अभ्यास— निदान म्याट्रिक्युलेशनचे परिक्षे पर्यंत झालेला असावा.

इंग्रजी अक्षर चांगलें असून फार जलद लिहितां यावें.

सर्वांत ज्याचा अर्ज उत्तम अक्षरानें लिहिलेला असेल त्यास समक्ष पाहून व अर्ज त्यानेंच तयार करून स्वतःच लिहिला आहे अशा बद्दल खात्री करून घेऊन त्यास जागा देण्यांत येईल. कळावें तारीख १८ माहे एप्रील सन १८८८ इसवी मुक्काम आकोलें.

(Signed) R. S. Burns.
सुप्रीन्टेंनडेंट ऑफ पोष्ट
आफिस वऱ्हाड डि०.

## शिक्षकांस महत्वाची जाहिरात.

सर्व विद्या वृद्धीच्छू सभ्यांस विनय पूर्वक कळविण्यांत येतें कीं आह्मी येत्या जून महिन्यापासून मराठींत "शिक्षकमित्र" नांवाचें मासिक पुस्त[illegible]ढणार आहों. या पुस्तकांत शिक्षकांस अति उपयोगी अशा विषयांवर निबंध; कार्लाइल, लॉक स्पेनसर, इत्यादि पंडीतांचे शिक्षणा वरील विचार; जगांतील विख्यात शिक्षकांचीं बोधपर व मनोरंजक चरित्रें; सुधारलेल्या देशांतील निरनिराळ्या शिक्षणपद्धतींची माहिती; इंग्रजी व संस्कृत ग्रंथांतील उत्कृष्ट स्थलांचें भाषांतर रूपानें गद्य पद्यात्मक उतारे इत्यादि विषय येतील.

पुस्तकाचा साचा डेमीच्या षोडश पत्री साच्याचीं २४ पृष्ठें ह्मणजे शेतकरी मासिक पुस्तकाचें एवढाच आहे.

वर्गणीचे दर—वर्षाचे अगाऊ टपाल खर्चासह २।०६ तथापि जे वर्गणीदार आपली वर्गणी येत्या मे अखेर पर्यंत पाठवून देतील त्यांना पहिल्या वर्षांचे १२ अंक अवघ्या दीड रुपयांत मिळतील. लोकाश्रय चांगला मिळाल्यास पुढेंही हाच दर कायम केला जाईल. वर्गणीदार होऊं इच्छिणाऱ्यांनीं त्वर करावी.

पुस्तका संबंधानें पत्रव्यवहार करणें व वर्गणी पाठविणें ती खालील पत्त्यावर पाठवावी.

पुस्तककर्त्ता.
बाळकृष्ण गोविंद सुळे
फर्स्ट असिस्टंट मास्तर
आंग्लो व्ह० स्कूल
नळगांव
(वऱ्हाड.)

लिहून आलेला मजकूर.

## विद्या.

(मागील अंकावरून पुढें चालूं.)

हें बाळ आठ नऊ वर्षांचें झालें ह्मणजे घरांत बापाचें किंवा इतर थोर मनुष्यांचें प्राबल्य नसतें ह्मणजे विद्येच्या आधीन होऊन धूम्रपान करण्यास आरंभ करितें हें कांहीं वेळ पर्यंत घरच्या वडील माणसास कळत नाहीं, परंतु जरा जशी याची ही सवय वाढत जाते तसतशी ती त्यांच्या ओठास नवीनच शोभा देते या वरून अगर प्रत्यक्ष बापानें पाहिलें ह्मणजे जर ह्या सवयी पासून दूर रहाण्या विषयीं बाप उपदेश करूं लागला तर हे विद्यापुत्र ह्मणतात कीं अहो बाबा माझें पोट फुगतें ह्मणून मी ओढतों. वाचकहो! जर एखाद्याला दररोज तुपामध्यें हिंग खाण्याची सवय असली व यांचे जर एखादे वेळीं पोट दुखूं लागलें व त्याला जर कोणीं तें औषध घेण्यास सांगितलें तर त्याला त्यापासून काहीं तरी गुण येईल काय? याच्या योगानें कोणत्याही प्रकारचे नफे फायदे नसून उलट तोटे आहेत. आपला हा प्रदेश उष्ण आहे हें ह्मणजे तुह्माला निराळें सांगतलें पाहिजे असें नाहीं; तर अशा या देशांत चंडांशु सूर्य नारायण तुमचीं शरीरें वरून जाळीत असतां तुह्मी या वयेत आपलें अंतर्याम जाळूं देतांना! ह्मणजे आपल्या घराला आपण होऊन आग लावून घेत आहों मग त्यावरून पेटलेल्या घरांत जर होऊनच तेल ओततां तर त्याची खाक होण्याला कांहीं तरी वेळ लागेल काय? तर अशी हा जी शरीरास अपायकारक बया हिला शिऊं देखील नका.

बरें मग असे हे तयार होत आलेले हे आमचे विद्यापुत्र यांनां आमच्या जुन्या समया तरी कोठून आवडणार, आमच्या त्या पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या भक्कम व टिकाऊ समया या वरून यांचें मन उठून नवीन चिमण्या, मून लाइट, अनेक लाईट, तमके लाईट यांकडे लागतें. हें बाळ पहिल्यानुदां एक आठ बारा आण्यांची जस्ती नखेर बाज चिमणी विकत घेते. आतां दररोज हिला साफ करतांना याचाच अथवा याच्या भावंडाचा ह्मणा पाय लागला कीं ही फुटलीच समजा या प्रमाणें दर आठवड्याला जर आपण एकेकच वेष्टण धरलें तर महिन्याच्या अंती ४।६ आणे पाण्यांत जाऊन त्या कांचा तरी कांहीं उपयोगीं पडतात काय! उलटें फुटलेली काच जर विसरून अशीच राहिली तर ती एकाद्याच्या पायांत शिरून त्याला जखमी मात्र करिते. आतां आपल्या जुन्या समया विषयीं पाहूं. हिला जर पायाचा धक्का लागला तर हिचीं दोन छकलें होतील काय? एवढेंच नव्हे. आपण जर हिला बुद्ध्या लाथ मारून खालीं पाडली तरी देखील आपलें एक रती इतकें देखील नुकसान होत नाहीं. पहिल्यानुदां एक दीड रुपया खर्चून एक समई घेतली तर ती ह्या बाळालाच काय, परंतु याचा मुलगा, नातु, पणतु, खापर पणतु यांना देखील ही उपयोगीं पडेल. बरें यदाकदाचित् ही मोडली तरी आपलें सर्वैव नुकसान कधींही होणार नाहीं. इतक्या पिढ्यांना पुरून पुन्हा आह्माला ती मूळ किंमतीच्या निम्मे तरी किंमत देईलच देईल.

या प्रमाणें या गौरकाय व्यापाऱ्यांनीं "जुने देऊन नवें घ्या" ह्या प्रमाणें आमच्या हातीं ही कांच व जस्त पात्रें देऊन आमची ताम्रच काय परंतु आमचीं सुवर्ण पात्रें देखील बळकावून बसले आहेत. अशा तऱ्हेनें त्यांनीं आपणास या निकृष्ठावस्थेला आणून पोंचविलें आहेच. आणि ही स्थिती अशीच जर राहील आणि वाचकहो जर तुह्मी डोळे उघडणार नाहीं तर सध्या जें तुमच्यापाशीं कांहीं आहे नाहीं त्याला देखील तुह्मी मुकाल!! "तेल गेलें तूप गेलें व हातीं धुपाटणें आलें" ह्या ह्मणी प्रमाणें तुमची स्थिती होईल!! ह्या गृहस्थाच्या हातांत धुपाटणें तरी राहिलें परंतु तुमच्या या स्वेच्छाचारी अविचारी व घातुक ऐषआरामानें तेवेंही तुमच्या हातांत राहणार नाहीं!! ज्यांना आज तुह्मी आपल्या बरोबरीचे समजतां तेच तुह्माला अन्न अन्न करायाला लावून आपल्या दारचें कुत्रे बनवितील तर वाचकहो सावध व्हा व योग्य विचार करा.

या प्रमाणें बापाचीं जीं कर्तव्य कर्मे ती न बजावितां हीं मुलाला धर्मभ्रष्ट, दुराचारी व व्यसनी बनविते. या बाळाची काया मात्र स्वदेशी बाकीं सर्व प्रकारांनीं हा परदेशी बनतो ही हल्लींची विद्या याजला "स्व" ह्मणजे कांहींच नाहीं असें शिकवून परा विषयीं पूज्यता हृदयामध्यें उत्पन्न करिते अशी हा पुत्र घातकी विद्या हिला "मातृ" ही संज्ञा शोभतें काय! ह्या पेक्षां हिला "स्वपुत्रहोतृ" ह्मटलें असतां जास्त शोभेलसें वाटतें.

(पुढें चालेल.)

## स्त्री शिक्षण.

लि. आ. म.

राष्ट्राची सुधारणा करणें, त्यास उच्च पदीस नेऊन पोंहोंचवणें व त्याचा नेहमी उत्कर्ष राखण्याची दक्षता ठेवणें हें प्रत्येक मनुष्याचें मुख्य कर्तव्य आहे. आमच्या हिंदुस्थान देशाची सुधारणा होणें आहे व ती करण्या विषयीं प्रत्येक समंजस मनुष्य आपापल्या शक्ति प्रमाणें झटत ही आहे. हें ह्या देशाचें भाग्यच समजलें पाहिजे. आमसुधारणेस ज्या कांहीं अवश्य अशा गोष्टी आहेत. त्यांतच स्त्रीशिक्षण ही धरलेली आहे, स्त्रियांस शिक्षण द्यावें किंवा नाहीं, शिक्षण दिल्या पासून फायदे आहेत किंवा नाहींत ह्याजबद्दल आतां चर्चा करण्याचें कारणच नाहीं. कारण स्त्रीशिक्षणाची खरी योग्यता आम्हास पूर्णपणें कळूं लागली आहे. स्त्रीशिक्षण नको म्हणणारे आतां फारच थोडे निघतील व त्यांत "पूर्वीं आपण स्त्री शिक्षण नको असें म्हणत होतो व आतां त्यांस आपली समती कशी द्यावी" असे हट्टवादी लोकच फार असतील. म्हणून स्त्री शिक्षण पाहिजे आहे असें म्हणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. परंतु हे शिक्षण असावें कसें हा मोठा गुढ व महत्वाचा प्रश्न आहे.

अलीकडे आमची स्थिती एखाद्या अंध मनुष्यासारखी झाली आहे. दुसऱ्याचें डोळे मिटून अनुकरण करण्यामध्यें आह्मी मोठे पटाईत बनलों आहोत व त्यांतच आह्मास मोठें भूषण वाटत आहे. इंग्रज लोकांनीं आह्मास शिक्षणाची खरी योग्यता समजून दिली व आम्ही स्त्रियांस शिक्षण देऊं लागलों इतकेंच काय तें, परंतु स्त्रीशिक्षण ह्मणजे काय त्याची योग्यता काय ते कशा रीतीनें दिलें असतां आपणास कसे फायदे होतील ह्या विषयीं आम्हीं कधीं तरी विचार केला आहे काय? मुलाप्रमाणें मुलींस हा सारख्याच रीतीनें शिक्षण देण्याचा हल्लींचा क्रम मुळींच हितकारक होणार नाहीं; व स्त्रीशिक्षणाचा खरा उद्देश तडीस जाण्याची आशा व्यर्थ होणार आहे. कारण अलीकडे मुलांच्या शिक्षणांत नीति शिक्षणाची मुळींच बानवा आहे ह्मणून सरकारापर्यंत सुद्धां हाकाहाक झाली आहे. तेंच शिक्षण आमच्या कोवळ्या मनाच्या मुलींना कितीसें फायदेशीर होणार. शिवाय आह्मा पुरुष वर्गास हल्लींचें शिक्षण फारच श्रमसाध्य झालें आहे. एखाद्यास साधारणपणें विद्या प्राप्त करून घेण्यास आपली बहुतेक शक्ति खर्च करावी लागते. अशा प्रकारचें शिक्षण आमच्या स्त्री वर्गास कोणत्या प्रकारें हितावह होणार आहे. आह्मास पोटाकरितां अव्याहत श्रम करून अशा प्रकारचें शिक्षण प्राप्त करून घेणें भाग पडतें परंतु तसा प्रकार आमच्या स्त्रियांकडे मुळींच नसतो. त्यांस जी विद्या प्राप्त करून घ्यावयाची असते ती केवळ चाकरी करून घेण्याकरितां किंवा दुसरा एखादा पोटाचा धंदा करण्याकरितां मुळींच नसते. त्यांच्याकडे ईश्वरी नियमा प्रमाणें संसारांतील दुसरींच कामें नेमलेलीं असतात तीं कामें पुरी पाहून पुरुषांसारख

शिक्षण मिळण्यांत त्यांस आपल्या मानसिक व शारीरिक शक्तीचा पुष्कळ व्यय करणें भाग पडेल. आह्मी अशक्त झालों, धर्मभ्रष्ट झालों, हांजी हांजीपणा आमच्या अंगांत पूर्णपणें बसला ह्याचें कारण अलीकडील शिक्षण होय. असें असून आम्ही आमच्या स्त्रियांस त्याच पंथास लावूं पहात आहोंत ह्या योगानें आमच्या देशाचें हित न होतां अहितच होणार आहे. कोणीही कबूल करील कीं आमच्या स्त्रियांच्या योगानेंच पूर्वीच्या चाली रीतीचे व धर्मीचे वास्तव्य अंशतः तरी आमच्यांत आहे. आमच्या प्रमाणेंच जर आमच्या स्त्रियांस पूर्वीपासून हल्लींचें शिक्षण मिळत गेलें असतें तर अलीकडे आमच्या चाली, रिती व धर्म आह्मास सोडून कधींच गेलीं असतीं. व अलीकडे त्यांचें महत्व कळून येत आहे तें महत्व आम्हास कधींही कळलें नसतें. आम्ही जसें बुटें, इष्टाकिण्या, विजारी घालण्यामध्यें व मदीरापानामध्यें तल्लीन होण्यामध्येंच ज्या प्रमाणें आपली सुधारणा मानून आहोंत त्याचप्रमाणें आमच्या स्त्रियांस लहंगे नेसण्यास देण्यांत व युरोपियन स्त्रियांप्रमाणें नट्टापट्टा करावयास लावण्यांत व त्यांचे चाली रीतींचें अनुकरण करण्यांत आमची सुधारणा आहे कीं काय?

उच्चप्रतीचें शिक्षण स्त्रियांस देण्याची उचल आमच्या सुधारकाकडून होत आहे परंतु ती किती घातुक हें वरती दर्शविलेंच आहे. शिक्षणास अथवा स्त्रियेस कोणत्याही प्रकारें आम्ही दोष देत नाहीं व दोष देणें हें चुकीचेंही होणार आहे. आमचें ह्मणणें इतकेंच आहे कीं, कालस्थितीवर लक्ष देऊन जें करणें तेंच केलें पाहिजे. 'मोर नाचतो ह्मणून लांडोर नाचते' अशा प्रकारची स्थिती आपणास नको आहे. ज्या कोणास असें वाटत असेल कीं, आपली मुलगी अथवा सूनही जन्मभर देव्हाऱ्यांतील देवाप्रमाणें वागविण्याचें सामर्थ्य असेल त्यानीं खुशाल आपल्या घरीं मुलीबाळीस उच्चप्रतीचें शिक्षण द्यावें. परंतु अशा शिक्षणाच्या शाळा घालणें कधींही योग्य होणार नाहीं. सगळीकडे साधारण आणि गरीब लोकांची संख्या श्रीमंत लोकांपेक्षां पुष्कळ पटीनें अधिक असते, व उच्चप्रतीच्या शिक्षणाच्या शाळा जर सगळीकडे स्थापन झाल्या तर श्रीमंतांच्या मुलींपेक्षां दुसऱ्या मुलींचा भरणा अधीक होणार आहे, व त्या योगानें थोड्या मुलींच्या नफ्याकरितां पुष्कळ मुलींचें विनाकारण नुकसान होणार आहे. साधारण प्रतीच्या मुलींस नीती शिक्षण व संसारांत लागण्या पुरतें तांत्रिक ज्ञान इतकेंच सध्यां पुरें आहे. मुलांप्रमाणें त्यांच्या पाठीमागें त्यांनां घोकपट्टी व डोळेफोड नसणें हेंच चांगल आहे. ईश्वरानें स्वाभाविकच त्यांच्या पुरतें त्यास कष्ट दिले आहेत त्यांत आणखी भर घालणें हें उचित होणार नाहीं. आमच्या प्रमाणें त्यांच्याही प्रकृतींत अशक्तता आणून आमची संतति अधिक निःसत्व करण्याचे उपकार आमच्या सुधारकांनीं आमच्या हिंदुस्थावर न करण्याची मेहेरबानी करावी.

---

बऱ्हाडसमाचार.

---

मिती चैत्र शुद्ध १२ शके १८१०.

---

## सर लिपेल ग्रीफीन व आमचें सरकार.

आज कित्येक दिवसांपासून सर लिपेल ग्रीफीन या बड्या गृहस्थाचें नांव आमच्या वाचकापुढें एक सारखें येत आहे. या गृहस्थानें आपला बडा अधिकार बजावितांना भोपाळाच्या बेगम सोहबांशीं जें वर्तन केलें आहे त्याच्या योगानें देशांत सगळीकडे मोठी चळवळ होऊन गेलेली होती. आमचे कलकत्त्याचे इंग्रजी बंधु अमृत बझार पत्रिकाकर्ते यांनीं तर यांच्यावर एकसारखें शस्त्रच उचलेलें होतें. आमच्या बंधुंचे सपटंबर महिन्या पासून सर्व अंक पहा. ज्यांत या साहेबांविषयीं कांहीं लेख आलेला नाहीं असा एकही अंक सांपडणार नाहीं. आपण स्वतःच लेख लिहून आमचे बंधु स्वस्थ बसले नव्हते. एतद्देशिय वर्तमानपत्रांपैकीं ज्या ज्या पत्रांत या साहेबां संबधानें कांहीं लेख येत असत त्यांचे उतारेही देण्याचा यांनीं क्रम ठेविला होता. सारांश सर लिपेल ग्रीफीन यांच्या विषयीं एतद्देशीय लोकांचें खरें मत काय आहे व त्यांचें वर्तन खरोखरच श्लाघ्य किंवा अश्लाघ्य आहे हें सर्व जनसमाजास व विशेष करून आपल्या सरकारास कळावें एवढ्याकरितां जो जो प्रयत्न करावयाचा तो आमचे बंधु आपलें कर्तव्यकर्म स्मरून करीत होते. परंतु सध्यांचा काल असा कांहीं चमत्कारिक आहे कीं सत्याला जयच नाहीं. उलटा असत्याचा पगडा त्यावर बसावयाचा. सांप्रतच्या प्रकरणांत तरी हीच गोष्ट झाली आहे. मध्यें अशी कंडी उडाली होती कीं आपल्या संबंधीं बेअब्रूचे लेख लिहिल्याबद्दल अमृत बझार पत्रिकेच्या कर्त्यांवर फिर्याद करण्याचा सर लिपेल साहेबांचा विचार आहे व त्या प्रमाणें तसें करण्याबद्दल त्यांनीं सरकारची परवानगीही मागितली आहे. ही कंडी आतां खरी ठरली आहे. सर लिपील ग्रिफीन साहेबांनीं ही परवानगी मागण्या विषयीं जो अर्ज केला होता त्याचें उत्तर सरकाराकडून त्यांस मिळालें आहे व तें प्रसिद्धही आहे. या पत्रांत सरकारनें फिर्याद करण्यास मागितलेली परवानगी तर दिली नाहीं पण आपल्या लाडक्या कामगाराच्या तोंडावरून हात फिरवून "बाळा तू कांहीं घाबरुं नको बरें. आह्मी तुझ्या मागें तुला टेका देण्यास तयार आहों. तूं करतो आहेस तें ठीक आहे. तसेंच चालूं दे" अशा प्रकारचें उद्गार काढून ग्रिफिन साहेबांचें समाधान केलें आहे. लॉर्ड डफरीन साहेबांची वादी व प्रतिवादी या दोघांच्याही तोंडावरून हात फिरवून दोघांनांही शांत करण्याची शैली सर्वत्र प्रसिद्धच आहे. इकडे ग्रिफीन साहेबांना परवानगी द्यावयाची नाहीं व त्यांनां वाईट वाटूं नये म्हणून तुह्मी दोषमुक्त आहां असें त्यांना आश्वासनही द्यावयाचें. एकंदरींत हें सर्व पत्र मोघमच आहे. असें ह्मणण्यास हरकत नाहीं सरकारचें असें ह्मणणें आहे कीं ग्रिफीन साहेबांनीं आजपर्यंत भोपाळ संस्थानांत ज्या ज्या गोष्टी केल्या आहेत त्या सर्व सरकारास मान्य आहेत व त्यावरून पाहतां एतद्देशीय वर्तमानपत्रें त्यांना जो दोष देत आहेत तो निव्वळ एकपक्षीय असून एकच व्यक्तीच्या तर्फें भांडणाऱ्या गृहस्थास साजणारा आहे. आमच्या सरकारनें अमृत बझार पत्रिकेंतील या विषयावरील लेख लक्षपूर्वक वाचले असतील असें आह्मांस वाटत नाहीं. कारण त्यांनीं जर तें वाचलें असतें तर निदान त्या संबंधानें चांगली चौकशी, मग ती खासगी ह्मणा, सरकारी खात्यानें ह्मणा, केल्या वाचून त्यांनीं निकालाचें उत्तर दिलें नसतें. अमृतबझार पत्रिकेंतील लेख एकपक्षीय असून एकाच व्यक्तीच्या वतीनें भांडण्या साठीं लिहिलें आहेत असें आमचे सरकार ह्मणतें परंतु ही व्यक्ती एक राजकर्ता आहे व ज्या गोष्टी साठीं तिच्या वतीनें भांडण निघालें आहे त्या गोष्टी लहानसहान नसून दरबारी माना अपमानाच्या आहेत हा विचार आमच्या सरकारच्या मनांत कधीं आला होता काय. ग्रिफीन साहेबांवर मुख्य आरोप त्यांनीं बेगम साहेबाचा भर सभेंत घडघडीत अपमान केला व त्यांना अगदीं अयोग्य आणि अश्लाघ्य अशीं पत्रें वगैरे लिहून त्यांच्या कोमल मनास वाईट वाटेल असें वर्तन केलें हा होता. हा आरोप लहान आहे काय? नवरा बायकोंत वितुष्ट आणून त्याची दृष्टादृष्ट ही करूं द्यावयाची नाहीं व राजकन्येशी गुप्त मसलतीं करून तिला आपल्या आई विरुद्ध वर्तन करावयास लावायाचें ह्या गोष्टी तरी क्षुल्लकच आहेत काय? या सर्व गोष्टि विषयीं चौकशी आमच्या सरकारानें अगोदर करावयाची होती. आमच्या सरकारला ही चौकशी स्वतः करावयाची जर लाज वाटत होती तर ग्रिफीन साहेबांना फिर्यादीला परवानगी लागत होती ती तरी द्यावयाची होती म्हणजे आपोआप सर्व गोष्टींचा न्याय झाला असता. परंतु आमच्या सरकारची बुद्धीच सध्या फिरून गेल्या सारखी झाली आहे त्याला काय उपाय. "बाळा ग्रिफाना तुला लोकांनीं व्यर्थ दोष दिले तुला दृष्ट किरे झाली असेल. येवढ्या साठींच सरकारनें तुला हें निंबलोण केलें आहे बरें कां अतां निष्काळजी रहा."

---

# The Berar Samachar

MONDAY APRIL 23, 1888.

## THE WAYS AND MEANS OF SOCIAL REFORM.

Dewan Bahadur R. Raghunath row took the opportunity of the time of the political Congress at Madras to formulate a social Congress. It is admitted on all hands that the social Congress cannot be a success to that extent to which the political Congress annually held, has reached. In matters political most of our leading persons throughout the land are agreed no matter whatever their creed or religious persuations. All are agreed that they are entitled to share more in the administration of the Government of their own country than they are allowed at present to do; and with this common end in view, their opinions are unanimous. But in matters social, there is admittedly no such common ground to go upon.. A Hindu Social Congress would hardly feel any interest in matters pertaining to the Social customs of the Mohamedans and *vice versa*; and it is only natural it should be so. In this case, therofore, the nature of things requires that the Congresses should be one for each different Community. But even if different Congresses might be made for the benefit of different communities yet there arises a further difficulty regarding the likelihood of any consensus of opinion on any particular point, as amongst the members of that community itself. For there are the Liberal, the Conservative and the Radical elements in our Society created by the spread of English education and persons of these three types of opinion can scarcely be of one mind on any reform that might be considered absolutely necessary by one of them. Under these circumstances the question arises as to what is the best means to secure the adoption of certain reforms by a community in which they are considered to be needed. It has been suggested that in the case of the Hindoos our great *Guru* Shankar Acharya might be invoked to lend his aid in the spread of some reforms. But the impracticability of this measure may almost be said to be axiomatic. In the first place you cannot expect a Shankar Acharya of such advanced views as to allow widow remarriage or the readmission to caste of persons going beyond the seas. Bred up in an atmosphere of quite a different type you can never hope to induce the religious head to accede in unmitigated terms to the much-needed reforms like the above or indeed to come to some compromise in such matters. And again even if he were so induced practically his advice on the point would not meet with a hearty response from the people. The time has gone when the great Acharya exercised a powerful sway over men's minds as the spiritual head of the Hindoos and his *bulls* would have as little efficacy now as those of the papal power that was once the dread of Europe. This is best illustrated in the fact that the intermarriages of the Deshasthas, the Konkanasthas and Karhadas- the three sects of Brahmins- which have been allowed by Shankar Acharya as having nowhere a prohibition in the Shastras, do not as a matter of fact take place. The force of custom is so strong and the crust of prejudices has waxed so thick that it has become extremely difficult to overcome that force or to penetrate that crust. The peple still do not have the intermarriages although expressly declared valid by the *guru*. Of course to any movement started to secure some reform it would be desirable if possible to have the sympathies of the *guru* on the side of the intended reforms; but mere Shankar Acharya's mandates by themselves would achieve nothing substantial for us. Another method has been suggested to secure the object in view. Committees of leading men of a caste might be formed with a perfectly representative character as to the shades of opinion held by the members of that caste. The Shastries and the Pandits might sit in a solemn conclave with the reformers of our new type and might settle certain points by the complete uniformity of opinion on them if possible, or at any rate by a majority of votes. In fact a blending of orthodox and heterodox opinions adjusted to a certain principle is what is suggested. But it is impossible to say that those who suggest this method know exactly the nature of what they are about. The two elements cannot possibly meet on a common ground. The Shastries and Pandits are not inclined to leave their old grooves and move an inch; how is then any compromise possible? What then is the proper remedy? The establishment of various local associations is what we would advise as practicable at the present moment. Persons who have been agreed upon some one point or two should enlist themselves as members of an association which should declare its policy with regard to those points. The members of such an Association should promise that they would adhere to the principles adopted by them as a body. Of Course all such associations are met with the objection that there would be a lack of executive authority in any such association and consequently there would practically be no remedy to prevent a breach of the principles by a recalcitrant member. The objection is a valid one but it is to be said

खेर

अं हास......

......ी बद्दल.

that the ... आत रु. १ ... esh which such associations a... १८८६ ...ts pure voluntary action an... ny kind. Only such need jo... ८१ ...nvinced of the principle of th... n and even if one of them goes ... t the declared principle, the Assc... will have lost nothing. There is ... ry great use of such associations vi... create a certain kind of moral supp... d sympathy for men of similar mind... hy we are afraid for instance of marry... ur daughters late is the expected ridic... and loss of the good opinions of suc... as we deem our equals in society. If those for whose opinions we cared counte... nced our doings, we would not care for the opinion of any other portion of the community, that is to say, not despise it but would not consider ourselves aggrieved if they thought ill of us. It is to create this moral support to fall back upon that such associations are mainly wanted. ... there are many points on which men of advanced views hold the same or very similar opinions; and if any association should declare its adherence to any such points a great moral support will be created to those that desire to follow the opinions of the Association on those points. We are not the only morally coward nation in the world; the Europeans are equally great moral cowards with regard to tremendously long gowns and some other customs amongst them equally undesirable. It is said that a gulf might possibly be created by such associations; for a time undoubtedly it would create something like a gulf: but the moral force of an Association must eventually carry the day as the masses will be let to do what people in higher social status are doing before their eyes.

A social Congress, whatever the idea may be supposed to represent, cannot possibly work satisfactorily except through such Associations. We cannot merely trust to time and education, we must take positive initial action and can not stand on with indifference.

## SIR W. HUNTER ON THE RECENT MOVEMENTS IN INDIA.

Sir William Hunter delivered an address on the subject of recent movements in India at the annual meeting of the National Association in aid of social progress and education in India. He said the present movements in India had advanced upon three distinct but convergent lines. There were the educational movement, the social movement and the political movement. He said that education had made a great progress in India during these last twenty years, and the National Congress, the education commission, the establishment of an organism of a native press, and all other activities are the outcome of it. We do not wish to offer any remarks on the educational movement going on; but we shall confine ourselves only to the social movement, that is being set on foot in all parts of India. We find in these days that our social institutions and customs are being made the subject of bitter criticism by Europeans and a portion of our people, who dazzled by the imposing and misleading aspect of European society, have formed utopian ideas about the social status of women, and began to condemn severely our social institutions as barbarous and disgraceful to the progress of civilization. Whatever is presented to the deluded eyes of these reformers, either good or bad agreeable to the society in which they move or otherwise, has the appearance of attracting novelty, and they without any consideration of consequences strive with might and main to introduce changes into their own social institutions after the fashion of the English. The Europeans may be excused for making an attack upon us when they see that our women are kept under the strict control of their husbands and are not allowed to flirt in society. But when the bitter criticism proceeds from our own people, it looks rather strange. Are the eyes of our reformers so deluded as not to see any thing in their own institutions satisfactory to them? Is it that our institutions, which were so long dearly cherished by our ancestors, and which completely secured to them family happiness, and a high standard of morality and chastity, are wholly bad and deserve indiscriminate condemnation? Do these reformers wish to insinuate that our women are tyranically treated as slaves were in ancient times? The best answer which could convince these persons, who misrepresent matters, is in the words of Sir William Hunter, who claims to be heard on matters pertaining to English society, because of his being an impartial Englishman and a critic. He says 'In all the social relations which could be tested by statistics the position of women in India is exceptionally high. The proportion of female criminals and prisoners to male criminals and prisoners was but a mere fraction of the proportion existing in England. Female drunkenness in India was unknown and a woman's life was safeguarded from poverty and crime in a manner which some of her English sisters might envy. But the question had arisen whether Indian women did not purchase their safety at too high a price and whether security was not compatible with a larger measure of freedom." The question raised by Sir W. Hunter is the one which ought to have been seriously discussed by our reformers. But in their blindness to the corroding evils of English society and their enthusiasm for imitating indiscriminately the manners and customs of the English, they have missed the true point at issue, and have indulged in unmerited condemnation of our social customs. Even Europeans admit that our restrictions have been productive of much good, and have secured a very high and enviable standard of morality and chastity. But that our women are required to pay very highly for this is partly true. To us it appears that security would be compatible with a larger measure of freedom, but only under conditions. The period of age between 15 and 25 is subject to temptation and the giving of liberty during this period means indirectly encouraging immorality and vice, and attempting to lower the standard of chastity among our women. When this period is once passed over a woman may claim a share of freedom, as she becomes more fit than before for making a right use of it, partly by the development of her understanding and virtues, and partly by the experience she gains of the world. It is then that she begins to understand her own responsible position, in the family, and to take interest in the management of the family whose welfare depends solely on her personal vigilance and care. But though we would advocate the giving of liberty to our women at this time we would never like to give them so much liberty as would enable them to mix freely in the society of strangers, hold unreserved intercourse with all, and flirt about. We do not for a moment believe that it is by these that we can raise the position of women. We would urge to give such kind of education to our women, as would make them fit to fill a position which they have in their family, with honour to themselves and to their husbands, and to be worthy of their copartner in life.

## वऱ्हाड.

मि. डेव्हिस साहेब असिस्टंट कमिशनर हे गेल्या शनिवारी स्पेशल असिस्टंट कमिशनरचे जागेचा चार्ज घेण्या करितां उमरावतीस गेले.

सरकारांनीं मिह्रा वरील कर वाढविला हें प्रजेस मुळींच मान्य व सुखावह नाहीं, म्हणून वऱ्हाडची सार्वजनिक सभा तो कर कमी होण्या करितां सरकारास अर्ज करणार आहे.

मि. एच्. बी. नौलिस साहेब डे. क. वाशीम हे तीन महिन्याच्या रजेवर जाणार व त्यांचे जागी मे. क्यापटन् मारिस साहेब अ० क० हे जाणार अशी वदंता आहे.

उमरावतीचे डेपुटी एजुकेशनल इन्स्पेक्टर रा. रा. बाळकृष्ण लक्ष्मण बापट यांनीं दोन महिन्यांची रजा घेतल्याचें कळतें.

येत्या पहिले तारखे पासून उमरावती व आकोले येथील सरकारी खजीन्यांची व्यवस्था मुंबइचे ब्यांकेकडे जाणार आहे. खजीनदारांच्या जागा कमी होऊन त्या जागेवर असलेले गृहस्थ रा. रा. हणमंतराव राजुरेकर व बळवंत बापुजी यांस तहसिलदार नेमावें म्हणून शिफारशी झाल्या आहेत. बिचाऱ्या कारकुनांची काय व्यवस्था होणार समजत नाहीं

मे. अबदुल हक्क कर्नाळकर हे गृहस्थ वऱ्हाडांतून निजामशाईंत गेल्यावर सरदार दिलीर उल्मुल्क बनले व निजाम सरकारचे होम सेक्रेटरी ही झाले. दैव उदयास आलें म्हणजे राव कसा होतो व ते बळवत्तर राहील तोंपर्यंत मनुष्य काय काय करूं शकेल याची कल्पना सदर्हू गृहस्थाच्या आजपर्यंतच्या चरित्रावरून सहज करितां येईल. हे सरदार सध्यां कालचक्राच्या फेऱ्या खालीं सांपडले आहेत अशा अर्थाची एक बातमी नुकतीच कळतें कीं, त्यांस निजाम सरकारांनीं दाहा प्रश्न केले आहेत त्यांचीं उत्तरें येऊन इनसाफ होईपर्यंत त्यांस कामावरून दूर केलें आहे. लक्ष्मी घरांत नांदत असली म्हणजे मनुष्यास संपत्तीच्या अवादानींत मागील पुढील पोंच राहात नाहीं व वाटेल तशीं द्रव्यलोभानें अनुचित खटलीं हातांतून घडतात अशांतला पर्याय सरदार मजकुरा कडून घडला नसावा व अर्थात् त्याचें प्रायश्चित्त त्यांना घ्यावें लागणार नाहीं असें त्यांच्या नेहमीच्या वाकबगारी वरून म्हणतां येईल. त्यांनीं मुंबईचे हायकोर्टे वकील रा. रा. शांताराम नारायण यांस हैद्राबादेस नेल्याचें ऐकितों. हें करण त्यांच्यावर शेकल्यास अनेक कुलंगडी बाहेर पडतील [illegible] विषयीं निजामसरकार विशेष कसोशीनें न्यायमुनसबी होण्या करितां लक्ष्य पुरवितील असें आम्हीं इच्छितों.

'प्रोफेसर बी. जी. इंडिअन कंपनीं' नामधारी छोटेखानी मंडळीनीं परवां शनवार रात्रौ अद्भुत जादूचा खेळ करून दाखविला. खेळ मौजेचा आहे कांहीं जादु साधारण लोकांस अजब वाटण्यासारख्या आहेत. त्यांत 'पिशाच रूपी ग्लास, पत्याचे खेळ, "रिंग, आणि केन' इत्यादि गारुड्याचा नजरबंद खेळाहून थोड्या विशेष आहेत. जादूच्या खेळांत नक्कल अस्सल प्रमाणें बठविण्याची हातोटी या कंपनीच्या प्रोफेसर गृहस्थास न साधिल्यामुळें खेळ कंटाळवाणा वाटला. खेळाच्या महत्वाच्चा मानानें टिकीटाचा खर्च पहातां बरेंच अशीं लोकांस फक्त गंमत वाटेल इकडे मंडळीनीं लक्ष्य पुरविलें असतां एकदां खेळ पहाण्यासारखा आहे या करितां लांब पल्यावर आलेल्या पाहुण्यांचा प्रेक्षक मंडळी परामर्श ठेवतील असें इच्छितों.

### नोटीस.

सन १८८८।८९ सालचे मेहेतर पट्टीचे लायसन्स ता० १ माहे एप्रील सन १८८८ रोजीं घेण्याचे असोन व सर्वांस जाहीर खबर दिली असोन ही पुष्कळ लोकांनीं अद्याप लायसन्स घेतलें नाहीं. यास्तव सर्वांस कळविण्यांत येतें कीं, ज्यांनां अद्याप मेहतर पट्टीचें लायसन्स घेतलें नाहीं त्यांनीं ता. ३०।४।८८ चे आंत तावडतोब लायसंनस घेण्याची व्यवस्था करावी यापुढें ज्याच्या जवळ लायसंनस राहणार नाहीं त्याजकडेस भंगी पाठविणें बंद केले जाऊन मैला राहील्या बद्दल आणि लायसनस न घेतल्या बद्दल मोकदमे केले जातील कळावें ता० २१।४।८८

Deorao Vinayak
Vice President

### नोटीस.

गुलाबराव वल्लद दवलतराव पालन करणार बाळाबाई मर्द दवलत राव व एज्यंट गणपत राव वल्लद अबाजी देशमुख रहाणार वरध तालुके खामगांव, यास नोटीस देणार रुपराव वल्लद दवलत राव देशमुख रहाणार वरध. नोटीशीनें असें कळवितों कीं, आमची सर्व शेती आमच्या खत्याची आमचे नांवें आहे. व या बद्दल मेहेरबान कमिशनर साहेब यांनीं तारीख १६सप्टेंबर सन १८८६चा जो ठराव केला आहे त्या ठरावा प्रमाणें सर्व जमिनीचे भाग सारखे तीन करून घ्यावेत. मात्र व्यंकट राव यादव राव देशमुख यांच्या हिशाची जमीन वजा करून बाकी जमीन सदरील तारीख १६ सप्टेंबर सन १८८६ च्या ठरावा प्रमाणें तिसऱ्या हिशाची जमीन घेऊन पावती घ्यावी. सदरील लिहिल्या प्रमाणें आपण नोटीस पावल्यापासून आठ दिवसांत निकाल करावा न केल्यास आह्मी कोणत्याही प्रकारें जबाबदार नाहीं हें आपल्यास कळावें.

आम्हीं कांहीं कामा करितां हैद्राबादेस गेल्याच्या मागें आमची वडिलार्जीत ज्वारीचीं पेवें दोन ज्वारी खंडी १९ एकुणीस तुह्मी आह्मास न विचारतां त्याची विल्हेवाट केली. तर त्याजबद्दलची आमच्या दोन हिशाची ज्वारी खंडी १२ बारा मण १३ तेरा आदमासे आमची आह्मांस द्यावी न दिल्यास त्याजबद्दल रीतीप्रमाणें तजवीज करूं. याज प्रमाणें आमचा एक बैल किंमत रुपये २०० दोनशेचा आपण आह्मांस न विचारतां ग. रा. अच्युतराव बळवंत राव देशमुख म्यापटर गांव यांस दिला असें आह्मी ऐकतों. तर बैल त्यांस दिला असल्यास त्यांजबद्दलची किंमत रुपये २०० हिस्सा होतेवेळीं वजा यरून घेऊन व या प्रमाणें स्थावर जंगम वडिलार्जित जिनगीच्या ठरावा प्रमाणें तिसरा हिस्सा घेऊन निकाल करावा. व पावत्या फारकती करून टाकाव्यात. कळावें. ह्मणून दिली नोटीस. तारीख २० माहे एप्रील सन १८८८ इसवी.

( सही )

रुपराव दवलत राव देशमुख
दस्तुर खुद.

## वर्तमानसार.

साल अखेर ...... १ ८

करकोळ अंक हास ...... ०४

नोटिशी बद्दल.
१० ओळींच आत रु. १
पुढें दर ओळीस ०१०६
दूसरे खेपेस ...... ०१

week. ...e should ... to do f... ...e fare

# व्हाडसमाचार.

Advertisements.
Below 10 lines... .2R
Per line over 10...4as
Repetition perline...3

THE BERAR SAMACHAR.

OLXXII — AKOLA MONDAY 30 APRIL 1888 — NO. 17

वर्ष २२ — अकोला सोमवार तारीख ३० माहे एप्रील सन १८८८ इ० — अंक १७

## शिक्षकांस महत्वाची जाहिरात.

सर्व विद्या वृद्धीच्छू सभ्यांस विनय पूर्वक कळविण्यांत येतें कीं, आम्ही येत्या जुन महिन्यापासून मराठींत "शिक्षकमित्र" नांवाचें पुस्तक काढणार आहों. या पुस्तकांत शिक्षकांस अति उपयोगी अशा विषयावर निबंध; कारलाईल, लॉक, स्पेनसर; इत्यादि पंडिताचे शिक्षणा वरील विचार; जगांतील विख्यात शिक्षकांची बोधपर व मनोरंजक चरित्रें; सुधारलेल्या देशांतील निरानिराळ्या शिक्षणपद्धतीची माहिती; इंग्रजी व संस्कृत ग्रंथांतील उत्कृष्ट स्थलांचें भाषांतर रूपानें गद्य पद्यात्मक उतारे इत्यादि विषय येतील.

पुस्तकाचा साचा हमेशच्या षोडश पत्री साच्याचीं २४ पृष्ठें ह्मणजे शेतकरी मासिक पुस्तकाचे एवढाच आहे.

वर्गणीचे दर—वर्षाचे आगाऊ टपाल खर्चासह २०६ तथापि जे वर्गणीदार आपली वर्गणी येत्या मे अखेर पर्यंत पाठवून देतील त्यांना पहिल्या वर्षाचे १२ अंक अवघ्या दीड रुपयांत मिळतील. लोकाश्रय चांगला मिळाल्यास पुढेंही हाच दर कायम केला जाईल. वर्गणीदार होऊं इच्छिणाऱ्यांनीं त्वरा करावी.

पुस्तका संबंधानें पत्रव्यवहार करणें व वर्गणी पाठविणें ती खालील पत्त्यावर पाठवावी.

पुस्तककर्त्ता.
बाळकृष्ण गोविंद सुळे
फर्स्ट असिस्टंट मास्तर
आंग्लो व्ह० स्कूल
जळगांव
(वऱ्हाड.)

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

मुक्काम यवतमाळ ता. २४।४।८८ इ०
रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस.

दिनचर्या.—हल्लीं उन्हाळा ऐन रंगांत आलेला आहे. त्यामुळें आठ दिवसां आठ वाजल्या नंतर घरांचे बाहेर निलकुल पडवत नाहीं. तरी येथील लोकांचें नशीब थोर कीं, आपले आकोलेंपेक्षां किंवा उमरावती पेक्षां येथील हवा संध्याकाळीं फार लवकर थंड होते.

स्वाऱ्या—या जिल्ह्याचे अधिपति मे. कर्नल रेनिक साहेब बहादूर हे आपले आफिसासह येथें येऊन दाखल झाले. कांहीं दिवस दारव्हे तालुक्यास कडे स्वारीनिशीं कांहीं कामा करितां जाऊन आल्या नंतर यंदाचे सालचा दवरा पुरा करण्याचा साहेब बहादुरांचा विचार दिसतो असें ऐकण्यांत येतें.

मे० देवराव बाबा साहेब ए० अ० क० हे केळापूर तालुक्यांत आहेत. साहेब लोक मार्च महिन्यांत आपलें हिंडण्याचें काम बंद करितात. परंतु आमचे बाबासाहेब मार्च महिन्यांत निघाले ते मे महिन्यांत आपला दवरा पुरा करणार असें म्हणतात.

पक्षकार लोकांस त्रास होऊं नये ह्मणून मे० जुडि० कमिशनर यांनीं फिरूं नये ह्मणून आलिशान रेसिडेंट साहेब बहादुरांनीं सरक्युलर केलें. कारण जु० क० चा संबंध जे लोक दाद मागण्यास येतात त्यास त्रास न होता एके ठिकाणीं राहून दाद मिळावी त्याच प्रमाणें मे० बाबा साहेब ह्यास मुलकी कांहीं अधिकार नसून निवळ जुडिशिअल अधिकार आहे. त्या करितां फिरण्याची जरूर नसून उलट दाद मागण्यास येणारे लोकांस फार त्रास सोसावा लागत आहे. वणी तालुक्यांतील लोकांस दारव्हे तालुक्यांत व दारव्ह्याचे लोकांस वणी तालुक्यांत ह्मणजे सुमारें ५०। ६० कोस जावें लागतें गरीब लोकांची दूरचें गांवांत ओळख नसल्यामुळें भांडीं मिळत नाहींत त्यामुळें उपासमार सोसावा लागत आहे. ह्या बद्दल वरिष्ठ अधिकारी विचार करून गरीब लोकांची दया करतील तर बरें. उन्हाळ्याचे दिवस असल्यानें प्रसंग विशेषी उन्हाचे तापानें मनुष्य मरण्याची सुद्धां भिती असते सबब विशेष लक्ष्य पोंचेल अशी उमेद आहे. मे. बाबा साहेब ह्यांजकडे डिस्ट्रिक्ट रजिष्टरचा अधिकार असल्या मुळें त्यांस फिरण्याची जरूर आहे असें असेल तर तितक्या पुरतें त्यांनीं फिरावें दिवाणी फौजदारी काम बाहेर नेण्याची गरज नाहीं असें मला वाटतें ह्या करितां सरकारांनीं यंदाचें साल दवरा तर संपला परंतु पुढील सालीं जुडिशिअल अधिकाऱ्यांनीं फिरूं नये असा बंदोबस्त करावा. अशा बद्दल आपण शिफारस कराल अशी आशा आहे.

खुनांचा सुकाळः—यंदाचें सालीं आमचे ह्या लहानशा जिल्ह्यांत बरेच खून झाल्याचें समजतें ते येणें प्रमाणें:—

१ ला. वणी तालुक्यांतील धानोरा ह्या गांवीं भगवादीन ह्या नांवाचा कोणी हिंदुस्थानी ब्राह्मण राहत असे. हा पूर्वीं पोलिसांत हे. कानस्टेबल होता परंतु पुढें पोलिस इन्स्पेक्टरचे व त्याचे कांहीं कारणानें न जमल्यामुळें त्यानें आपले जागेचा राजिनामा देऊन कांहीं व्यापार वगैरे करूं लागला त्यावेळीं आसपास कांहीं चोऱ्या होत त्यांत ह्याचें अंग आहे असा पोलिसास संशय आल्या वरून ते नेहमीं त्याचे पाळतीवर असत परंतु प्रत्यक्ष पुरावा नसल्या मुळें त्यास धरता येईना. त्या नंतर त्यास वाटूं लागलें कीं पोलीस आपल्यास विनाकारण त्रास देतात ह्या बद्दल कांहीं तजवीज केली पाहिजे असें जाणून आपल्यास मुख्य त्रास देणार पो० इ० व धानोरा येथील हे० का० ह्यास मारण्याचा विचार केला. त्या प्रमाणें सुमारें दोन महिन्या पूर्वीं हे० का० निजला असतां त्यास तलवारीचे एका सपाट्यानें ठार केलें. त्यास धरण्या करितां दुसरा एक इसम आला त्यासही ठार केलें मध्यंतरी एक कुत्रें अंगावर आलें त्यास ही मारलें ह्या प्रमाणें खून करून पो० इ० मोहकमसिंग ह्यास मारण्या करितां दोन महिने पर्यंत कोणाचे हातीं न लागतां जवळ तलवार बाळगून लपून राहात असे. परंतु पोलिसास त्यास धरण्याची हिम्मत होईना. असें कांहीं दिवस झाल्यावर एके दिवशीं सुमारें १५ दिवस होणरा तोच आपले राखेचे घरीं निजला असतां पोलिसास बातमी समजली त्यावरून कानस्टेबल व मोंगलाईतील जमादार सुंदरसिंग ह्मणजे आमचे पो० इ० सा० चे बंधु हे मिळून तेथें गेले भगवानदीन हा जिवंत सांपडत नाहीं. व तो जिवंत राहिल्यास इ० सा० चे जिवास धास्ती असें जाणून एक गोळी मारली ती त्याचे मांडीस लागली तरी तो गोळी जिकडून आली तिकडे तलवार घेऊन धावून गेला असतां दुसरी गोळी छातींत लागून मेला गेला भगवानदीनच्या एका साथीदार मनुष्यास धरून येथें आणले त्याची चौकशी सुरूं आहे काय होते पहावें.

२ रा. दारव्हे तालुक्यांतील कोणत्याशा गांवीं एका कुणब्याचा खून करून जंगलांत टाकून दिलेला मुदा सांपडला. खून करणारा कोण हें समजलें नाहीं.

३ रा. यवतमाळ तालुक्यांत सोनें गांवीं एका मुसलमान गवंड्याच गळयास कोणी फास लावून खून केला ह्या बद्दल पोलिस तपास सुरूं आहे.

४ था. केळापुर तालुक्यांतील घाटअंजी पोलिस स्टेशन येथें तेथील चि० का० ने अकोलें येथें जातिकारकून होते त्यांनीं तेथील एका कोमट्यानें वाईट तूप दिलें त्यामुळें राग येऊन छातींत लाथ मारल्या बरोबर प्राण निघून गेला असें समजतें. त्याचे चौकशी करितां मे. बाबा साहेब गेल्याचें समजतें.

अपळा "स"

मुक्काम वाशाम २५।४।८८

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांसः—

कृतानेक साष्टांग नमस्कार वि० वि० हल्लीं उष्णता फार भासूं लागली आहे उष्णमापक यंत्रांत पारा शंभर अंशांवर असतो. हाल मजकुरीं उष्णतेचें मान विशेष दिसतें. अकोल्या कडील हवा नेहमीं उष्ण अधिक असते अशी ख्याती आहे. परंतु इकडे जर आतां मर दोन प्रहरीं उष्णता तोंड बाहिर काढूं देत नाहीं तर आतां तिकडे कसा प्रकार असेल याचें अनुमान येऊनच सहज होईल. सालमजकुरीं आंबे फार आले आहेत. उष्णता फार आहे. पर्जन्य पडण्यास अजून सुमारें दीड महिना आहे. तेव्हां लोकांच्या मनांत एव्हां पासून रोगाची भिती उत्पन्न होत आहे असो ईश्वरेच्छा बलीयसी.

ता० १६।४।८८ इ० रोजीं रा. रा. गणपत राव दहींगांवकर यांनीं क्लार्क ऑफ धी कोर्टाच्या कामाचा चार्ज घेतला. त्यांना आपल्या कामामध्यें नुतन ठिकाणीं यश येवो. त्याच दिवशीं मिस्तर काबळे यांनीं तहशीलदाराच्या कामचा चार्ज घेतला. व मिस्तर साइत मीरखान रजेवर पुसदाकडे रवाना झाले. मिस्तर काबळे यांस आतां स्वतंत्र काम मिळालें आहे तें ते हुशारीनें करितील व लवकर कायमची तहशिलदारीची जागा मिळवितील अशी सर्वांस फार आशा आहे.

येथील पोष्टांतील खटला ता. २।४।८८ इ० रोजीं निघाला होता. तेव्हां कांहीं जबान्या होऊन प्रॉसिक्युशन तर्फे अधिक पुरावा आणण्याकरितां ता. १३।४।८८ इ० पर्यंत खटला तहकुब ठेवून अकोलें पोष्टांतील कारकून रा. रा. दत्तोपंत हे पार्सलाची गडबड झाली त्यावेळीं येथें होते व त्यांची साक्ष घेण्याचें ठरल्यावरून त्यांस समन्स केलें होतें ते आल्यावर सदरहु ता. १३।४।८८ इ० रोजीं खटला पुनः कोर्टा समोर आला. नागापा कुपुस्वामी आरोपी याची जबानी झाली कीं मी कांहीं केलें नाहीं पोष्ट मास्तर यांनीं सर्व केलें असें तो ह्मणतो. नागापाची बदली झाली त्यावेळीं मिस्तर दत्तोपंत यांस त्याजपासून चार्ज समजून घेण्या विषयीं हुकूम पोस्ट मास्तर यांनीं दिला होता त्या प्रमाणें दत्तोपंत यांनीं चार्ज घेतला परंतु त्या वेळीं काळजी पूर्वक सर्व तपास केला नाहीं व नागापाची कृती उघडकीस आणिली नाहीं त्यांणकरून पुढील सर्व घोटाळा झाला. असें घरसोडीचें बोलणें जबानींत झालें त्या मुळें दत्तोपंत यांनीं अर्धे रुपये २९०४ भरावें असा पोष्टाच्या साहेबांनीं हुकूम दिला असें कळतें. पुढें कांहीं साक्षी पुरावा होऊन नागापा वर चार्ज ठेविण्यांत आला असें ह्मणतात. व त्यानें आपल्या बचावा करितां पोष्ट मास्तर वाशीम यांची व पोष्टाचे डेप्युटी पोस्ट मास्तर फॅकनी साहब यांस साक्षी साठीं समन्स केलेलें आहे असें ह्मणतात. ता. १।५।८८ इ० रोजीं पुनः मुकदमा कोर्टासमोर यावयाचा आहे. नागापास कारागृहामध्यें सध्या दिवस काढावे लागतात हें फार वाईट आहे. "हांसत कर्म करावें भोगावें रडत तेंच परिणामीं" ह्यानें सदहु गोष्ट केली किंवा नाहीं. हें ईश्वर जाणें परंतु सध्या त्याला दारूनुपडून कच्ची कैद सोसावी लागते. तारीख फार वाईट वाटतें. कोणी ह्मणता मा दुसऱ्या कोर्टांत बदलणार नाही असेल तर असें कां हा प्रश्न [illegible] भूत झाले ... तो. कसें होतें. तें पहावें. ...हरणा सारखी आहे. ...आत्य कल्पनेप्रमाणें सर ...चरण शुद्ध ह्मणतील वर

no dis...

रोजीं निकाल झाल्यावर निकाल पुढील पत्रीं कळविण्यांत येईल.

येथील पोष्टमास्तर रा. रा. प्रल्हाद गणेश यांस चीफ कान्स्टेबलची जागा ३० रुपयांची इलिचपुर जिल्ह्यांत मिळाली. हे गृहस्थ फार हुशार असून मन मिळाऊ होते. आपलें काम लक्षपूर्वक करीत असत. हे या गांवचेच रहाणारे असून प्रसिद्ध वाळके यांचे घराण्यापैकीं आहेत. ईश्वर त्यांस नवीन कामांत यश देवो. त्यांचे जागीं रा. रा. विष्णुपंत टिळक यांस नेमिलें आहे. ते येऊन कामाचा चार्ज समजून घेतल्यावर मिस्तर प्रल्हादपंत आपले नवीन जागीं जातील.

येथील श्री बाला साहेबाचे मंदिरांत रामनवमीचा मोठा उत्साह होतो. ह्मणजे रामजन्म मोठ्या थाटानें झाला. त्या दिवशीं मोठी गर्दी जमली होती ऐन दोनप्रहरची वेळ. हजारों स्त्री पुरुषांची गर्दी देवालयांत झाली. कित्येक लोक उत्साह पहाण्यास, कित्येक स्त्री जनांची थट्टा करण्यास, कित्येक लोकांचे बाहेर ठेविलेले जोडे चोरण्यास या प्रमाणें तेथें मोठी धुमच. काय विचार तो!! श्री बालासाहेबाचे दरबारांत कसाही असला तरी पुनितच होतो. "नामावर हीन दीनही तरती."

येथील पंडीत सुरज नारायण अ. कमिशनर साहेब यांस श्वानदंश झाल्यावरून ते रजेवर गेले असें ह्मणतात.

येथें फॉरेस्टाकडील हत्ती उन्मत्त झाला आहे. तो माऊत यास जुमानीत नाहीं. त्यास मोठा सारवळदंड लावून बांधून टाकिला आहे. व तो नीट न झाला तर त्या पासून मनुष्याच्या जिवाला इजा होऊं नये ह्मणून मारणार आहेत असें ह्मणतात. हें खरेंच असेल तर कायही मोठ्या जनावराची दुर्दशा!! एकूण काळ सर्वांच्या पाठीमागें लागलाच आहे.

शाळाखात्यांत असा ऊंच नीचपणा कां? येथील बड्या शाळेंतील मास्तरांस व मुलांस ता. २०।३।८८ पासून एकवेळ उन्हाळ्या निमित्य सुटी मिळते व मे महिन्यांत अगदीं शाळा बंद रहाते. व येथील मराठी शाळा गांवठी नव्हे ही सरकारीच असून त्या शाळेस सुटी नाहीं. त्या शाळेंतील मुलांचा व मास्तरांचा जीव नव्हे काय! मेची सुटी तर बिचाऱ्यांस नाहींच. परंतु एकवेळच्या सुटीचा ही बिचाऱ्यांस मोठ्या शाळा प्रमाणें तस उपभोग घेण्यास मिळूं नये. ही केवढी विस्मयकारक गोष्ट आहे. शाळा खात्याचे नियंते यांना मुलांचा कळवळा येऊन मोठ्या शाळे प्रमाणें सुटी एक वेळची तरी पूर्ववत् सुरू करतील तर फार बरें होईल.

हा जिल्हा बहुधा स्त्री शिक्षणाच्या संबंधें फार मागें आहे. येथें खुद्द स्त्री शिक्षणाभिमानी लोक फारसे दिसत नाहींत. येथें मुलींची शाळा आहे परंतु ती नांवाचीच मात्र आहे असें ह्मटलें तरी चालेल. ह्या शाळेवर कोणी स्त्री नेमली जाणार आहे व तसें झालें तर खरोखर शाळेची स्थिती सुधारेल असा [illegible]कांचा ग्रह आहे. हा स्थिती लवकर येवो [illegible]च्च, शाळा स्त्रियांकडून चांगल्या पुरुषांकडून याचा अनुभव पाहू हे विनंती.

आपला प्रेमेच्छु

"क्ष"

res. on whic points 2. Th transactio business wi.

मित्ती

hen disap.

वऱ्हाडसमाचार.

मित्ती चैत्र वद्य ५ शके १८१०.

सालाबाद प्रमाणें मिठावरील कर खेरीज करून बाकी ब्रिटिश इंडियांत येणाऱ्या मालावरील व ब्रिटिश इंडियांतून जाणाऱ्या मालावरील कर व जकात मिळून झालेल्या उत्पन्नीचें पत्रक प्रसिद्ध झालें आहे त्यांत सन १८७१ पासून १८८८ पर्यंत सालोसाल होत आलेल्या उत्पन्नाचे आकडे दिले आहेत त्यावरून ह्या उत्पन्नाची बाब दिवसे दिवस कशी फुगत चालली आहे हें उघडपणें ताडतां येतें. एक गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्या सारखी आहे ती ही कीं बाहेरून येणाऱ्या दारूवरील उत्पन्न वर्षानुवर्ष झपाट्यानें वाढत चाललें आहे. सन १८७१–७२ सालीं २३,९०, ०० रुपये उत्पन्न असून सन १८८७--८८ सालीं ९२,४२,००० रुपये झाले म्हणजे उत्पन्नाचें प्रमाण गेल्या सोळा वर्षांत दुप्पटीवर झालें आहे; आणि एकंदर येणाऱ्या मालांवरील जकातीचें उत्पन्न सारें ९९, १४,००० रुपये आहे. ह्यावरून दारू शिवाय इतर जिन्नसा वरील जकातीची बाब फारच अल्पस्वरूप आहे हें स्पष्टपणें दिसून येतें. माल हिंदुस्थानांत येतो त्या प्रमाणानें जकातीचें उत्पन्न फार कमी होतें तरी तें हिंदुस्थान सरकारास कबूल आहे. बाहेरच्या मालाची विक्री जारीनें चालू राहण्यास त्या त्या मालावरील कर अत्यंत माफक असावेत, त्या प्रमाणें जकात कमी ठेविली आहे तेव्हा विलायती जिन्नसांस चांगली तेजी असते माल सस्ता पडतो, व आमचा देशी माल मागें पडत आहे. अर्थात् हिंदुस्थानचा व्यापार खालावण्यास व क्रमानें क्रमानें मोडकळीस येण्यास ही जकातीची युक्तीरामबाण आहे हें कोणी ही सांगू शकेल. बाहेर जाणाऱ्या मालावरील जकातीचें उत्पन्न ७३,७९,००० रुपये सन १८८७--८८ सालीं असून एकंदर कस्टम खात्याचें उत्पन्न १,२२८,९३००० रुपये आहे हे वर दिलेले आंकडे खर्चवेंच जाऊन निव्वळ सरकारच्या तिजोरींत पडलेल्या रकमेचे आहेत. मागील सन १८८६--८७ साला पेक्षां सन १८८७--८८ सालीं ८,११,००० रुपयें जास्त उत्पन्न आलें असून ही कर वाढविण्या बद्दल चोहोंकडे कारवाई चालू ठेविली आहे तेव्हां वळी तो कानपिळी नाहीं असें समजून निमुटपणें स्वस्थ राहणें भाग आहे.

चालूं सालीं पब्लिक वर्क्स डिपार्टमेंट मधील चवथे वर्ग अकाऊंटंटच्या परीक्षेकरिता येणाऱ्या उमेदवारांची परीक्षा सीबपूरच्या सिव्हिल इंजिनिअरींग कालेजमध्यें जून तारीख चार व पांच या दोन दिवशीं होईल.

तारीख २२ मे मंगळवार रोजीं नामदार गव्हरनर जनरल साहेब 'व्हाईस रीगल लॉज' मध्यें लेव्ही भरविणार आहेत.

कच्छ बिहारेच महाराज नृपेन्द्र नारायण भूप बहादुर यांस राणी सरकारनीं 'नाईट ग्रांड कमांडर आफ दी मोस्ट एमिनंट आरडर आफ दी इंडियन एम्पायर' नेमिलें आहे.

# The Berar Samachar

MONDAY APRIL 30, 1888.

The speech delivered by Sir Syed Ahmed the venerable founder of the Aligarh College is just characteristic of the conservative jealous and mischievous nature of the race he represents. This great detractor of the National Congress pretends to think seriously whether our countrymen are justified to make political movements and our demands for representation in councils are just. But in dealing with this subject he has missed the right point and has hopelessly fallen a prey to party spirit and deeprooted prejudices against the Bengalees and the Hindoos. The noticeable feature is that in his hot-brained and foolish controversy he has secured very few sympathisers. The whole press, with the exception of one or two papers like the Pioneer and the Times, utterly deprecate the tone of his malevolent criticism and consider that his statements are downright misrepresentations. His arguments in vindication of his weak side are childish and worthless, and are no more than invectives and foolish attacks on individuals. The number of Mahamedan delegates was not one or two, as he says, but was 83. The figure is large enough to represent that community of Mahamedans. He would have coreligionists believe that those Mahamedans who attended the congress went to Madras not from their sympathy with and eagerness for the movement, but from official pressure or some temptation or in order to keep their profession, or to gain notoriety. Whatever the facts may be or whatever malicious insinuations we might attempt to make we do not wish to enter into them. But we wish to bring to his notice a fact which is lost sight of by him in studying historical literature and parliamentary reports. A careful observation would disclose a fact that in all movements, political, social or religious, there are only few who are really interested in them, and who fully appreciate the benefits resulting from them; while the rest are mere sheep and blindly follow them. The real sympathisers are required to create interest in their followers and in certain cases to use official pressure, as he puts it, to come over to them. How often have we heard that while hot debates are going on in the Parliament, the gallery becomes filled with idle and indifferent members, who never take a part in the debate, but who only await the time of giving their votes favourable to the cause of the party they represent? The leaders bother themselves with the discussion on important questions, while the followers with collecting votes. If such state of things is to be found in England where these institutions have existed for centuries past, what wonder then that our men are required to be awakened to the advantages of possessing these institutions and to be brought in to take great interest in them. Political activity is of a recent growth in India and that too is to be found among the classes, who have received some Western cult[illegible]t is quite natural that in the pres[illegible]ate of society there are found [illegible] who are still in the dark ab[illegible]olitical life. The great mass [illegible] people of India has yet to learn what Government and politics mean, and what the mutual duties of sovereigns and their subjects are. If then Sir Syed comes forth at this time, to decry the national congress, much harm would surely be done to the progress of civilization in India. If he complains that there are many who have not the least idea of what politics mean, he ought to be the more blamed for it. It is his duty to become a missionary and try to educate the people in this respect. Let him take the lead in this matter and he would be welcome not only to his coreligionists but even to Bengalees and Hindoos.

Sir Samuel Smith delivered a speech in the House of Commons on the 23rd February 1888. The substance of the speech is very interesting and valuable; for it shows the aggregate pressure of taxation on us and clearly proves that our capacities for taxation are quite exhausted. It also shows how much harm the misleading statements of the Under Secretary of state for India and his colleagues are doing to the interests of the people of India. We have more than once said that the people of India are so miserably poor that they have hardly the means of subsistence, and the truth of our statements is borne out by the following figures. Sir Samuel Smith says 'It is generally admitted that the aggregate income of the United Kingdom is now 1200 to 1250 millions or 35£ per head, but the best authorities on India state that its income cannot be put at more than 2£ per head or 400 millions sterling for the 200 millions of people that inhabit British territory. Sir Evelyn Baring one of the best finance ministers estimated the income at Rs. 27 perhead but Mr. Dadabhai Nawroji, one of the best native statistists of India and a man universally respected puts the income at Rs. 20 per head. Compare that with even the poverty of Ireland, where the income according to mulhall is 16£ per head, or with Russia where it is 9£ 10s per head. The income tax returns fully confirm all this. They show that a given area of population in India only produces one sixtieth part as much as in England and that only one inhabitant in 700 reaches an income of 50£ per annum. I estimate that true incidence of taxation in India as follows: Gross land tax 22 and a half millions; one half the opium (not counting what is grown in native states) 4 and a half millions salt tax, 6 and a half millions; stamps 3 and a quarter millions; excise 4 millions; Provincial rates, customs, Assessed taxes and sundries about 6 millions. Total in round numbers 47 millions. If we take the aggregate income of British India a point half way between the estimates of Mr. Dadabhai Nawrojee and Sir Evelyn Baring viz 40 millions it follows that the taxable revenue is just 10 percent against 6 per cent paid in the United Kingdom.'

Can a man of conscience now deny that the pressure of taxation is very heavy and that a large proportion of the people only eat one meal a day?

## DESULTORY READING.

(communicated).

The world is pictured anew to a reader in his books, quarterlyr eviews, maga[illegible],

[illegible]रण शुद्ध ह्मणतात

dailies, bi-weeklies and weeklies. It is his look out to learn how he should read them all. He cannot undertake to do full justice to each of them nor can he fare well in his civilized society if he neglected them completely. He must manage to abridge for himself the information he gains from his reading the various works on the different branches of human thought. He must look into the world from different stand-points of view as the aspect before his mental eye changes in matter and form. The old method of reading in extenso will not do to a student of the present generation. He has learnt from the numerous compendiums and short abridgements in his school and college life. Best writers have produced in a hundred pages the history of the whole world and that too in the language of the well-known authors of acknowledged merit. This course of sketches is a short cut but it ill prepares a student to become himself an author of such short texts for himself in his after-life. There is no royal road to knowledge, The old method teaches him how he should learn the art of desultory study so that he may have proper command of his reading. Neither desultory reading is unworthy of philosophical examination nor is it a contradiction in terms. Severe critics might be tempted to say that desultory work was at best only to be tolerated and was quite unworthy of serious discussion. We dissent altogether from such a theory as that and we shall try to set some considerations to show not only the charms but also the utility of the desultory method. This method is based on the old system of complete texts and not on that of sketch books which are not better than mere reference books. It differs from the continuous method. We are familiar with the distinction between deductive and inductive reasoning. It always seems to us that the severe method of study is more applicable to the former and the latter or desultory method to the latter. The continuous reader will make the better progress in reasoning and in drawing deductions from given premises. The desultory reader will, or may, succeed more effectually in cultivating the faculty of observation and in collecting the materials which must form the foundation for the inductive science. As regards the comparative pleasures and advantages of close and of desultory study we would liken the one to a journey by railway, the other to a journey on horse back. The railway will take a man more rapidly to his journey's end and by its aid he will get over much more ground in the day; but he will lose the variety of the walk up the hill, the occasional divergence from the hard road and the opportunities for examining the country through which he is passing which the horseman enjoys. The business man will prefer the train which will carry him quickly to his bank or his warehouse, but he will miss many things which the other will have seen and profited by, provided, of course, that he has made good use of his faculty of observation. For it is on such a proviso as this that the case of the desultory worker really tuurns.

(to be continued.)

[illegible] in Council is [illegible] following rules [illegible] future:— [illegible] Servants, Sta- [illegible] anted Officers [illegible] ointments, and [illegible] employ are prohibite[illegible] pain of dismissal from taking loans from, or otherwise placing themselves under pecuniary obligations to, persons subject to the official authority or influence of such Government officers, or residing, possessing property, or carrying on business within the local limits for which such Government officers are appointed.

2. This prohibition does not extend to transactions in the ordinary course of business with Joint Stock Banks and British firms.

The Hyderabad (Deccan) Mining Company's shares are flat. The secretary of the Company denies that Abdul Huk settled the mines' concession on his own responsibility. He declares that the company's interests are unaffected. Developments are expected.

We acknowledge with thanks the receipt of the report on the administration of the Hyderabad Assigned Districts for the year 1886-87.

## वऱ्हाड.

हवामान— हल्लीं उन्हाळा विशेष भासू लागला आहे. केव्हां केव्हां मध्यंतरा अभ्रें येतात व त्यामुळें अतोनात उकाडा होतो. प्रहर दिवसापासून एक प्रहर रात्र होई पर्यंत सारखी तलखी होत असतें. रोगराई कांहीं म्हणण्या सारखी नाहीं.

मुंबई कडील सिव्हिल सरव्हंट मि० टकर यांस लेफटेनंट कार्नेश यांच्या मागें सेकंड असिस्टंट रेसिडेंट नेमिल्यामुळें एका प्रकारें वऱ्हाडचा विशेष फायदा होणार आहे. विद्वान गृहस्थ मोठमोठ्या हुद्यांच्या कामावर येऊं लागले ह्मणजे लष्करी फडलहाप बंद होत जाऊन प्रजेचें कल्याण होतें. मि० हावेल साहेब यांनीं आपल्या थोड्या कारकीर्दीत अशा लोकोपयोगी कामाकडे लक्ष पुरविण्याचें मनांत आणिलें आहे याबद्दल आम्ही त्यांचे फारफार आभारी आहो.

मि० कुमार हरबानजी रेसिडेंट साहेबांचे अव्वाची यांची बदली वाशिमाहून अकोल्यास झाली असल्याचें कळतें.

मि० आरदेसर दिनसाजी [illegible] असि० कमिशनर यांस तुर्त [illegible] बदललें आहे. साहेब फार दिवस अकोल्यास राहिले असल्यामुळें ही बदली त्यांस रुचणार नाहीं पण सत्त पुढें शहाणपण नाहीं हें निराळें सांगणें नको.

तारिख २१ एप्रील रोजी उमरावतीस नथु नांवाच्या एका स्टांपवेंडरास स्टांप विकत घेण्याच्या मिषानें त्याजवळील चारशें रुपयांची थैली लांबविण्याकरितां कांहीं चोरट्यांनीं कैफ देऊन रुपयासह ते फरारी झाले. नथु कांहीं वेळानें त्या कैफामुळें मरण पावला. चौकशी चालू आहे उमरावतीस भामट्यांचा धंदा बरा चालतो पण या भामटेशाईची खुनापर्यंत मजल पोचली आहे ही मात्र तेथील पोलिसांची तारीफ करण्यासारखी शिस्तवार व्यवस्था होय.

गेल्या शुक्रवारीं येथलि मुनिसिपालिटीनें जाहीर सभा भरवून अकोल्यास पाण्याचे नळ आणण्याच्या संबंधानें खर्च २३४८५० रु० लागेल असा अंदाज असून त्यापैकीं सरकार फक्त अर्धी खर्च देऊं इच्छित असल्यामुळें लोकांस निम्मे रकम देतां येईल किंवा नाहीं याबद्दल लोकांचा विचार घेतला त्यावरून खामगावांस व उमरावतीस सरकारांतून तीन चतुर्थांश रकम पाण्यानिमित्त मिळाली होती त्याप्रमाणें अकोल्यास ही पाण्याच्या विशेष गैरसोयीमुळें व मुनसिपालिटी तितकी ऐपतदार नसल्यामुळें खर्चाचा तिसरा हिस्सा सरकारनें सोसावा अशा अर्थाची अलिशान रेसिडेंट साहेबांस विज्ञापना होणार आहे तिकडे साहेब बहादूर लक्ष पुरवितील अशी आम्ही उमेद बाळगितों.

रा. रा. बाळकृष्ण लक्ष्मण बापट यांच्या दोन महिन्यांच्या रजेंत उमरावतीचेच इंग्लिश मराठी शाळेचे हेड मास्तर रा. रा. श्रीधर रामचंद्र पिंपळखरे यांस अॅक्टिंग डेपुटी एजुकशनल इनस्पेक्टर नेमिलें आहे.

वऱ्हाडांतील स्थानिक स्वराज्याच्या मसुद्याची भवति नभवति होऊन गेल्या रेसिडेंसी आरडरमध्यें तूर्त तालुका व जिल्हा निहाय बोर्ड स्थापण्याचा सन १८८५ सालचा 'बिरार रुरलला' इंग्रजी मध्यें छापून प्रसिद्ध झाला आहे. त्याचें अक्षरशः मराठींत भाषांतर कायद्याकानूच्या धर्तीवर लवकरच येणार आहे सबब आम्ही तें काम आम्हांवर घेऊं इच्छित नाहीं.

रा. रा. व्यंकटेश कृष्ण देसाई हे इलिचपुरचें हवापाणी तबियतेस न मानल्या मुळें तेथील डेपुटी कमिशनर कचेरींतील सेकंड क्लार्कचे जाग्यावरून पुन्हां येथें आपल्या ८० रु० च्या पूर्वस्थानीं परत बदलून आले आहेत.

इलिचपुरचे डेपुटी कमिशनरचे सेकंड क्लार्कच्या १०० रुपये पगारावर मि० काटर यांस बढतीवर नेमून त्यांच्या ७५च्या रुपयांच्या जाग्यावर येथील रा. रा. देसाई यांच्या कामावरील अय्या मि० रामय्या मुदलियार यांस पाठविल्याचें कळतें.

रा. रा. गणेश बापुजी तहशिलदार जळगांव व मि० शेषाचिलम मुदालियार तहशिलदार खामगांव यांस एकेक महिन्याची रजा मिळण्या बद्दल शिफारस झाल्याचें समजतें.

मे० नौलिस साहेब डेपुटी कमिशनर वाशिम यांच्या तीन महिन्यांच्या रजेंत खामगांवचे असिष्टंट कमिशनर क्याप्टन मारिस साहेब हे काम पाहतील.

गेल्या पंचवीस तारखे पासून हायस्कुलें उन्हाळ्यानिमित्त बंद झालीं आहेत. पुढील महिन्याच्या पंधरावे तारखे पासून दिवाणी कोर्टासही सालाबाद प्रमाणें महिनाभर सुट्टी मिळेल. आज मित्ती पर्यंत ही उन्हाळ्याची सुट्टी कोडतांस भलत्या वेळीं दिली जाते ती योग्य वेळीं देण्या साठीं पूर्वी ठरलेल्या नियमांतील वेद वाक्यांचें उल्लंघन केल्यास प्रायश्चित्त न मिळतां उलटें आशीर्वाद मिळतील म्हणून हें श्रेय सहजगत्या रेसिडेंट साहेबांनीं घ्यावें अशी त्यांस आमची वार्षिक मामुल वहिवाटी प्रमाणें प्रार्थना आहे.

उमरावतीचे चिफ कानस्टेबल मि० फर्दैन अली हे पेनशनर झाल्या मुळें त्यांच्या ७० रु० च्या जागेवर रा. रा. वामनराव मुरलीधर व त्यांच्या ६० रु०च्या जागेवर रा. रा. नागोराव नरसिंह आणि त्यांच्या ५० रु० च्या जागेवर मि० नजीमुदीन चिफ कानस्टेबल यांस नेमिल्याचें समजतें.

रा. रा. वासुदेव काशिनाथ परांजपे फर्स्ट असि० मास्तर मेहेकर यांस शाळाखात्यांतून बदलून येथील स्मालकाज कोर्टाचे डेपुटी क्लार्क नेमिलें आहे. या गृहस्थांचा फर्स्ट बी. ए. च्या परिक्षेपर्यंत अभ्यास झाला आहे यांच्या सारख्या शिकलेल्या लोकांस अशा दिवाणी मुलकी खात्यांत नेमिलें असतां पुढें चांगले चांगले अनुभाविक आफिसर होण्याचा विशेष संभव आहे.

(मागाहून आलेल्या नोटिसा.)

लक्ष्मण वल्लद डुमण कुंभार परदेशी राहाणार आकोट यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मौजे रामटेक परगणे आकोट येथील शेत सर्व्हे नंबर ६४ पैकीं हें माझें वडिलार्जित आहे माझ्या शेताचें खातें पामाजी वल्लद माझा चुलता यांचे नांवानें होतें. पामाजी मयत झाल्यावर सदहु शेत त्याची बायको नामें सकु इचें नांवें लागलें आहे. इचें नांवानें इतकेंच करितां ठेविलें कीं अन्नवस्त्र ती हयातींत आहे तों पर्यंत तिजला मिळावें म्हणून ठेविलें आहे. तिजला विकण्यास वगैरे अधिकार कोणतेंच प्रकारें नाहीं. हल्लीं तुम्ही सदहु शेत तिजपासून खरेदी घेतलें. सदहु शेत आज सुमारें ३०० शे किंमतीचें आहे असें असोन तुम्ही रुपये ५० स खरेदी घेतलें याजवरून हें कृत्य तुम्ही मला बुडविण्याचे हेतूनें केलें आहे हें उघडच होतें तेव्हां हें बरोबर नाहीं. विधवेस वडिलार्जित मिळकत विकण्याचा कोणतेंच प्रकारें अधिकार नाहीं करितां नोटीशीनें कळविलें जातें कीं, तुम्ही ही पावले दिवसापासोन आठ रोजांत दस्ता ऐवज झालेला रद्द आहे असें बदल मजला लेख करून द्यावा. असें न केल्यास कायदेशीर तजवीज केली जाईल त्याज बद्दल खर्च तुम्हांस द्यावा लागेल कळावें. तारीख १२ एप्रिल सन १८८८ इ०

( सही ) चिन्या वल्लद मठाजी
गारपगारी अज्ञान पालन करणार गुजी मर्द मटाज'
निशाणी बांगडी राहणार आकोट.

नोटिस

रामानंद दानमल व हरीराम अनंदराम आणि बापुजी रामदेव दुकान ताजनापेठ या तिवास खालीं सही करणार याजकडून नोटीशीनें असें कळविलें जातें कीं त्रिवर्गांनीं अळशीबद्दल आम्हांस सट्टा देण्याचे कबूल करून त्याप्रमाणें आजपावेतो तुम्ही अळशी मोजून दिली नाहीं तर सट्याच्या करारा प्रमाणें नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत निकाल करावा. न केल्यास रीतीप्रमाणें सर्व नुकसान भरून घेतलें जाईल कळावें तारीख २७-४-८८ इसवी

सही
गंगाध[illegible] गभूत [illegible]

[illegible]हरणा सारखी आहे.
**वर्तमान**[illegible] कल्पनेप्रमाणें सर
[illegible]चरण शुद्ध ह्मणतील वर

मित्ती

[illegible]en
disap[illegible]

राणी सरकारचे प्रतिनिधि लार्ड डफरीने …इब हे चालूं साल अखेर परत विलायतेस जाणार होते पण हल्लीं आगस्ट महिन्यांतच जाणार असून त्यांचे जागीं येणारे लार्ड लान्सडाऊन हे येईपर्यंत तीन चार महिने मुंबईचे गव्हरनर लार्ड री साहेब गव्हरनर जनरलचें काम पाहणार असल्याचे ऐकितांत आहे.

युरोपांत पुन्हा गडबड होण्याचा रंग दिसत आहे. बल्गेरियाचा पदभ्रष्ट राजा आलेगझांडर याचें लग्न जर्मनीच्या सांप्रतच्या बादशहाच्या मुलीशीं ठरण्याचे वाटत आहे. मुलीची आई व आजी ह्मणजे आपल्या महाराणी साहेब यांची या गोष्टीस संमति आहे. परंतु जर्मनीचे प्रधान प्रिन्स बीस्मार्क हे या गोष्टीला मुळींच नाखुश आहेत. त्याचें ह्मणणें असें आहे कीं जर्मनीची राजकन्या रशियाचा शत्रु जो अलेगझांडर यास दिली असतां त्यापासून रशियाशीं जर्मनीचा जो स्नेहभाव आहे त्यामध्यें व्यत्यय येण्याचा संभव आहे या करितां हा संबंध जर घडून आला तर ते आपली जागा सोडून देण्यास तयार झाले आहेत. अरे काय बिचाऱ्या अलेगझांडरची दशा. बिचाऱ्यानें गुदस्ता युरोपांत शांतता राखण्याकरितां आपण होऊन आपल्या सिंहासनाचा त्याग केला. व आतां हा गृहसौख्याची जो मुख्य गोष्ट विवाह ता अगदीं घडून येण्याचा प्रसंग आला असतां त्याला तो सोडून द्यावा लागत आहे. धन्य त्या गृहस्थाची. हें लिहिल्या नंतर आम्हास असें कळतें कीं हा संबंध घडून येत नाहीं. प्रिन्स अलेगझांडर याला आतां दुसरी कोठें नवरी पाहिली पाहिजे.

जर्मनी व आस्ट्रिया या उभय देशांत पर्जन्यानें इतकी कांहीं झोड उठविली आहे कीं प्रांताचे प्रांत वाहून गेले आहेत.

सुसरींचें सरोवर—कराची पासून चार पांच कोसांवर एक सरोवर आहे. तेथें मोठमोठ्या सुसरी मनस्वी आहेत. तेथें कोणी एक फकीर रहातो. तो सुसरींचा चमत्कार दाखवितो. तो त्या सरोवराच्या कांठीं येऊन आपली भारलेली कांठी फिरवून "आव,आव" असें ओरडतो. तें ऐकल्या बरोबर पन्नास पाऊणशें सुसरी भराभर पाण्याच्या बुडांतून वर येतात, आणि त्यांच्या योगानें सगळें सरोवर जणूं काय चळवळूं लागतें. त्यांतल्या कितीएक सुसरी तर पंधरा पंधरा फूट लांब लांब आहेत. त्यांना त्या फकिरानें "बैठो" ह्मटल्या बरोबर त्या आपलीं जाभाडें पसरून गुपचूप पडल्या राहतात. त्यांना खायाला मोठमोठे मांसाचे तुकडे टाकितात, तेव्हां त्यांवर शुद्ध उड्या घालतात. आणि त्या ते फाड फाडून खातात. ह्या सरोवरापासून सुमारें पाव कोसावर दुसरें एक लहानसें सरोवर आहे. त्याचें पाणी साधारण स्नानाच्या पाण्या इतकें ऊन असतें त्यांतही पुष्कळ सुसरी आहेत.

जगाचीवस्ती – सन १८१० पासून १८७४ पर्यंत जगांतील मनुष्य वस्ती दुप्पट झाली असें प्रोफेसर लिव्हासियर ह्मणतात. सन १८७४ पर्यंत जगांतील मनुष्य वस्ती …ने, आणि १८७४ सालीं … ६५ वर्षांत लोक वस्ती दुप्पट झाली, आतांच माणसाला माणसें खाऊं लागलीं आहेत, तेव्हां पुढल्या ६५ वर्षांत काय वाट होणार न कळे.

मिती चैत्र व० १०

रंगूनास एक ब्रह्मी मुलगी आहे तिचे डोळ्यांत कोणी संन्याशी उतरला आहे असें ह्मणतात. हा अलौकिक प्रकार पाहण्यासाठीं त्या मुलीचें घरीं गर्दी जमते. पाहणारास फी ठेविली आहे,

चमत्कारिक वृक्ष—तिबेटांत कुणबूस नजिक एक वृक्ष आहे तिबेटांतील, चिनांतील व तार्तरी देशांतील लोक वृक्षास पूज्य मानतात या वृक्षा संबंधानें चमत्कार हा आहे कीं याच्या प्रत्येक पानावर तिबेटांतील लोक जी भाषा बोलतात त्यांतील मुळाक्षरा सारख्या आकृति असतात. कांहीं पानावर मध्यभर्गी, कांहींवर कोपऱ्यांत, कांहींवर बाजूंला अशा आकृति असतात खोड व खांद्या यांवर देखील अशा प्रकारच्या आकृती आढळतात. या झाडाचीं पानें नेहमीं हिरवींगार असतात. न्या. सिं.

खरें धैर्य—"डाक्टर पोलन यांणीं सक्कर येथें नेटिव वर्तमानपत्रें या विषयावर टाऊन हालांत व्याख्यान दिलें. व बहुतेक वर्तमानपत्रांची तऱ्हा योग्यच असते, आणि कोठें कोठें द्वेष बुद्धी जी आढळते ती पायोनियर सारख्या पत्रांची जी नेहमीं नेटिवांची टर उडविण्याची व त्यांचे बद्दल मत्सर बुद्धीनें लिहिण्याची तऱ्हा आहे त्याच्याचमुळें झालेली असते. वर्तमानपत्रांना माहिती न देणें वाईट आहे, शिवाय राज्यव्यवस्था उघड, निष्कपटी, आणि विचारी असावी, तींत चोरटा प्रकार कांहीं नसावा." नेटिव ओपीनियन मधून हा उतारा आह्मी घेतला आहे. पोलन साहेबांनीं सांगितलेल्या सगळ्या गोष्टी इतक्या खऱ्या आहेत कीं, त्यांचें मोल करणें अशक्य आहे. सरकारच्या दाशिल्याचें नेटिव द्वेष्टी इंग्रजीपत्रेंच राज्यास अपायकारक आहेत यांत काडी मात्र संदेह नाहीं. सरकारास प्रतिकूळ वाटणारा पण खरा अभिप्राय देण्याचें धारिष्ट पोलन साहेबांनीं दाखविलें या बद्दल त्यांची आह्मी अतिशय तारीफ करतों. शेतकरी आक्टाचे स्पेशल जज्ज असतांना शेतकऱ्यांच्या दीन स्थितीस सरकार सर्वस्वी कारण आहे असा खरा अभिप्राय दिल्या मुळें सरकारानें त्यांच्या पाठीवर भक्कम कोर्डा ओढला होता हें आमच्या वाचकांस आठवत असेलच. खरें बोलणें हें हल्लींच्या कारकीर्दीत पाप मानलें जातें, ह्मणून नेटिव पत्रांबद्दलच्या ह्या खऱ्या अभिप्रायाबद्दल सरकारची त्यांच्यावर खपामर्जी होईल अशी आह्मास भीती वाटते.

दोघे गोरे शिपाई व शूर नेटिव—नेटिवास नामर्द ह्मणणाऱ्यांनीं ही पुढील गोष्ट डोळे उघडून वाचावी. कलकत्त्यापासून थोड्या अंतरावर एक वाघ फार माजला. इतका कीं. एकाच दिवसांत ११ माणसें त्यानें घायाळ केलीं. तेव्हां सिऱ्यामपूरचे डिव्हिजनल माजिस्त्रेट मि० ड्यूक, व असि० पो० सुप० मि० रायलंड हे उभयतां काडतुसें, बंदुका व काठ्या भाले यांसह ५०० रान पिटणारे घेऊन तो मारण्यासाठीं गेले. रायलंड्यानें गोळी सोडली पण ती वाघाच्या केसास चाटून गेली. त्या बरोबर वाघ चवताळून त्याच्या बोकांडीस बसला, आणि त्यास बरेंच घायाळ करून तो एका बागेंत जाऊन बसला तेथून त्यास उठवण्यासाठीं रान पिटणाऱ्यांनीं होता तितका यत्न केला पण तो उठला नाहीं. वाघानें साहेबांची चांगलीच कशी पातळ केल्यामुळें उभयतांची पण गाळण होऊन गेली. शेवट लालधारी दोसाद हातीं भाला घेऊन व एक छेतर हातांत काठी वगैरे न घेतां वाघावर चालून गेले. वाघ छेतरच्या अंगावर गेला आणि त्यानें त्यास बरेंच घायाळ केलें. लालधारीनें भाल्याचाच नेम वाघावर धरिला, त्या बरोबर छेतरास सोडून वाघ लालधारीवर उसळला. लालधारीनें वाघाचा पंजा धरून त्यास निर्भयपणें खालीं पाडलें, आणि त्यास चावतां येऊं नये ह्मणून त्याचीं दोन्हीं जाभाडें वासून धरलीं. इतक्यांत दुसरे लोक येऊन त्यांनीं भाल्यांनीं वाघास बहुतेक चीत करून सोडलें मग त्या गोऱ्या शिकाऱ्यांनीं गोळ्यां मागें गोळ्या वाघावर घातल्या. मेल्या वाघावर गोळ्या घालणारे शूर, कीं त्याशीं कुस्ती खेळणार शूर! याच बंगाली लोकांस इंग्लिश नामर्द. पेंचळे ह्मणतात. नाहीं? लालधारी व छेतर यांच्या शौर्याची तारीफ करावी तितकी थोडीच.

४२ तोळे सोनें पोस्टांतून गेल—पेशावराहून कराचीस एक विमा उतरलेली ४२ तोळे सोन्याची बंगी कोणी पाटविली. वाटेंत सोनें काढून घेऊन त्याच्या जागीं कांहीं लोखंड घातलें. त्या चोरीच्या चौकशीचें काम पोस्ट खात्यातून पोलिसाकडे दिलें आहे. हा चोर मोठ्याच धारिष्टाचा ह्मणावयाचा.

इनकमटाक्साचे उत्पन्न सन १८८६-८७ सालीं मुंबई इलाख्यांतील प्राप्तीवरील कराचें उत्पन्न, खर्च ८९,८२१ रु. वजा जातां ३०३१२२६ रुपये झालें त्याचा तपशील

| | | |
|---|---|---|
| १ | पगारावरील | ६२०३९५ |
| २ | कंपन्या | २६९७६० |
| ३ | सिक्यूरिटि | १६८००३ |
| ४ | दुसरी प्राप्ति | १९३२६२८ इ.स. |

मद्रासेस एक व्यापारी खांद्यावर जवाहीर व नोटांची पिशवी घेऊन आपल्या दुकानाला जात असतां वाटेंत एका घारीनें त्या पिशवीवर झडप घातली आणि उचलून नेली! आतां पोलीस या गुन्हेगाराचें काय करणार? इंग्रजी राज्यांत पक्षी सुद्धां देशावर झडप मारतात.

यंदा मुनसफांचे परीक्षेंत ३० पैकीं ४ व वकिलीचे परीक्षेंत २०० पैकीं २७ उमेदवार पास झाले.

रशियन जनरल प्रसिद्धपणें सांगतात कीं, मे महिन्यांत खात्रीनें लढाई सुरू होईल. कोणा बरोबर?

चमत्कारिक वहिवाट आणि रयतेचा असंतोष— कच्छ येथें अशी चाल आहे कीं, तेथील बोहोरी जातीच्या मुसलमान लोकांनीं कधींही घोड्यावर बसूं नये, इतकेंच नव्हे; तर लग्नसमारंभांत वधूवरांनाही घोड्यावर बसण्याची परवानगी नाहीं. ठा० अ०

राजे सर टी. माधवराव निलगिरीस गेले त्याजवरून ते बडोद्यास पुनः दिवाण होणार अशी मद्रासेकडे वदंता उठली आहे.

चीन देशामध्यें सरकार व तेथील लोक हळूहळू पुढें सरकण्याचे उद्योग करावयास लागले आहेत. युरोपांतील कलाकौशल्याचें ज्ञान लष्करी व आरमार याजसंबंधी ज्ञान लोकांत वाढविण्याचे उद्योग सुरूं झाले असें कळतें.

रोमेनियामध्यें शेतकरी लोकांचे दंगे व्हावयास लागले आहेत. शेतकरी लोकांच्या टोळ्या बुचारेस्ट शहरा सभोंवती जमल्या व शहरांत शिरूं पाहताहेत. दंग्याचा बंदोबस्त करण्याकरितां लष्करी लोक बोलावले व गडबडींत कितीएक मेले असें समजतें.

आस्ट्रियाच्या सरहद्दीवर पुनः रशियाच्या लोकांची जमवाजमव सुरू झाली असें समजतें.

फ्रेंचसरकार हिंदुस्थानांतील आपला मुलुख राज्यकारभार चालविण्या पुरतें उत्पन्न होत नसल्यामुळें इंग्रजसरकारास देऊन टाकणार अशी चांदरनागोर येथें वदंता उठली आहे.

परवानगी मिळाली---रंगशाळा कंपनीस इमारत बांधण्याची परवानगी म्यु. क. कडून मिळाली. आतां लवकरच इमारतीचे कामास सुरुवात होईल असें समजतें.

सुमारें पांच किंवा साहावर्षांत इंग्लंडास सूवेज क्यानल बद्दल खुद्द कंपनी कडून त्याचा पैसा मिळेल, आणि तेणेंकरून इजिप्त वरील २,००,००० पौंडाचा बोजा कमी होईल.

येत्या हिवाळ्यांत अलाहाबाद येथें मुसलमान लोकांची सभा होऊन तेथें सामाजिक विषयावर वादविवाद होणार आहे असें कळतें.

पाण्यांत नाहींशी झालेल्या मनुष्यांची शरीरें शोधून काढण्यासाठीं अमेरिकेंत विजेच्या दिव्याचा उपयोग करितात. हा दिवा मासे धरण्याच्या कामासही चांगला उपयोगी पडतो असें ह्मणतात. ह्या दिव्याच्या सभोंवती तारेचें जाळें असतें त्याचा सापळ्याप्रमाणें उपयोग होतो दिव्याच्या प्रकाशानें माशांचे आकर्षण होऊन ते जाळ्यांत येतात आणि मग तें जाळें बंद करून त्यास आंत ओढतात.

एक पिसाळलेला लांडगा गेल्या महिन्यांत इंदूर येथें कर्नल टामसन चीफ एंजिनियर यांस डसला. ते लागलेच औषधोपचाराकरितां युरोपास गेले परंतु त्यांची हकीकत अद्यापि कळली नाहीं. तथापि त्यांस डसल्यावर तो लांडगा आणखी १४ असामीस डसला, पैकीं नऊ जण मेले असें समजतें.

टर्कीचे सुलतान यांणीं कान्स्टांटिनोपलामध्यें दारूचा व्यापार अगदीं मना केला. व उत्तर समुद्राच्या जवळच्या ग्रेट ब्रिटन फ्रान्स, बेलजियम, हालंड, जर्मनी व डेनमार्क या साहा सरकारांनीं टर्कीच्या लोकांस दारू विकणार नाहीं असें कबूल केलें असें समजतें.

सिंधप्रांत पंजाब इलाख्यास जोडणें बरोबर व लोकांस पसंत नाहीं ह्मणून प्रसिद्धपणें सरकारास कळविण्याच्या इराद्यानें कराची, हैदराबाद व सक्कर येथें जाहीरसभा झाल्या असें समजतें. सु० प०

—दुसरा आणखी एक ब्राह्म विवाह ता. १३ रोजीं झाला. पंडित शिवनाथ शास्त्री यांची दुसरी १७ वर्षांची कन्या श्रीमती तारांगणी देवी इचा विवाह बाबू गजेंद्रनाथ बानर्जी मलीक यांजशीं झाला असें इं. मे. वरून समजतें.

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

. उद
…त पाश्चात
साहेबांचें आचरण